

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०५४
REFBK-0016302

# नवे पान

कविवर्य दत्तात्रय कोंडो घाटे यांची संपूर्ण कविता

**संपादक : डॉ. माधव गोपाळ देशमुख**

# नवे पान

कविवर्य दत्तात्रेय कोंडो घाटे यांची संपूर्ण कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 8302

संपादक
माधव गोपाळ देशमुख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ४७००३ दि: ...
१७५४ नों. दि. १८/९/६८

REFBK-0016302

REFBK-0016302

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर - पुणे
किंमत चार रुपये

प्रथमावृत्ती,
जून १९६७
© सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १
४६१/४, सदाशिव पुणे २

मुद्रक :
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
१५२३, सदाशिव,
पुणे २

## अनुक्रमणिका


नवे पान उघडण्यापूर्वी (संपादक) पाच ते सोळा
हृद्गत (चंद्रशेखर) १
दत्तांचा परिचय (विठ्ठलराव घाटे) ८
१ नवे पान उघडलें ! ४१
२ एका मद्यप्याची स्त्री ४२
३ यत्र यत्र हरिणीदृशां क्रमः ।
तत्र तत्र मदनस्य विक्रमः ॥ ४४
४ श्री शिवछत्रपति ४५
५ सखे सुमनमाले ! ४२
६ बाळा वत्सरा, ये तुझें स्वागत असो ! ४८
७ मित्रा विहंगा ! ४९
८ प्रिये कवितासुंदरी ! ५१
९ बाई लतिके ! ५५
१० सख्या वसंतवाता ! ५८
११ मुग्ध कलिका ६१
१२ सायंकाल ६३
१३ कुसुम-लालन ६५
१४ वर्ष-प्रतिपदा ६६
१५ कोकिलकूजित ६९
१६ राजा रविवर्मा यांच्या चित्रांतील मेनका
शकुंतलेस काय म्हणते ? ७१
१७ फुलांनों ! चला. ७३
१८ जा दृष्टीबाहेर ! ७५
१९ प्रतिभा–विहंगा— ७६
२० मित्रा नारायणा ! ७८
२१ लाडके— ७९
२२ भगवा झेंडा ८१
२३ बघसी अंत किती राजसे ? ८३

२४ निज नीज माझ्या बाळा । ८६
२५ विश्वामित्रीच्या कांठी ८९
२६ तरुवरा ! ९२
२७ एका आसन्नमरण दुष्काळपीडितास-- ९३
२८ विनवणी ९५
२९ बोलत कां नाहीं ? ९६
३० प्रभात ९७
३१ आगगाडीस ९९
३२ १८९७ या वर्षाला- १००
३३ आकाशातील घारीस- १०१
३४ आंदोलन १०३
३५ असंतुष्ट पति १०४
३६ दीपका ! १०५
३७ शाहणी बाहुली १०६
३८ स्वतंत्रतेस- १०७
३९ अ आ ई ! १०८
४० बाललेखन १०९
४१ देवाजीचीं सर्व मुलें ११२
४२ एक फुलें विकणारी पोर ११४
४३ मावळ्यांस आमंत्रण ११५
४४ दिवाळी ११७
४५ जननी आर्यभूमि ! १२१
४६ शेवटचें मागणें १२३
४७ लक्ष्मीविलास राजमंदिर-मनोरा १२५
४८ स्वप्न-भेट १२७
परिशिष्ट १३१
१ सैंधी काय म्हणते ? १३२
२ काशी १३३
३ समाजजशाकट १३४
टीपा १३५

# ‘नवे पान’ उघडण्यापूर्वी......

## दत्तकवींचे काव्यविषयक विचार

कोणत्याही कवीच्या काव्याचे प्रयोजन खुद्द त्याच्याच मुखाने ऐकावयास मिळाले तर त्याचे काव्य आकलन करणे हे अधिक सुलभ होते. कविवर्य दत्त यांच्या काव्याच्या मुळाशी असलेल्या कल्पना कवीच्याच शब्दात आज सुदैवाने उपलब्ध आहेत. त्यांनी आपला काव्यविषयक दृष्टिकोण ‘काव्यरत्नावली’ कारांना पुढील प्रमाणे कळविलेला होता.—

“प्रगती आणि काळ यांच्या अनुरोधाने कवितेची सुधारणा झाली पाहिजे. पूर्वीची पौराणिक पद्धती आता आवडत नाही. मनोविकारांचे चित्र-लेखन, सृष्टिसौंदर्याचे वर्णन आणि ऐतिहासिक ठळक प्रसंगांचे वर्णन वगैरे गोष्टी अर्वाचीन काळास सिद्ध आहेत व त्यांचा त्याने यथोचित उपयोग करून घेतला पाहिजे. कविता केवळ मनोरंजनाकरिता नसून तिचा दुसरा महत्त्वाचा कार्यभाग आहे. एकंदर समाजास उन्नत विचार मनोरंजक रीतीने समर्पण करून त्याच्या उच्च मनोवृत्ती जागृत करणे, हे खऱ्या कवीचे कर्तव्यकर्म आहे.”

*(काव्यरत्नावली, वर्ष ११ वे, १८९९)*

कविता ‘केवळ मनोरंजना’करिता नाही, तिचा मनोरंजन हा एक कार्यभाग आहे पण ‘दुसरा महत्त्वाचा कार्यभाग’ म्हणजे, ‘उन्नत विचार समाजास मनोरंजक रीतीने समर्पण करणे’ आणि ‘त्याच्या उच्च मनोवृत्ती जागृत करणे’ हा होय.

## सृष्टी आणि कवी

‘प्रिये कवितासुंदरी !’ या कवितेत कवितासुंदरी एकदा निघून गेली की मग सृष्टिसुंदरीही कवीशी अबोला धरते—

**“सृष्टिसुंदरी मजसवे अता काही । तुझ्या मागे शब्दही वदत नाही !”**

असे म्हटले आहे. तसेच ‘बाई लतिके !’ या कवितेत

**"झालो शिष्य तुझा आता,**
**मीच जाउनी शिकविन तू जे सांगशील जगता !"**

असा पुनः सृष्टी आणि कवी यांचा संबंध दर्शविला आहे.

**"वनी येउनी कविंनी कोकिलकूजित ऐकावे**
**हा बघ आला वसंत, कविते ! याते वर्णावे."**

असे 'कोकिलकूजित' या कवितेत म्हटले असून 'तरुवरा 'मध्ये

**"फेडु कसा उपकार तुझा मी दुर्बल न कळे मला,**
**अर्पितो पद्यसुमन हे तुला !"**

असे उद्गार काढले आहेत. या सर्व उद्गारांवरून कवीने आपल्या कवितेचे सृष्टीशी जे अनुसंधान बांधले आहे ते सृष्टी आणि कवी यांच्या परस्पर संबंधाबाबत समकालीन कवींनी जे काही लिहून ठेवले आहे त्याशी सुसंगतच आहे

सृष्टीप्रमाणेच काव्यकल्पनेशी निगडित असा प्रिया हाही एक विषय. दत्तांच्या कवितेत अनेकदा आढळून येतो. 'बघसी अंत किती राजसे ?' या कवितेत कवितेला आपली सखी कल्पून, तू मला दर्शन दे; मी तुझ्या वेणीत नवकाव्याची माळ घालीन, तुझ्यापुढे शास्त्राभ्यास, विद्यालय, विद्या आणि कला हे सर्व व्यर्थ आहेत. एवढेच काय पण,

**"ही विद्या साधिल तव पदसंवाहन,**
**ही कला करिल तव तनुलतिकामंडन,**
**नवकाव्य रचुनि हा दास करिल रंजन,**
**तव चरणी सर्वस्व वाहिले येउनि घे त्या कसे**
**बघशी अंत किती राजसे ?"**

असे आत्मार्पणपर उद्गार काढले आहेत.

'प्रिये कवितासुंदरी' या त्यांच्या कवितेत दिसून येणारा कवितेला प्रिया कल्पून तिजवर कविता करण्याचा प्रघात हाही पूर्वपरंपरेला धरूनच आहे.

**दत्तकवींची विनम्र वृत्ती**

कविवर्य दत्त आणि त्यांचे समकालीन कवी यांच्यामध्ये स्वकाव्यविषयक उद्गारांबाबत एक मुख्य फरक आहे तो असा की रे. टिळक, केशवसुत,

गोविंदाग्रज, बी इत्यादी समकालीन व पश्चात्कालीन कवींनी आपल्या काव्य-शक्तीविषयी प्रसंगविशेषी जशी आत्मप्रौढी व दर्पोक्ती दाखविली आहे तसे दत्तांनी केलेले नाही. उलटपक्षी 'शेवटचे मागणे' या कवितेत,

> **पुराणकविकीर्तिचा विमल अंश तो पाहुनी,**
> **दिसे मज न त्यापुढे, फिकट कीट खद्योत मी !**

अशी अतिशय नम्र वृत्ती वर्णिली आहे.

## पुरातन कवींची महती

एका रीतीने कविदत्त हे प्राचीन व अर्वाचीन असा काव्यभेद करून तदनुसार काव्याची वैशिष्टये काव्यरूपाने प्रतिपादन करणारे आधुनिक मराठी-तील पहिले कवी होत, असे म्हटले पाहिजे. 'शेवटचे मागणे' याच कवितेत,

> **पुरातन तसे नवे कवि कितीक काव्ये किती**
> **तयांत वद तू कुठे ? वद मना ! कुठे त्वत्कृती ?**

कवींचा पुरातन आणि नवे असा भेद करून पुरातन कवींची महती वर्णिताना ते म्हणतात--

> **शिखा गगन भेदिती, दिपविती रविज्योतिना,**
> **अशी सतत दीप्त ती तळपते कविप्रेरणा ;**
>
> * * *
>
> **प्रचंड कविकल्पनाविहग दिव्य पक्षांवरी**
> **महीतलि घनांवरी, उडत दिव्य लोकांवरी.**

पुराणकविकीर्तीचे प्रमुख वैशिष्ट्य त्यांच्या मते असे आहे--

> **निघे हृदयभूतुनी, दशदिशाहि उल्लंघुनी**
> **विचित्र ! वरती चढे नभललामगंगेहुनी**
> **रसाळ वचनौघ जो प्रभुपदी पडे तो कुठे ?**
> **पडे सतत खालती वचनधार ती ही कुठे ?**

त्रिखंड धुंडून ईश्वराच्या पायाशी रुजू होणारा प्राचीन कवितेचा प्रभाव त्यांना सतत जाणवत होता. प्रभुपदी पडणाऱ्या त्या वचनौघाच्या मानाने आपल्या कवितेची धार मात्र सारखी खाली जमिनीवर पडते याबद्दल त्यांना खंत

होती. कवी ही पदवी प्राचीन संतकवींनाच शोभते, इतर कवी म्हणजे मोराची पिसे लावणाऱ्या डोमकावळ्याप्रमाणे होत. वास्तविक प्रभुवराचे गुण गाण्यासाठी खरा समर्थ कोणीच नसल्यामुळे व कवीच्या ठिकाणी आवश्यक असलेले सर्व गुण – उदाहरणार्थ, चांगले वर्ण, शुची शब्द, मधुर वाक्य, अर्थ, रस, यमक, अलंकार, गुण हे सर्व केवळ ईश्वराच्या ठिकाणीच असल्यामुळे खरा कवी ईश्वरच होय. अशा परात्पर जगद्गुरूचे गुणवर्णन करण्यासाठी कोण समर्थ आहे ? अर्थात् अशा परिस्थितीत

**परात्पर जगद्गुरो ! कवि जगत्त्रयी तू खरा,**
**कवित्व नलगे, मिळो तव पदी सदा आसरा**

मला कवित्व नको पण तुझ्या पायाचा आश्रय मात्र हवा, हेच दत्तकवींचे उद्दिष्ट दिसते. हे त्यांचे शेवटचे मागणे आहे.

**ईश्वरभक्तीची ओढ**

तसेच त्यांच्या प्रारंभकालातील ' बाळा वत्सरा, ये, तुझे स्वागत असो ' या कवितेतही त्यांनी लिहून ठेवले आहे--

**तव संगे जगती, गुण, प्रीती, आत्मिक कायिक शांती**
**निर्मल सन्नीति, सद्भक्ती वाढो प्रभुगुण गाया. येईरे सखया !**

' मित्रा विहंगा ! ' या कवितेत

**दिली ज्याने मज श्रेष्ठ मनुजकाया**
**करी माझ्यावरि नित्य दयामाया**

अशा देवाचा उल्लेख केला आहे. ' प्रभात ' या कवितेत सर्वत्र ईश्वरभक्तीचे वातावरण आहे. या कवितेत नद्यांवर देवदर्शनाला चाललेल्या भाविक तरुणींची सुंदर उत्प्रेक्षा केली असून--

**खळखळ वाहत लगबग येती तटिनी गिरिवरुनी,**
**देवदर्शना जणू चालल्या भाविक या तरुणी !**

अशी देवदर्शनाविषयीची ओढ अप्रत्यक्षपणे सूचित केली आहे.

' आंदोलन ' या कवितेत देखील एका रूपकाच्या द्वारे

**देवदयेचे झाड थोरलें,**
**भक्तिप्रीतीचे दोर बांधले ;**
**मोक्षप्राप्तीचा झोका हा बाळे !**

**आनंद देवो तुला वेल्हाळे !**
**जो जो गे जो जो.**

असा देवभक्तीचा उल्लेख केला आहे.

'देवाजीची सर्व मुले' या कवितेत तर परमेश्वराची जगातली मुले आणि वनातली फुले प्रभुचे यश गातात, झोके घेतात व त्यामुळे सृष्टी आनंदाने डोलते

**प्रभुयश गाती, घेति झुले ।**
**ऐकुनि हर्षें सृष्टि डुले**

असा सहज उद्‌गार काढला आहे.

ईश्वरभक्तिविषयक अशा या सर्व उद्‌गारांवरून दत्तकवींच्या काव्यांत काव्यविषयक विचाराबरोबर ईश्वरविषयक विचारालाही एक महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना ईश्वराच्या भक्तीचा सूक्ष्म धागा दत्तांच्या बहुतेक महत्त्वाच्या कवितांतून अनुस्यूत झालेला आहे.

## मिशनरी मराठीचा प्रभाव

या संबंधात आणखी एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. त्यांनी आपल्या अनेक कवितांमधून ईश्वराचा उल्लेख अनेकवार 'प्रभू' असा केलेला आहे. हा उल्लेख दत्तकवींच्या बालमनावर झालेल्या ख्रिश्चन धर्मगुरूंच्या मराठी लकबींचा संस्कार स्पष्ट करीत आहे. विशेषतः 'नवे पान उघडले!' या कवितेतील मध्यवर्ती कल्पना ख्रिश्चन धर्मातील, ईश्वर म्हणाला

Let there be light
And there was light

या कल्पनेचा पडसाद आहे हे आवर्जून सांगणे नको. मूळ इंग्रजी वचनातील शैलीइतकीच किंबहुना त्याहूनही आगळी खुमारी दत्तकवींच्या पुढील पंक्तीत उतरली आहे—

**होती सृष्टि कुठे ? उजेड अथवा अंधार होता कुठे ?**
**...'होवो हे' म्हणताच ते उमटले जागी जसेच्या तसे !**

'नवे पान उघडले !' ही कविता म्हणजे दत्तकवींच्या संपूर्ण काव्यवैशिष्ट्यांचा परिपाक आहे.

झाले पुस्तक पूर्ण विश्व म्हणतो, ज्याला इथे आपण,
वाचाया बसला प्रभू, उलटितो पाने स्वये वाचुन ;

त्याने आजवर या विश्वग्रंथाची किती पाने उलटली व बाकी किती राहिली हे त्याचे त्यालाच ठाऊक. दत्त म्हणतात— मी मात्र

जन्मापासुन पाहिली वरवरी तेवीस पाने पुरी

पण पुढे कितीतरी पाहीन कोण जाणे! दैवयोगाने दत्तांना पुढील एकच पान उलटलेले पाहता आले. पण एवढ्या अल्प कालावधीत त्यांनी निर्मिलेली काव्यसंपदा मराठी काव्यात आपल्या अजोड प्रभावाने कायमची चमकत राहील, यात मुळीच शंका नाही.

## आधुनिक मनाची ठेवण

कविवर्य दत्त यांनी लिहिलेल्या कवितांचे वर्गीकरण करून त्यांतून त्यांच्या काव्यप्रतिभेचे मूल्यमापन करणे दुरापास्त आहे. एक तर त्यांची जवळ जवळ प्रत्येक कविता ही आपआपल्या परीने स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे. तिचा दुसरीशी संबंध जोडणे अशक्यप्राय ठरते. त्यांच्या काव्यकृतींचा रचनाकालक्रमानुसार विकास निश्चित करणे हे देखील फारसे सोयीचे नाही. कारण या संग्रहातील एकुण ५१ कवितांपैकी प्रारंभीच्या चार व अखेरीच्या सात सोडल्या तर बाकीच्या सर्व १८९७ व १८९८ या वर्षांत लिहिलेल्या आहेत. त्यातही १८९७ मधल्या तीस आहेत व १८९८ मधल्या दहा आहेत. अर्थात त्यांची अर्ध्याहून अधिक रचना वयाच्या २२ व्या वर्षी झाली आहे.

दत्तांच्या कवितांचे विषयवारीने वर्गीकरण करणे हे फारसे उपयुक्तही ठरणारे नाही. त्यांच्या बहुतेक कवितांचे विषय हे त्या काळी नव्याने रूढ झालेले होते. त्यांवर कविता करताना कवीने आपले काही खास वेगळे वैशिष्ट्य दाखविले आहे असे नाही. विहंग, लतिका, वसंतवात, कलिका, कुसुमलालन, कोकिलकूजन, फुलांनो चला, प्रतिभाविहंग, विश्वामित्रीच्या काठी, तरुवरा, आकाशातील घारीस, प्रभात, सायंकाळ, दिवाळी व सृष्टी काय म्हणते ?— या सुमारे चौदा-पंधरा कवितांचा ‘ सृष्टिविषयक कविता ’ म्हणून एक गट कल्पिता येईल. पण यातील विषय केवळ सृष्टिवर्णन हा नाही. सृष्टिवर्णनाच्या निमित्ताने आपल्या मनात असलेले अन्य विषय व्यक्त करावे असा त्यांचा हव्यास दिसून येतो. ही

त्यांची पद्धती त्यांनी आपल्या अल्प आयुष्यात वाचलेल्या शेले, वर्डस्वर्थ, स्कॉट, शेक्सपिअर, मिल्टन, बायरन् इत्यादी अनेक इंग्रजी कवींपासून उचलली. पण त्यांच्या निसर्गविषयक कवितांत निसर्ग असा फारसा नाहीच. कारण त्यांचे निसर्गविषयक निरीक्षण हे प्रत्यक्ष किंवा सूक्ष्म होते असेही कुठे दिसत नाही. समकालीन कवींमध्ये निसर्गविषयक कविता लिहिण्याची जी टूम आंग्ल कवींपासून उचललेली होती तीच दत्तकवींमध्येही आढळते.

दत्तकवींच्या निसर्गविषयक कवितांमध्ये तत्कालीन पद्धतीप्रमाणे अन्योक्ती बऱ्याच प्रमाणात आहे पण त्यांत फारसा आत्माविष्कार नाही. कारण निसर्गाप्रमाणेच जीवनाचेही प्रत्यक्ष निरीक्षण किंवा प्रत्यक्षानुभव त्यांत फारसा व्यक्त होत नाही. जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव किती आहे हे मोजण्याचा काही मानदंड निघालेला नाही. पण कवीच्या आत्मपर अशा ज्या काही कविता आहेत उदा० जा दृष्टिबाहेर, असंतुष्ट पती, लाडके— यांत कवीच्या जीवनातील काही निराशाजनक अनुभवांचे चित्रण आहे यात शंका नाही. पण अशा कवितांनी काव्यदृष्ट्या फारशी उंच पातळी गाठलेली नाही. विनवणी, यत्र यत्र हरिणीदृशां क्रमः, आगगाडीस, दीपका या कवितांत त्यांनी कृतज्ञता, उत्कंठा, विकास इत्यादी मनोभावनांना साकार केले आहे. त्यांनी आपल्या बहुतेक सर्व कवितांसाठी त्या काळाला अनुरूप असे विषय निवडून आपली आधुनिक मनाची ठेवण व्यक्त केली आहे.

दत्तकवींची जीवनविषयक दृष्टी शास्त्रीपंडितांची प्राचीन नाही. ती आधुनिक आहे; पण तीत व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे कोठेही पडसाद उमटलेले दिसत नाहीत. श्रीशिवछत्रपती, भगवा झेंडा, स्वतंत्रतेस अशा देशभक्तीपर कवितांत स्वदेशाभिमान व स्वातंत्र्यप्रीती हे गुण उत्कटपणे व्यक्त झाले आहेत. पण हे सर्व विषय कल्पकतेच्या आधारे त्यांनी साकार केलेले असले तरी त्यांतून कवीचे काही खास वेगळेपण व्यक्त होत नाही.

प्रिये कवितासुंदरी, बघसी अंत किती राजसे? अशा कवितांत त्यांनी विदेही कवितेला कामिनी कल्पून आळविले आहे. केशवसुतांच्या रुष्ट सुंदरीस व मनोहारिणी या कवितांशी दिसणारे साम्य हा अनुकरणाचा प्रकार नसून हा त्या काळाचा महिमा आहे. पण इतर कवींच्यापेक्षा दत्तकवींचे काही आगळे वैशिष्ट्य दाखवावयाचे असले तर त्यांच्या शिशुगीतांकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल.

ग्रंथ संग्रहालय ... अकोला
अनुक्रम...१८००३... दि: ९/९/...

## कविदत्तांची अप्रतिम शिशुगीते

समान देशकालपरिस्थितीतील दोन कवींची परस्पर तुलना करून त्यातून काही गुणदोषदिग्दर्शन होऊ शकते तसे ते दत्तकवींच्या बाबतीतही आजवर झालेलेच आहे. परंतु केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, विनायक, बी, माधवानुज, चंद्रशेखर, तांबे या सर्व नामांकित कवींच्या तुलनेने दत्तकवींचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी अत्यंत अल्प वयात व केवळ २/३ वर्षांच्या अवधीत मराठी वाङ्मयाला भूषणभूत ठरलेली अत्यंत उत्कट आणि रेखीव काव्यरचना केली.

विशेषतः बोलत कां नाही ? आंदोलन, शाहणी बाहुली व अ–आ–ई या त्यांच्या चार कविता म्हणजे मराठी काव्यसुंदरीवर चढविलेले एक बहुमोल लेणे होय. या लेण्याची जडणघडण, त्यातील कलाकुसर व त्यावरील तेजाची कीळ ही अप्रतिम आहे. या गीतांतून साध्या शब्दांच्या द्वारे बालसृष्टी साकार करण्याचे कवीचे प्रतिभासामर्थ्य हे क्षणोक्षणी प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही.

मराठीतील नामवंत शिशुगीतकार प्रा. भवानीशंकर पंडित यांचा दत्तकवींच्या शिशुगीतांवरील अभिप्राय लक्षात घेण्यासारखाआहे. ते लिहितात—

दत्तांची शिशुगीते जितकी रमणीय तितकीच स्मरणीय, जितकी स्वतंत्र तितकीच सरस आहेत. त्यांचा ताजेपणा कायम टिकणारा आहे आणि त्यांचा सुगंध नेहमी दरवळत राहणारा आहे. रे. टिळकांची शिशुगीते मुलांसंबंधी आहेत; दत्तांची शिशुगीते मुलांसाठी आहेत. टिळकांच्या शिशुगीतांचे वाचक वयस्कर आहेत, तर दत्तांच्या शिशुगीतांचे वाचक बालगोपाल आहेत. ही शिशु-गीते मोजकी चारच आहेत. परंतु स्वतंत्र रीतीने त्या प्रत्येकाचा अभ्यास करावा अशा योग्यतेची ती आहेत. या चारही गीतांत मुलीचेच स्वभावचित्रण आहे, बोलत कां नाही ? ही कविता दत्तांनी आपल्या भाचीच्या बाहुलीस उद्देशून लिहिली होती अशी साक्ष आहे. तेव्हा इतर गीतेही बहुधा या भाची-वरूनच उत्स्फूर्त झाली असावीत. ‘ शाहणी बाहुली ’ व ‘ बोलत कां नाही ?’ ही दोन्ही गीते मुलींच्या मानसशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने मार्मिक आहेत. पुन्हा त्यात भरपूर नाट्य आहे :

**सांग तुला का भूक लागली ?**
**देउ काय मी लाटुनि पोळी ?**

रुसू नको, घे ही बघ झाली!
छकुले ! ये खा ही; गडे ! तू बोलत कां नाही ?

या पद्यातून कवीचा मनकवडेपणा व गुळगुळीत विनोद खदखदून वर आला आहे. त्यातून बालकांच्या आणि खुद्द दत्तांच्याही निर्व्याज आणि निरागस मनाचे प्रतिबिंब उमटून आलेले आहे.

## वाढाळू मनोवृत्तीचा मनोहर विलास

दत्तांची शिशुगीते म्हणजे मराठी काव्यवाङ्मयाला मिळालेली मौलिक देणगी असून कविवर्य दत्तांचे खरेखुरे व्यक्तिमत्त्व त्यांच्या शिशुगीतांतूनच व्यक्त होते. अल्पवयात कमावलेली रचनाशैली आणि संस्कारक्षमता ही त्यांच्या संपूर्ण काव्यात दिसून येते. पण त्यांच्या वाढाळू मनाचे मजेदार क्षण त्यांच्या शिशुगीतांनीच टिपून घेतले आहेत.

वास्तविक पाहाता आत्मप्रदर्शनाची हौस, प्रचलित परिस्थितीविषयी उसळून येणारी भावविवश वृत्ती आणि वेळीअवेळी व्यक्त होणारी अत्युक्ती ही वाढाळू मनोवृत्ती (Adolescence) ची लक्षणे होत. प्रौढ कवींच्या कवितेत ही लक्षणे व्यक्त झाली तर आपण अशा कवितेला अपरिपक्व म्हणून बाजूला ठेवू; पण नेमक्या याच वैशिष्ट्यांचे दत्त कवींच्या काव्यात असे काही उन्नयन आणि उदात्तीकरण झाले आहे की त्यांमुळे केवळ शिशुगीतांनाच नव्हे तर त्यांच्या संपूर्ण कवितेला एक वेगळेपण लाभले आहे.

एरव्ही बालबोध असलेली, उत्कट भावनेपेक्षा कल्पनाप्राधान्य व्यक्त करणारी व मोठा आशय उकलून दाखविण्यापेक्षा भाबडा उपदेश करू इच्छिणारी दत्तांची कविता आपल्या शिशुगीतांमधून काव्यशक्तीची वरची पातळी गाठते.

## करुणरम्य भावगीते

शिशुगीतांप्रमाणे 'निज नीज माझ्या बाळा!' आणि 'एका आसन्न-मरण दुष्काळपीडितास—' या करुणगीतांनीही मराठी काव्यमालिकेत श्रेष्ठ स्थान संपादन करून ठेवले आहे. ही दोन गीते विशेषतः त्यातील 'निज नीज माझ्या बाळा' हा त्यांचा पाळणा करुणोत्कट आणि करुणरम्य उतरला आहे. शब्द आणि अर्थ, कल्पना आणि भावना, अलंकार आणि रस, प्रतिमा आणि विचार, नाट्य आणि भाव या सर्वांचे येथे अजोड रसायन जमून गेले आहे. 'निज नीज माझ्या बाळा!' म्हणजे दत्त आणि दत्त म्हणजे 'निज नीज

माझ्या बाळा !' असे आता समीकरण होऊन गेले आहे. इंद्रियगोचर अशा जीवनाच्या अनुभूतींशी कवी येथे पूर्णपणे समरस झाला असून बारीक सारीक तपशिलासह केवळ शब्दांच्या साहाय्याने एक संवेदनशील व जिवंत चित्र रेखाटण्याचे कवीचे सामर्थ्य या ठिकाणी प्रकट झाले आहे.

प्रत्येक कवी त्याच्या एखाद्याच कवितेवरून प्रामुख्याने ओळखला जातो. दत्तकवींची ही कविता दत्तांची ओळख करून देणारी तर आहेच, पण मराठी भाषेचे सामर्थ्य आणि वैभव यांची ओळख पटवून देण्यासाठीही या कवितेचा दाखला देता येण्यासारखा आहे.

## दत्तांच्या भरघोस यशाची मीमांसा

शिशुगीते आणि करुणरम्य भावगीते यांबाबत दत्तांना जे आगळे यश लाधले त्याची उपपत्ती शोधून काढणे दुष्कर नाही. अत्यल्प आयुर्मर्यादा लाधली असली तरी त्या अवधीत कवीच्या मनावर जे संस्कार घडून आले त्यांमुळे त्यांचे जीवन समृद्ध बनले. बालसुलभ असे नाट्य त्यांनी टिकवून धरले आणि अमेरिकन मिशनर्‍यांच्या व सुधारकी बाण्याच्या वातावरणात विविध विषयांचे विद्यापीठात व विद्यापीठाबाहेर शिक्षण घेण्याची त्यांना जी संधी लाभली तिचाही त्यांनी पुरेपूर लाभ घेतला. या वातावरणाचा त्यांच्या मनोभूमिकेवर फार खोलवर ठसा उमटलेला आहे. जुन्या आणि नव्या, संस्कृत आणि इंग्रजी, सनातन आणि सुधारकी अशा उभयविध संस्कारांचा त्यांना समन्वय साधता आला. आपल्या समकालीन कवींमध्ये दत्त हे एकटेच पदवीधर होते ही गोष्ट लहानशीच असली तरी सूचक आहे.

दत्तकवींच्या व्युत्पन्नतेचा व पढीक विद्वत्तेचा त्यांच्या भाषाशैलीवर पडलेला प्रभाव ठिकठिकाणी दिसून येईल. संस्कृत काव्यातील संकेत जसे त्यांच्या कवितेत जागोजाग आढळतील त्याप्रमाणे इंग्रजीतील अभिनव अशा रोमँटिक काव्याचे पडसादही तीत अनेक ठिकाणी उमटलेले दिसतील. दत्तकवींच्या शब्दकलेत क्वचित् ठिकाणी संस्कृतशब्दप्राचुर्य आहे, पण त्यांची शैली प्रौढ वळणाची असली तरी सुबोध आहे. वाचता वाचता मध्येच खटकणारा एखादा शब्द आपले लक्ष वेधून घेतो, असे त्यांच्या कवितेबाबत सहसा घडत नाही. त्यांनी वापरलेले शब्द हे रूढ असतात, मुद्दाम घडविलेले नसतात. अर्थात्

विशिष्ट कल्पना उचित शब्दांनी व्यक्त करताना त्यांना ते ते शब्द आपोआप सुचतात. त्यांच्या शैलीतून त्यांचे मराठी भाषेवरील कमावलेले प्रभुत्व दिसून येते यात शंका नाही.

अशा संस्कारक्षमतेप्रमाणेच त्यांच्या कवितेच्या यशस्वितेचे दुसरे पण तितकेच महत्त्वाचे गमक म्हणजे त्यांचे नाट्यप्रेम आणि संगीतप्रेम हे होय. दत्त हे आपल्या मित्रमंडळीत कवी म्हणून जितके ज्ञात होते तितकेच सतार व पेटी वाजविण्यातील त्यांच्या कसबाबद्दल प्रसिद्ध होते, ही त्यांच्या चरित्रातील माहिती अतिशय महत्त्वाची आहे. एकदा जलतरंगाचे वादन ऐकल्यावर त्यांनी त्याही कलेत प्रगती केली व कोणीही न शिकविता नखांनी चित्रे काढण्यास ते शिकले. त्याच्या संगीतविषयक आणि चित्रविषयक छंदांचा त्यांच्या काव्यावर कसा अनुकूल प्रभाव पडला आहे हे न सांगताच कळून येण्यासारखे आहे.

## मराठी काव्यग्रंथाचे नवे पान

दत्तांनी अल्पवयात लिहिलेल्या अल्पसंख्य कवितांना अनल्प आणि अमोल असे भरघोस यश मिळाले याची मीमांसा ही अशी आहे. आत्मप्रत्यय आणि आत्माविष्कार हा आधुनिक मराठी कवितेचा मुख्य विशेष मानला जातो. तो दत्तांच्या कवितेत फार मोठ्या प्रमाणात दिसून येतो असे दिसत नाही. त्यांची मनोवृत्ती अंतर्मुख आहे की बहिर्मुख आहे हेही फारसे स्पष्ट होत नाही. पण इतर कवींनी हाताळलेले विषय, घेऊन तीच ती वैशिष्ट्ये प्रामुख्याने मिरविणारी दत्तांची कविता आपल्या शिशुगीतांच्या व करुण्यरम्य भावगीतांच्या वेगळ्या प्रकारच्या तेजामुळे महाराष्ट्र सारस्वतात नंदादीपाप्रमाणे अखंडपणे तळपत राहील यात शंका नाही.

याच संदर्भात आणखीही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे आपली कविता मैफलीत ठेक्यात गाऊन दाखविणारे आधुनिक मराठीतील पहिले कवी म्हणजे दत्त होत. आधुनिक मराठी कवितेला जी जनसामान्यात लोकप्रियता मिळाली तिचे एक प्रमुख कारण म्हणजे तिच्यातील गेयतेचा अंश होय व हा अंश पहिल्या प्रथम जर कोणी प्रकटपणे व्यक्त केला असेल तर तो दत्तांनी, असे उपलब्ध माहितीवरून स्पष्ट होते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'नवनीता' नंतरच्या अव्वल इंग्रजीतील कवींच्या कवितांचे संकलन करण्याचा पहिला उपक्रम दत्तांनी केला आहे. त्यांनी निरनिराळ्या कवींशी पत्रव्यवहार करून संकलनार्थ त्यांची कविता मागविली होती व कविता पाठविणारांत दामले म्हणजे केशवसुत आणि जगन्मित्र म्हणजे रे. टिळक होते. विपुलतेने नवे नवे काव्यसंग्रह संपादन करण्याच्या आजच्या काळात ही गोष्ट जुन्यातली जुनी म्हणून नमूद करण्यासारखी आहे.

आधुनिक मराठी कविपंचकात दत्तांचा उल्लेख नसेल, केशवसुतांच्या संप्रदायाची दालने अतिविस्तृत करून त्यातच कोठे तरी कविवर्य दत्तांची योजना करणारांनी केली असेल; पण एखाद्या मनकवड्या भविष्यवाद्याप्रमाणे उपयोजिलेल्या खुद्द कवीच्याच शब्दांत त्याच्या कवितेचे वर्णन करावयाचे झाल्यास 'दत्तकवींनी आधुनिक मराठी काव्यग्रंथाचे नवे पान उघडले' असे करावे लागेल.

जून १९६७ संपादक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८८००३
क्रमांक १६८ नों. दि. १८।१।६८

" My heart, untravell'd, fondly turns to thee "

—Goldsmith

या ग्रंथात माझे कविमित्र कै. दत्तात्रय कोंडो घाटे बी. ए. यांच्या निवडक कविता गुंफिल्या आहेत. केवळ रससिद्ध कवीच्या हृदयातून आपोआप उचंबळून आलेले प्रेमळ आणि सोज्ज्वल उद्गार! हे या मोहोरेदार पुस्तकरूपाने कवीचे चिरंजीव आमच्या सहृदय वाचकांना आज सादर करीत आहेत.

तारीख १३ मार्च सन १८९९ या दिवशी ऐन दोनप्रहरी कवी दत्त इहलोक सोडून जाताना "तुमच्यासाठी हे काम मी करीन" असा मी संकल्प केला होता. पण तो मानवी संकल्प. ईश्वरी संकेताने माझ्या दिवंगत मित्राचे अवशिष्ट हेतु सनातन धर्मतत्त्वाला अनुसरून त्याच्या अधिकारसंपन्न पुत्राच्या हातून पूर्ण व्हावयाचे होते; आणि ते आज चिरंजीव रा. रा. विठ्ठल दत्तात्रय घाटे एम्. ए. यांनी यथोद्दिष्ट सिद्धीस नेलेले पाहून मी सानंद कौतुकाने त्यांस हृदयाशी धरितो, आणि ते हा ग्रंथ वाचकांपुढे सादर करीत असता मी नुसते 'मम' असे म्हणून यास माझा हात लावितो. अर्थात ह्या कार्याचे सर्व श्रेय कविपुत्राकडे असून मी तद्द्वारे वाचकांचा बहुमान करण्यात चिरंजीव घाटे यांचा केवळ साथीदार आहे.

या काव्यग्रंथाची प्रस्तावना मी लिहावी म्हणून चिरंजीव घाटे यांनी मला बहुत आग्रह केला, पण तो अधिकार कसलेल्या रसज्ञ विद्वानांचा असतो हे जाणून मी ते करण्याचे त्यांस नाकबूल केले. तथापि ते ऐकेनात. तेव्हा अंधप्रेमास वश होऊन माझ्या हल्लीच्या मनःस्थितीत मला जे चार शब्द सुचले, ते येथे नमूद केले आहेत; व ते लिहिण्याचा माझा मुख्य उद्देश कै. कविमित्र दत्त आणि त्यांच्या कविता यासंबंधी माझे हृद्गत आहे तसे व्यक्त करावे, एवढाच आहे.

कवी दत्त हा अर्वाचीन काव्यवाङ्मयात स्वयंतेजाने झळकणारा पहिल्या प्रतीचा ठळक तारा आहे. त्याने आपल्या ओजस्वी किरणांनी अभिज्ञ वाचकांस वेळोवेळी चकित केले आहे. तेव्हा आता त्याच्याशी नवीन परिचय करून देण्याची अपेक्षा राहिली नाही. तत्रापि, प्रत्येक वेळी श्रवण होण्याबरोबर अंतःकरण प्रसन्न व्हावे, व मुखाने गुणानुवाद निघावे, हे कारण व कार्य यातील सहजाकर्षण जसे सुरेल संगीतास, तसेच सुरस काव्यासही लागू आहे. या पुस्तकातील कित्येक कविता मासिकादिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या आहेत, वाचनात आल्या आहेत, व व त्यांतील काव्यगुण रसिकांच्या ध्यानात आहेत, तरीपण, येथे कवी दत्त यांचे सुंदर चित्र, त्यांच्या चिरंजीवानी प्रयासाने माहिती मिळवून लिहिलेले तपशीलवार चरित्र आणि मनोवृत्ती उचंबळून आणणारे माझ्या मित्राचे तेच ते गोड काव्यालाप, या सर्वांचा मजेदार संगम झालेला पाहून मला हे सारे जुन्याचे नवे दिसते. याने माझा दिवंगत मित्र मजपाशीच आहेसे भासते. मागील सुखाचे दिवस व प्रसंग परावर्तन पावून दृष्टीपुढे दिसतात, सागराची कडवी-खारट भरती ओसरून गेल्यानंतर नदीच्या मुखाप्रमाणे वियोगदुःखाला गोडी येते, मित्राचे ओळखीचे काव्यशब्द कानांत घुमतात, व माझ्या हृदयाचे पाणी नेत्रांनी आणि मनाच्या संवेदना मुखाने बाहेर येतात.

सुंदर चेहऱ्याला शिफारशीची जरूर नसते. तो जनदृष्टी आपोआप वेधून घेतो, आणि पाहणारांच्या मनात आपल्याविषयी प्रेमादर उत्पन्न करितो. इतकेच नव्हे, पण क्वचित् प्रसंगी तो समोरील मनुष्याच्या अंतर्यामी विरोध किंवा शत्रुत्व असल्यास त्याला विरजण घालून त्याच्या जागी मित्रभाव स्थापन करितो. पुस्तकातील कवीचे चित्र पाहून माझ्या या म्हणण्यातील सत्यता ध्यानी येईल. पहा ! या चेहऱ्यात सौजन्य बिंबले आहे, या डोळ्यात असामान्य बुद्धिमत्तेची चमक आहे, या दृष्टीत निसर्गाचे निरीक्षण करण्याची उत्कंठा व गुणग्राहकता आहे, आणि एकंदर मुखचर्या हे गृहस्थ मोठे मनमिळाऊ, रंगेलेरसिक व कवी असल्याची साक्षी देत आहे. ‘आकृतिरेव गुणान्कथयति.’ अर्थात ही खूण पटल्यानंतर यांजवर प्रेम करा, यांजविषयी सहानुभूती ठेवा; अशी प्रेक्षकांस निराळी शिफारस करण्याची अपेक्षाच नाही. हा अर्वाचीन कविमंडळातला मोहरा, वैणिक काव्यातील शृंगार व करुण रसांचा मिठा संगम, महाराष्ट्राच्या उमेदीचा उमदा तुरा आणि मराठी कवितादेवीचा मूर्तिमंत प्यारा कलेजा ! आता आहे म्हणू की नाही

म्हणू, हे मात्र माझे मलाच कळत नाही. कारण, नाही म्हणतो, तर आपल्या यशोदेहाने येथे हा आहे तसा दिसत आहे, आणि आहे म्हणावा, तर "बोलत का नाही? गडे तू बोलत का नाही?" असे हा म्हणतो की मी म्हणतो, या व्यामोहात पडून माझे मन गोंधळून जाते. अरेरे! वयाच्या ऐन वसंतात, प्रतिभेने अनत नभोमंडळामध्ये नजर पोहचत नाही अशा उंच ठिकाणी याला घेऊन भराऱ्या मारण्यास नुकता कोठे आरंभ केला, इतक्यात लुटारू काळाने एका झडपे-सरसा यास तिजजवळून हिसकून घेतला, आणि हा हा म्हणता रसातली घातला!

कवी दत्त यांचा माझा परिचय ते बी. ए. होऊन बडोद्यास आल्यावर सन १८९८ साली झाला. या वेळी येथे प्लेगाने केवळ प्रलय मांडिला असल्याने मी शहरापासून दूर श्रीभीमनाथ महादेवाच्या धर्मशाळेत रहात होतो, आणि कवी दत्त हे माझ्या मुक्कामापासून सुमारे मैल दीड मैलाच्या अंतरावर लक्ष्मीविलास राज-महालाच्या रस्त्यावरील 'क्लब'जवळच्या एका घरात राहत असत. पण इतक्या दूरवर थंडीच्या कडाक्यातून ते दररोज रात्री मजकडे पायी चालून येत होते. शनिवारची रात्र, व रविवारचे अहोरात्र म्हणजे काव्यानंदातील जीवश्च कंठश्च समागम. मध्यरात्री थंडगार खारी हवा सुटून आमच्या कुडाच्या घरात, धगधगीत शेगड्यांजवळ देखील दंतवीणा वाजत असता, आणि बडोद्यासारख्या सुमारे दोन लाख वस्तीच्या शहरात रोजचे मृत्यूचे प्रमाण ८० वर येऊन आसपास चितांच्या ज्वाला व हाहाःकार चालू असता, कवी दत्त यांच्या सख्या वसंतवाताने बहार केली. रात्रीच प्रभात होऊन जाई लतिकेनिशी मुग्धकलिका झुलून राहिली; आणि कोकिल-कूजित ऐकून बवसी अंत किती राजसे हे मोहक प्रियाराधन होऊ लागले! संगीत उत्तररामचरित्राची उभारणीही याच वेळी चालू होती. पण हा कडू काळांतील गोड समागम पुरता एक वर्षही लाभला असेल नसेल, इतक्यात येथेच—

**"बा नीज गडे नीज गडे लडिवाळा**
**निज निज माझ्या बाळा!" इ०**

हे हृदयंगम करुणगीत गाऊन गुजरातच्या देवभूमीने कवीलाच आपल्या अंकावर दिव्यनिद्रा लाविली. झाले. सारेच जेथले तेथे राहिले; आणि या संसारातील सुखे दुःखसंभिन्न असून ती देखील

**"सुख पहाता जवापाडे दुःख पर्वता येवढे"**

या प्रमाणाने एकमेकांशी मिसळिली आहेत, हा अभंगानुभव कसा चटकन आला ! तरी पण इतक्या स्वल्प अवधीत कवी दत्त यांनी आपल्या चांगुलपणाने मला त्यांचा कायमचा स्नेही करून ठेविले आहे.

त्यांचा एकंदर जीवनकाल ( जन्म ता. २६–६–१८७५ मृत्यु ता. १३–३–१८९९=२३ वर्षे ८ महिने व १८ दिवस ) केवळ सुमारे २४ वर्षांचा असून वर लिहिल्याप्रमाणे सन १८९८ पूर्वीची त्यांजविषयीची विशेष माहिती मला नव्हती. आता ती चि. घाटे यांनी जुन्या ओळखीपाळखीच्या माहितगार लोकांकडून प्रयासाने मिळविली आहे, व तिजवरून त्यांनी आपल्या वडिलांचे हृदयंगम चरित्र विस्तारपूर्वक लिहून ते या सोबत जोडिले आहे, त्यावरून कळून येते. त्यांच्या साद्यंत चरित्राचे पर्यालोचन करिता—

**" काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति मिळवावी ॥**
**चटक लावून सोडावी । काही एक ॥ "**

या समर्थांच्या बोधवचनाप्रमाणेच ते वागले; असे दिसून येईल. त्यांचे वडील कै. कोंडो राणोजी घाटे, हे अहमदनगरातील एक जुन्या काळचे मराठा गृहस्थ असून प्रमुख व धनसंपन्न वकील होते. कवी दत्त हे त्यांचे एकुलता एक पुत्र असत. तथापि, त्यांनी आपले पूर्व वय केवळ ख्यालीखुशालीत न घालविता चांगली विद्या केली, कलकत्त्याच्या विद्यापीठातील बी. ए. ची पदवी मिळविली. मराठी, इंग्रजी व संस्कृत वाङ्मयांच्या परिशीलनाने रसिकता संपादन केली. निसर्गनिरीक्षणाने, तसेच चित्रकला, सतार व पेटी वगैरे वाद्यकलांच्या अभ्यासाने त्यांनी आपली अभिरुची संशुद्ध व नाजूक करून घेतली. स्वयंसिद्ध प्रतिभेच्या जोरावर या ग्रंथात गुंफिलेली सरस रमणीय काव्ये करून रसज्ञ वाचकांच्या मनांस चटक लाविली. व मराठी साहित्यात आपले नाव चिरस्थायी करून ठेविले. आणि हे सर्व कार्य त्यांनी अज्ञानपणाची सहा वर्षे वजा जाता बाकीच्या सुमारे अठरा वर्षांच्या अवकाशात आटोपून

**' स्वप्नेन्द्रजाल सदृशः खलु जीवलोकः । '**

या भरतवाक्यानिशी आपल्या चरित्रनाटकाचा शेवटचा पडदा टाकिला. त्यांचे जीवनचित्र महाराष्ट्रातील होतकरू पिढीस उदाहरणीय असून ते मराठा जातीस भूषणावह आहे.

येथपावेतो हे पुस्तक आणि कवी दत्त यांच्या चरित्रासंबंधाने मला जे अगदी सारांशाने लिहावेसे वाटले, ते लिहिले. आता त्यांच्या कवितांचे विवेचन करावयाचे. पण हे काम टीकाकारांचे आहे, व ते सौहार्दाने किंवा नैष्ठुर्याने करण्यास त्यांना वृत्तपत्रे, मासिके, यांतून मुबलक जागा आहे. तेथे ते आवश्यक वाटल्यास पुढील काव्यातील अवतरणे देऊन त्यांच्या मताप्रमाणे त्यातील गुणदोषांचे विवेचन विस्ताराने करितील, व त्यांच्या म्हणण्यातील ग्राह्याग्राह्यतेबद्दल वाचकांकडून विचारही होईल. मित्रत्वाच्या नात्याने माझे कर्तव्य फक्त या कवीतील आणि त्यांच्या काव्यातील गुणांचे थोडक्यात दिग्दर्शन करून वाचकांच्या मनात त्यांजविषयी औत्सुक्य व जिव्हाळा उत्पन्न करावा इतकेच आहे. ते मी करितो.

हे कवी निसर्गाचे एकनिष्ठ उपासक असत, असे वर म्हटलेच आहे. फुरसत मिळाली पुरे, की कोठेतरी त्याच्या सान्निध्यात जाऊन सृष्ट सौंदर्याचे निरीक्षण करण्यात ते दंग व्हावयाचे, आणि रंगले की लागले गुंगावयाला. या योगानेच त्यांच्या काव्यांपैकी बहुतेक कविता सृष्टिवर्णनपर होऊन त्यातून नैसर्गिक प्रेम, नाजूक अभिरुचि, माधुर्य आणि मार्दव हे गुण जागोजाग बोलून उठतात. ‘ मुग्धकलिका ’, ‘ कुसुमलालन ’, ‘ कोकिलकूजित ’, ‘ फुलांनो चला ’, ‘ देवाजीची सर्व मुले ’, या त्यांच्या कविता वाचिल्या असता माझ्या वरील म्हणण्यातील सत्यता ध्यानी येईल. सृष्ट सौंदर्याच्या वर्णना उपरान्त ‘ बाई लतिके ’ ‘ सख्या वसंतवाता ! ’, ‘ प्रतिभाविहंगा ’, ‘ विश्वामित्रीच्या काठी ’, ‘ नवे पान उघडिले ’ ‘ लक्ष्मीविलास–मनोरा ’, इत्यादि कवितांतून त्यांचे कल्पनाचातुर्य ओजाने झळकत आहे. ‘ प्रभात ’ ही भूपाळी त्याच्या ठायी वसत असलेले उत्साह, पावित्र्य, व ईश्वरप्रेम हे मनोभाव व्यक्त करिते. ‘ तरुवरा ! ’ या नीतिपर सचेतन–गुणोक्तीने निस्पृहता, भूतवात्सल्य, व औदार्य या सद्गुणांशी त्यांचे सख्य दिसून येते. ‘ मित्रा विहंगा ! ’ या द्राक्षापाकात, भूतदयेशिवाय पारतंत्र्याविषयी त्यांची तीव्र संवेदना व स्वातंत्र्याविषयीची उत्कंठा प्रकट होत आहे. ‘ वर्षप्रतिपदा ’, ‘ भगवा झेंडा ’, ‘ मावळ्यांस आमंत्रण ’, या कवितांतून त्यांचा स्वदेशाभिमान व स्वतःविषयीचा म्हणजे स्वराष्ट्राविषयीचा बोज दिसून येतो. ‘ यत्र यत्र हरिणीदृशांक्रमः ’, ‘ लाडके ’, ‘ स्वप्नभेट ’, इत्यादि शृंगारिक कविता जरी त्यांची रंगेलवृत्ति दाखविणाऱ्या असल्या, तत्रापि ते फार विनयशील व चतुर असत, असे ‘ स्वप्नभेट ’, ‘ प्रिये कवितासुंदरी ’ व ‘ बघसी अंत किती राजसे ’ या त्यांच्या

काव्यांवरून चाणाक्ष वाचकांच्या लक्षात येईल. ही काव्ये मोठी खुबीदार आहेत. पैकी पहिल्यामध्ये त्यांनी आपल्या प्रियेशी केलेला शृंगारिक विनोद स्वप्नात अंतर्धान केला आहे. दुसरे काव्य लिहिताना त्यांस त्यांच्या प्रियेचा विरह झालेला असून तत्संबंधी तीव्र संवेदना त्यांनी कवितेच्या म्हणजे प्रतिभेच्या विरहावर आरोपिल्या आहेत. पण वस्तुतः जर त्यांस प्रतिभेचा विरह झाला असता, तर हे काव्य त्यांजकडून झालेच नसते हे उघड आहे. आणि तिसरे काव्य लिहिताना ते सुरम्य निसर्गमंदिरात आपल्या प्रियजनाच्या समागमामध्ये केवळ रंगून जाऊन प्रिया व प्रतिभा या दोघींचा एकसमयावच्छेदाने अनुनय करीत आहेत. दुसऱ्या कवितेत कवीची अंतर्दृष्टी बिंबावर आणि बाह्यदृष्टी प्रतिबिंबावर आहे; व तिसऱ्या कवितेत बिंब आणि प्रतिबिंब यांजवर समान दृष्टी आहे. त्यात विरहाची कल्पना केवळ उसनवार म्हणजे काव्यरसाला लज्जत देण्यापुरती आहे. वास्तविक विरह कवितेचाही नाही व कामिनीचाही नाही. ही तिन्ही काव्ये सरस रमणीय आहेत. 'निज नीज' व 'एका आसन्नमरण' ही करुणगीते ऐकून खडकालाही पाझर फुटतील ! मग मानवी हृदये द्रवल्यास त्यात नवल नाही. 'शेवटचे मागणे' या कवीतेवरून कवी दत्त यांची लीनता व प्राचीन कवींविषयी आदरबुद्धि व्यक्त होत आहे.

याप्रमाणे प्रस्तुत ग्रंथात गोविलेल्या काव्यांपैकी विशिष्ट कवितांचा नामनिर्देश करून त्यातील ठळक गुण सांगितले, व त्या त्या कवितांतून बिंबणारे कवीचे मनोभाव आणि त्यांच्या आंगचे सद्गुणही दर्शविले आहेत. तथापि, अनेक प्रकारची पक्वान्ने व पानके पुढे ठेविल्यानंतर त्यांचे स्वाद घेणारांस त्या पदार्थांच्या वर्णनपत्रकाची जितकी अपेक्षा असते, तितकीच येथे वाचकांस माझ्या म्हणण्याची आहे. ही काव्ये ते स्वतःच आस्थेने वाचून त्यातील सुरसांचा साक्षात् अनुभव घेतील, व ती करणाऱ्या माझ्या कविमित्राविषयी आपल्या मनात प्रेमादर ठेवितील अशी मला आशा आहे.

प्रिय दत्त ! आपण इहलोकी असता आपली जी उत्कट इच्छा होती, ती आज आपल्या चिरंजीवांनी या प्रमाणे नावारूपास आणिली आहे, व त्यायोगे आपले येथील जीवितकर्तव्य त्यांनी पूर्ण व चिरायू केले आहे. लहानपणी ज्यांनी केलेल्या खोडीवर आपण रागास न येता उलट गमतीखातर 'बाललेखन' ही कविता लिहिली, ती या पुस्तकात नमूद आहेच. पण ती खोडी करणारे आपले

चिरंजीव आज एम्. ए. म्हणजे चांगले अधिकारसंपन्न होऊन त्यांनीच हे सत्कार्य केले, याबद्दल मला फार कौतुक वाटते. आपल्या मानसिक ध्येयाला त्यांनी हे अक्षर शरीर दिले आहे, व हेच आपले स्मारक होय. मराठी वाङ्मयमंदिरात महाराष्ट्रीयांपुढे हे स्मारक ते प्रगट करीत असता मी त्यांजपाशी व आपल्या राष्ट्रासन्मुख आपला तसाच सर्वांचा मित्र म्हणून उभा आहे. हे स्मारक पाहून मला संतोष वाटतो. यातील कविहृदय वाचून मला आनंद होतो. या यशोदेहाने माझा कविसखा भूलोकी—मजपाशी—आहे, असे मी मानितो. त्याचा जीवात्मा परमात्म्याशी मिळून तो येथे सर्वत्र भरून राहिला आहे, हा वेदान्त मला ऐकून ठाऊक आहे. आणि

"**व्यर्थं भूतानि शोचन्ति नष्ट आत्मेति शङ्कया।**"

हा वसिष्ठांचा स्पष्ट बोधही मला कळतो. तरी पुन्हा प्रिय दत्त! आपण मला सोडून गेलात! असे हळहळून मी रडतोच आहे. हे काय असावे? खरोखर, माझे मन मला ग्वाही देऊन सांगते, की, आपणावरील हे माझे अक्षय्य व अकृत्रिम प्रेम आणि हेच माझे हृद्गत.

बडोदे
डिसेंबर १९२१

**चंद्रशेखर**

# दत्तांचा परिचय

दत्तांचा जन्म २६ जून १८७५ रोजी झाला, व १३ मार्च १८९९ या तारखेस त्यांनी देहविसर्जन केले. दत्तांचा इहलोकी वास तेवीस वर्षे, आठ महिने व अठरा दिवस होता. महाराष्ट्रवाङ्मयात इतक्या लवकर अवतारकृत्य संपवून परलोकी जाणाऱ्या कवीचे श्रीज्ञानेश्वरांच्या नंतर हे दुसरे उदाहरण ! चोवीस वर्षे ह्मणजे किती अल्पकाल ! या अल्पकालात दत्तांनी महाराष्ट्रकवींत उच्चस्थान मिळविले, वादनकलेत अप्रतिम नैपुण्य संपादन केले, नाट्यकलेत बहुमानाची जागा मिळविण्याचा प्रयत्न केला व वयाच्या मानाने अभिनंदनीय अशी देशसेवा केली; संस्कृतकाव्यपरंपरा सुटून महाराष्ट्रकवितेस नवे वळण लागण्याच्या जोखमीच्या संधिकाली संस्कृत काव्यातील उत्तम गुणांना आंग्ल काव्यविचारांशी एकजीव करून त्यांनी मधला खंदक भरून काढला. या चोवीस वर्षांत काय भरले आहे हे आता पाहणे आहे.

आमचे राहण्याचे मूळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदे. हे गाव सोडून आमची कोणची पिढी नगरास आली ते समजत नाही. तथापि माझे पणजे राणोजी-राव यांचे धाकटे बंधु शंकरराव हे नगरास राहत होते अशी खात्रीलायक माहिती मिळते. राणोजीरावही कदाचित आपल्या बंधूसह नगरास आले असतील. माझे निपणजे मथाजी यांच्याविषयी मला काही माहिती मिळाली नाही; परंतु यांचे पूर्वज व कदाचित हे स्वतःही व्यापार करीत असत, असे माझे एक चुलत चुलते कळवितात. "आपले पूर्वज पूर्वी या देशाचा माल बैलांच्या तांड्यावरून दूर देशी नेऊन विकत असत. बैलांचे तांडे मोठाले असून त्यांच्या गळ्यांत मोठमोठ्या घांटा बांधीत असत. कोणी विचारिले असता हा तांडा घांट्यांचा आहे असे सांगताच ओळख पटत असे. या प्रघातामुळे

मूळच्या आडनावाचा लोप होऊन ‘ घाटे ’ हे नवीन नाव पडले व तेच पुढे चालू झाले. ” ही हकीगत माझ्या पणजीने सांगितलेली असल्यामुळे ती विश्वसनीय असावी असे वाटते.

माझे आजोबा कोंडोजी व त्यांचे वडील बंधू धोंडोजी यांच्या बालपणीच त्यांच्या वडिलांचा म्हणजे राणोजीबुवांचा अंतकाल झाला. यावेळी त्यांचे चुलते शंकरराव नगरास उद्योग करीत होते. बालपणी आजोबांचे शिक्षण थोड्या चमत्कारिक परिस्थितीत झाले. तो काळ म्हणजे ५७ सालच्या बंडाच्या आधीचा— निदान अगदी जवळचा असा होता. आमच्या मराठा जातीत, किंबहुना सर्व मागासलेल्या वर्गात शिक्षणाची गोडी उत्पन्न झालेली नव्हती. विद्या प्राप्त करून लिहिण्या-वाचण्याची नौकरी करावयाची हे ब्राह्मणांचे काम असा सर्वांचा समज असावयाचा. लिहिणे शिकावयाचेच तर आपली पोटापुरती दोन अक्षरे, व ती झाल्यावर आपापल्या धंद्यात पडावयाचे ही त्या वेळची प्रवृत्ती. अशा स्थितीत आजोबांच्या मनात अल्पवयात शिकण्याची लालसा उत्पन्न झाली. घरी राहून ही लालसा तृप्त होईल असा रंग दिसेना; उलट घरच्या गरिबीच्या स्थितीमुळे त्या वयातच बनेल तसा रोजगार करणे प्राप्त झाले, तेव्हा आजोबा नगर सोडून पुण्याच्या वाटेला लागले. काही प्रवास केल्यावर त्यांना एका बैलगाडीत जागा मिळाली. याप्रमाणे ते पुण्यास येऊन पोहोचले. नगरास असताना गणेश हरि या नावाचा त्यांचा एक ब्राह्मण संवगडी होता, तो या वेळी पुण्यास राहत होता व त्याचा बाप आपल्या शिकण्याची काही तरी सोय लावील अशा विश्वासाने आजोबांनी ही मजल मारली होती. पुण्यास प्रथम एका देवळात मुक्काम करून ते आपल्या मित्राच्या घराचा शोध करू लागले; प्रयासाने शोध लागला व आशा धरल्याप्रमाणे शिकण्याची सोयहि झाली. रा. गणेश हरि यांच्या घरी राहावे, त्यांच्या वडिलांनी व मातोश्रींनी सांगितलेली घरातील कामे करावीत व विद्या संपादन करावी असा आजोबांच्या पुण्यातील आयुष्याचा क्रम होता. हे विद्यार्जन लवकरच संपले. मराठीचे अध्ययन त्या वेळेच्या पद्धतीप्रमाणे यथासांग झाले, आणि इंग्रजीही दोन तीन बुकांपर्यंत मजल गेली. कोणी सांगतात इंग्रजी येण्यापूर्वीच आजोबांनी पुणे सोडले व रा. मुळ्ये नावाच्या एका अंमलदारांच्या वशिल्याने साताऱ्यास नौकरी धरली. पुढे त्यांना इंग्रजी येत नाही हे ‘ साहेबास ’ समजेल या भीतीने या गृहस्थांनी त्यांना इंग्रजी सही शिकविली. कोणी सांगतात,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

आजोबांचा इंग्रजी अभ्यास नगरासच त्यांचे चुलते रा. शंकरराव यांचे घरी झाला. काही असो आजोबांनी शिक्षण धाडसाने संपादन केले यात शंका नाही.

यानंतर आजोबांनी दोन तीन नौकऱ्या केल्या. काही दिवस ते रेल्वेत होते. शेवटी १८७० च्या सुमारास ते नगरास स्थायिक झाले.

नगरास येण्यापूर्वी आजोबांचे लग्न झालेले होते. माझ्या आजीचे गाव पुणे. आजीचे नाव बाळूबाई असून ती हरफळे घराण्यातील होती. तिचे पूर्वज वारकरी होते, व संतमंडळीत त्यांची गणना होत असे. आजीचे मामा गणूमामा यांच्या घरी श्रीविठ्ठलाच्या भजनाचा सारखा जयघोष होत असे. ही सर्व मंडळी सात्त्विक, भाविक व भोळी होती. स्वतःच्या आजीच्या भोळेपणाची एक आख्यायिका आजी मला सांगत असे, ती अशी : त्या वेळी धामधुमीच्या काळात मुलुखगिरी करून कमावून आणलेली संपत्ती घरात असे. ती मडक्या-गाडग्यात किंवा जमिनीत असावयाची. म्हातारीचा भोळेपणा माहीत असल्यामुळे शेजारीपाजारी म्हणावयाचे ‘अहो बया ! त्या मोहरा कुजल्या विजल्या असतील, जरा बाहेर काढून पाखडा.’ ‘खरेच रे बाबा !’ म्हणून म्हातारी मोहरा बाहेर काढून पाखडीत बसावयाची. सुपातून मोहरा खाली पडल्या की जमलेल्या लोकांनी ‘छे छे अगदीच कामातून गेल्या !’ असे म्हणावे. म्हातारीस ते खरे वाटून त्या पडलेल्या मोहरा तशाच टाकून ती बाकीच्या घेऊन घरात जाई. इकडे लोक त्यांना तशा पडू देत नसत हे उघड आहे. माझ्या आजीची मावशी प्रसिद्ध त्रिंबकजी डेंगळ्याची सून होती.

नगरास घर करण्यास जेव्हा हे जोडपे आले, त्यावेळी त्यांची सांपत्तिक स्थिती फार वाईट होती. आजीने रात्र पडल्यावर आजोबांचे उपरणे नेसून नेसते लुगडे धुवावे, वाळवावे व तेच परत नेसावे, परंतु शेजाऱ्यांसही या स्थितीचा पत्ता लागू देऊ नये. ती एक असामान्य स्त्री होती. तिचा दृढनिश्चयी स्वभाव, करारी-पणा, दूरदर्शीपणा, बुद्धिसामर्थ्य आणि आत्यंतिक स्वार्थत्याग करण्याची सदैव तत्परता, हे व यांच्या जोडीचे अनेक गुण अवर्णनीय होते. या कठोर व पुरुषी गुणांवर तिच्या भाविक वृत्तीने व आपल्या कुटुंबातील माणसांविषयी वसत असलेल्या प्रेमळ भावाने ओलावा फिरविला होता. बालपणी ऐकिलेल्या प्रेमळ अभंगांची सावली तिच्या दुःखी पण विविधस्वरूपात्मक आयुष्यावर पसरली होती. याच सावलीत दत्त वाढले. कोणी कोणाला जर कधी कवी करीत असेल तर आजीने

दत्तांना कवी केले असे मी म्हणेन. दत्त असेच म्हणत व आपल्या स्नेह्यांजवळ आपल्या आईची श्रद्धापूर्वक स्तुती करीत. आजीचे संस्कार दत्तांवर कसे घडले ते ओघाने पुढे येईलच.

आरंभी इकडे तिकडे रोजगार करून १८७४–१८७५ च्या सुमारास आजोबांनी मुखत्यारी मिळविली व ते कोर्टात जाऊ लागले. त्या वेळी नगरास वकील फार थोडे होते; त्या वेळच्या 'साहेब' अंमलदारांची वृत्ती हिंदी लोकांविषयी स्निग्ध असे व हिंदी अधिकारीही जनतेत मिसळत व आपल्या हाताखालच्या व जवळपासच्या माणसांना प्रेमभावाने वागवीत. शिवाय त्या वेळी इंग्रजी भाषेस इतके महत्त्व मिळाले नव्हते. अशा अनुकूल परिस्थितीत आजोबांसारख्या महत्त्वाकांक्षी व बुद्धिमान मुखत्याराचा उदय होण्यास वेळ लागला नाही. याच सुमारास दत्तांचा जन्म १८७५ च्या जून महिन्यात झाला. या पुत्रप्राप्तीनंतर आजोबांचा भाग्योदय होण्यास सुरवात झाली व दत्तांच्या निधनानंतर परत वाईट दिवस आले; पण ते पुढे पाहू. एवढे मात्र खरे की, दत्त आमच्या घराण्यात भाग्यशाली पुरुष होऊन गेले.

दत्तांचे बालपण कशा प्रकारच्या स्थितीत गेले हे पाहणे मोठे मनोरंजक आहे. घरची स्थिती पुष्कळच सुधारली होती. पोटापाण्याची विवंचना नाहीशी झाली होती व आजोबा नगरचे एक प्रमुख नागरिक होत चालले होते. सार्वजनिक कार्यात ते आता मन घालू लागले. त्यावेळच्या राजकारणाचा पसारा फारसा वाढला नव्हता. नगरास पार्शी व मुसलमान एका बाजूस व सुशिक्षित हिंदु एका बाजूस, असे दोन पक्ष त्या वेळी होते. यांत पार्शी अल्पसंख्याक असूनही वजनदार होते. दोन्ही पक्षांमध्ये म्युनिसिपालिटीच्या सभांत रणे माजत व चेअरमनच्या निवडणुकीच्या वेळी सोनपत पानपत गाजे. आजोबा अर्थातच हिंदुपक्षात असत. या धामधुमीमुळे आम्ही नव्या पेठेत कारंज्याजवळचा वाडा खरेदी केल्यावर या वाड्यात त्या वेळचे वकील व इतर पुढारी मंडळी यांच्या हरहमेशा मजलसी व्हावयाच्या, मसलती चालावयाच्या. या सर्व मंडळींचे आदरातिथ्य आजीच्या देखरेखीखाली यथायोग्य होत असे. हा प्रकार साधारणतः रोजचाच असे. या योगाने आमचे घर नेहमी भरलेले दिसे.

नगरास आल्यावर आजोबांचे लक्ष या सार्वजनिक चळवळीशिवाय नगरच्या र्थनासमाजाकडे लवकरच वेधले. परवा मी मुद्दाम नगरास या लेखाची सामग्री

जमविण्यास गेलो असता प्रार्थना समाजाचे जुने कागदपत्र पाहिले. त्यात जुनी म्हणण्यास एक जमाखर्चाची वही सापडली. हिच्यात जमाखर्चाचा आरंभ १८८२ पासून आहे व तेव्हापासून आजोबांची वर्गणी जमा आहे. याच्या आधीच काही वर्षे ते सभासद असावेत. नगरास प्रसिद्ध परोपकारी पुरुष रा. लालशंकर उमियाशंकर यांनी प्रार्थनासमाज स्थापिला. समाजावर जुन्या मताभिमान्यांचा कटाक्ष असे व संधि मिळेल तेव्हा समाजास त्रास देण्यास ते कमी करीत नसत. तथापि आतासारखी तेव्हा शिकलेल्या मंडळीची समाजाकडे उदासीन वृत्ती नव्हती. रा. शंकर पांडुरंग पंडित, रा. ब. मोरो चिंतामण जोशी वगैरे मोठे विद्वान अधिकारी समाजाचे सभासद व आश्रयदाते असल्यामुळे कोणी सद्धेतूने, तर कोणी वरिष्ठांच्या नजरेस पडावे म्हणून समाजाचे सभासद झाले. तथापि खरोखरीची आस्था बाळगणाऱ्यांची संख्या काही कमी नव्हती; व म्हणूनच समाज लवकर भरभराटीला आला. याचे बरेचसे श्रेय आजोबांना द्यावे लागेल. समाजाच्या उत्कर्षासाठी त्यांनी फार श्रम घेतले. ते बरीच वर्षे सेक्रेटरी होते. बंगाल, मद्रास, मुंबई वगैरे ठिकाणच्या ब्राह्मसमाजाच्या किंवा प्रार्थनासमाजाच्या प्रसिद्ध उपदेशकांना वार्षिक उत्सवास व अन्य प्रसंगी नगरास बोलावून आजोबांनी समाजात चैतन्य आणिले. आमचे घर समाजाच्या मंदिरापासून जवळ व शिवाय प्रशस्त असल्यामुळे ही बाहेरगावची पाहुणे मंडळी आमच्याकडेच उतरत; यांच्या आदरातिथ्याची सर्व व्यवस्था अर्थात आजीसच करावी लागे. या मंडळीत त्या वेळच्या एकेश्वरी पंथातील बरेच प्रसिद्ध पुढारी असत. मुंबईहून महर्षी रानडे, डॉ. भांडारकर हे नगरास अनेक वेळा येऊन गेले. बंगालहून आदिब्राह्मसमाजाचे अध्वर्यू व प्रसिद्ध कवी डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे वडील महर्षी देवेंद्रनाथहि कदाचित आमचे घर आपल्या पादस्पर्शाने पावन करून गेले असावेत असे आजीच्या सांगण्यावरून वाटते. या येणाऱ्या मंडळीतील काहीजणांच्या रीतिभाती, खाण्यापिण्याची पद्धत व वेळा काही विलक्षणच असावयाच्या. या सर्व भानगडी आजीस सांभाळाव्या लागत. मुंबईचे त्या वेळचे एक प्रसिद्ध उपदेशक नगरास मधून मधून येत. हे दुर्वासऋषीसारखे शीघ्रकोपी होते. सांगितलेले काम वेळेवर झाले पाहिजे, मागितलेली वस्तू ताबडतोब आली पाहिजे; जेवण्याखाण्यात जरा इकडच्या तिकडे झाले तर स्वारी ताट फेकून उठावयाची. त्यांच्या पुढे सर्वांनी हात टेकले होते; परंतु आजी त्यांच्या मिजासीस पुरून उरली. म्हातारा मरेपर्यंत आजीचे स्मरण करीत असे. याप्रमाणे

नगरच्या प्रमुख मंडळीच्या बैठकीच्या जोडीला, दत्तांच्या लहानपणी व पुढे ते मॅट्रिक होईपर्यंत या पहिल्या मंडळीहून अत्यंत भिन्न अशी ही धार्मिक सांप्रदायाची मंडळी मधून मधून घरी असे. या वातावरणात दत्तांचे बालपण गेले. थोर विभूतींचा अशा वयात त्यांना सहवास घडला व त्यांची पवित्र वचने कानी पडली. सार्वजनिक चळवळीचा काथ्याकूट नेहमी कानावर येऊ लागला; परंतु या सर्वांपेक्षाही ज्या काव्य व ललितकलातील नैपुण्याबद्दल त्यांची पुढे ख्याती झाली ते गुण या कोलाहलात ते आपल्या आईपासून शिकले. माझ्या आजीस गाण्याची फार गोडी होती व तिचा आवाजही फार मधुर व प्रेमळ असे. दत्तांनी पाळण्यातूनच तुकाराम, नामदेव यांचे प्रेमळ अभंग व प्रार्थनासंगीतातील सुंदर भजने व आरत्या ऐकिल्या. जन्मतः काव्यप्रतिभा घेऊन आलेल्या कवीच्या बालपणातील कोमल मनावर या सुंदर व प्रेमळ भजनांचा किती महत्त्वाचा परिणाम घडला असेल बरे! अपरिचित, अंधुक व स्वप्नमय जगात फड फड पंख हालविणाऱ्या कोवळ्या प्रतिभेस हा प्रकाश उषःकालाच्या पवित्र व ताज्या तेजाप्रमाणे किती उत्साहजनक भासला असेल!

दत्तांच्या बालपणाबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही. ते शरीराने कधीच सुदृढ नव्हते व बालपणी सामान्यतः आजारीच असत. परंतु खेळण्याकडे व उडण्याबागडण्याकडे त्यांची त्या वेळी प्रवृत्ती होती असे म्हणतात. एकांतात बसून केशवसुतांप्रमाणे चिंतन करण्याची लहानपणी त्यांना सवय नसावी. घर जरी मोठे होते तरी येणारे जाणारे पक्षकार, आजोबांचे स्नेही, पाहुणे रावळे व घरांतील नेहमीची माणसे यांच्या गलबल्यात दत्तांना एकांताचा लाभ होणे कठीणच होते. अल्पवयातच दत्तांच्या शिक्षणास सुरवात झाली. देखणे उपनावाच्या एका गृहस्थाने खाजगी शाळा काढिली होती; तिच्यात दत्तांचे मराठी शिक्षण व इंग्रजी २।३ इयत्ता झाल्या. ही शाळा सोडल्यावर थोडे दिवस दत्त नगरच्या सिटी स्कूलमध्ये होते. या सुमारास आजोबांची व नगरच्या ख्रिस्ती मिशनचे मुख्य रेव्हरंड जे. स्मिथसाहेब यांची ओळख झाली. साहेबांच्या आग्रहामुळे दत्तांना मिशन हायस्कूलमध्ये पाठविण्यात आले. मॅट्रिक होईपर्यंत दत्त याच शाळेत होते. साहेबमजकूर नुकतेच अमेरिकेहून आले होते व त्यांचा उत्साह दांडगा होता. मिशनरींनी आजपर्यंत खालच्या जातीतील हिंदुलोकांत धर्मप्रसार करण्याकडे विशेष लक्ष दिले, व शिकल्यासवरलेल्या पांढरपेशा वर्गांत ख्रिस्ती धर्माविषयी आस्था, निदान सहानुभूती, तरी

अनुक्रम ... 71003 ... दत्तांचा परिचय

उत्पन्न करण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे त्यांना दिसून आले, व त्या दिशेने त्यांनी व विशेषतः त्यांच्या उत्साही पत्नींनी आपल्या कामास सुरुवात केली. स्मिथसाहेबांनी नगरचे मिशन हायस्कूल ही एक शिक्षणाची आदर्श संस्था बनविण्याचा उपक्रम केला, व त्यांच्या प्रयत्नाला यशही प्राप्त झाले. नगरास कॉलेज काढीन अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती; परंतु ती सफल झाली नाही. प्रीव्हियसचा वर्ग मात्र काही वर्षे त्यांनी चालविला. मिशनस्कूलमध्ये उत्तम शिक्षकवर्ग त्यांनी आणविला, व या योगाने गावातील मुलेही त्याच शाळेकडे धाव घेऊ लागली. शाळेचे काम सांभाळून या जोडप्याने गावातील प्रतिष्ठित लोकांच्या ओळखी करण्यास सुरुवात केली. मिसेस स्मिथ आपल्या शाळेतील मुलांच्या आयांना भेटण्यास रोज त्यांच्या घरी जात, त्यांना ख्रिस्तांच्या स्तुतिपर गाणी म्हणून दाखवीत आणि लोकरीचे व कशिदाकाम शिकवीत. एका ठिकाणी एका म्हाताऱ्या आजीबाईकडून त्यांचा अपमान झाल्यावर हे काम त्यांना सोडावे लागले. एकंदरीत दोघांनाही विशेष यश आले नाही. परंतु आजोबा स्वतंत्र विचारांचे असल्यामुळे व आजी आपले जुने संस्कार कायम ठेवून वाटेल तशा अपरिचित परिस्थितीत स्वतःस वागवून घेणारी असल्यामुळे मिसेस स्मिथचा व आमच्या घरातील बायांचा स्नेह जुळला व तो शेवटपर्यंत कायम राहिला. दत्त मिशन स्कूलमध्ये गेल्यावर लवकरच स्मिथसाहेब व त्यांच्या पत्नी या उभयतांचा त्यांच्यावर लोभ जमला. विशेषतः स्मिथबाईंना दत्तांविषयी फार प्रेम वाटू लागले व जसजसा सहवास अधिक घडू लागला, तसतसे कालांतराने दत्त त्यांना पुत्रवत झाले. दत्तांनाही या उभयतांविषयी आदर व प्रेम वाटत होते, व त्यांचा बराच वेळ त्यांच्या सहवासात जाई. टेनिस खेळावयाचे म्हणजे दत्त असलेच पाहिजेत. रविवारच्या बायबलच्या वर्गास इतर मुले क्वचितच जात, परंतु दत्तांनी नियमितपणे त्या वर्गाला जाऊन बायबलचा श्रद्धापूर्वक अभ्यास केला. याप्रमाणे या मिशनरी जोडप्याच्या सहवासामुळे दत्तांचा बायबलाशी १४।१५ व्या वर्षीच परिचय घडला व तो आजन्म कायम राहिला. स्मिथसाहेबांच्यामुळे दत्तांच्या नगरच्या अमेरिकन समाजात बऱ्याच ओळखी झाल्या. मिशन स्कूलमध्ये ३।४ वर्षे अभ्यास केल्यावर १८९० साली दत्त मॅट्रिक झाले. त्या वेळी त्यांचे वय १५ वर्षांचे होते.

१८९० सालानंतर दत्तांना पुढील शिक्षणासाठी कधी न सोडलेले आपले घर व नगर सोडावे लागले, नव्या ओळखी झाल्या, नव्या परिस्थितीत रहावे

लागले व त्यांचा जीवनप्रवाह व्यापक स्वरूपाचा झाला. खरोखर मॅट्रिक पास होऊन कॉलेजात जाण्याचा प्रसंग किती मजेदार असतो! खाली पुस्तकात मान घालून अभ्यास करण्याचे दिवस संपले असतात. बापाने करून दिलेले कपडे घालण्याचा, आईने घातलेले अन्न खाण्याचा व घरातील लहान पोरांपोरींबरोबर 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने जे मिळेल त्यावर रात्री निजण्याचा काळ नाहीसा होतो. आईबाप मुलाचा दर्जा ओळखू लागतात व मुलसही आपण कोणीतरी आहोत असे वाटू लागते. कॉलेजच्या अज्ञेय स्वरूपाचे चिंतन करण्याकडे त्याची तंद्री लागते. नव्या उमेदी, नव्या हौशी मनात उद्भवू लागतात, व अपरिचिताच्या व गूढाच्या तोंडओळखीने, भावी अनुभवांच्या अस्पष्ट अपेक्षेने, डोळ्यात एक चमक दिसू लागते. अरेरे! याच्या किती उलट अनुभव कॉलेज सोडते वेळी येतो! आनंदात, निरुपाधिक स्थितीत, जगाच्या—नव्हे आपल्या घराच्याही विस्मृतीत, मित्रांबरोबर प्रेमालापात व भावी आयुष्याची मोहक रूपरेखा रंगविण्यात चार वर्षे भरकन् निघून जातात व वधस्तंभाकडे जाणाऱ्या माणसाप्रमाणे जड पावलांनी कॉलेज सोडणारा तरुण दुनियेच्या भयाण व यांत्रिक जीवनात शिरण्यापूर्वी कॉलेजच्या गेटाजवळील पुलावर हुंदून हुंदून रडून आपले मन हलके करतो. पण हे विषयांतर पुरे.

या संक्रमणकालापूर्वी दत्तांची एकंदर स्थिती कशी होती, याचे येथे सिंहावलोकन करणे अवश्य दिसते. मराठी शाळेपासून मॅट्रिक होईपर्यंतचे त्यांचे शिक्षण सुरळीत झाले. शाळेत अगदी वेळेवर जाणारा, अभ्यासी व हुषार विद्यार्थी अशी त्यांची ख्याती असे. कोणत्याशा परीक्षेच्या वेळेस रात्री झोप येई म्हणून शेंडी खुंटीला बांधून दत्त अभ्यास करीत, असे आजी व त्यांचे स्नेही मला सांगत. त्यांचा नंबरही शाळेत नेहमी वरच असे. हा काळ केवळ विद्यार्थिदशेत विद्यार्जनातच त्यांनी घालविला असावा असे दिसते. घर आणि शाळा, स्मिथसाहेबांचा बंगला व प्रार्थना मंदिर या पलीकडे त्यांची गती नसावी. घरातही त्यांचा व आजोबांचा संबंध क्वचितच येई. वकिलीचा धंदा व तोही वाढता, प्रार्थना समाज व गावातील मित्रमंडळीच्या भेटी या बहुविध व्यवसायात आजोबांना घरात काय चालले आहे, काय नाही याची कधी दाद नसे. आलेले पैसे आजीजवळ दिले की ते गृहकर्तव्यातून मुक्त होत. शिवाय ते अत्यंत मितभाषी असत. ज्या एकुलत्या एक मुलाच्या अकाली मृत्यूने हाय खाऊन त्यांनी प्राण सोडला तो जिवंत

असता कामापुरते चार शब्द बोलण्यापलीकडे आजोबा गेले नाहीत. यावरून त्यांच्यात पुत्रप्रेम नव्हते किंवा पुत्राच्या लौकिकाविषयी त्यांना अभिमान वाटत नव्हता असे काही नाही. दत्तांना त्यांनी आजन्म राजपुत्राच्या ऐश्वर्यात ठेविले हे लक्षण त्यांच्या गाढ प्रेमाचे द्योतक आहे. दत्त लहान असतानाच आजोबांनी त्यांच्या वयाची भिन्न जातीची गरिबांची पाच सहा मुले दत्तांबरोबर अभ्यास करण्यास ठेविली होती. स्वतः गरिबीत कष्टाने विद्या संपादन केली असल्यामुळे विद्यार्थ्यांना मदत करण्यास ते नेहमी तत्पर असत. ह्या घरी ठेवलेल्या मुलांचा सर्वतोपरी सांभाळ करून, त्यांना शिक्षण देऊन आजोबांनी त्यांस मोठे केले. सध्या त्यातील काहीजण चांगल्या हुद्यांवर आहेत. याप्रमाणे दत्तांचे आजोबांनी अनेक प्रकारे लाड पुरविले. परंतु दत्तांना विशेष सहवास असा आजीचाच होता; उलट आजोबांकडे जाण्यास त्यांना संकोच वाटे. आमच्या हिंदु कुटुंबातील हे नेहमीच्या अनुभवातील चित्र आहे. आजोबा घरात नसले म्हणजे दत्त व त्यांचे जोडीदार कधी कधी आंधळ्या कोशिंबिरीसारखे खेळ खेळत. परंतु त्यांचा नेहमीचा आवडता खेळ म्हणजे भेंड्या लावणे. या खेळात आजी व इतर बायामंडळी सुद्धा सामील होत. प्रत्येकजण या खेळाकरिता कसून तयारी करी. कठीण अक्षरांच्या कविता मिळतील त्या पाठ कराव्या, कवितांचे पुस्तक सापडले की कविता मुखोद्गत कराव्या असा सर्वांचा क्रम असे. नवनीत तर सर्वांनाच पाठ असे. आजी परवा परवापर्यंत त्यातील कविता भराभर म्हणे. शास्त्रीबुवांचे मेघदूत तिला पाठ येत असे, व तिनेच ते दत्तांना शिकविले असे त्यांचे एक स्नेही सांगतात. हा भेंड्यांचा खेळ कित्येक तास चालावयाचा, त्यात भांडाभांड्या व्हावयाच्या, कोणी चिडून जात, तर कोणी चमत्कारिक कविता म्हणून हास्यरस उत्पन्न करीत. एकदा ‘ ड ’ च्या सर्व कविता संपल्या व डोके खाजवूनही ‘ ड ’ ची कविता बाहेर पडेना, तेव्हां एका शीघ्र कवीने ‘ डुर डुर डुर डुर डुक्कर करिते ’ असा आरंभ असलेली श्वापदांच्या ध्वनिवर्णनपर कविता तयार केली. असो. दत्तांनी १४।१५ वर्षांच्या वयापर्यंत काव्यरचना केली नसावी असा माझा समज आहे. निदान वृत्तदर्पणी कवितांच्या पलिकडे त्यांची मजल गेली नाही असे त्यांचे एक समवयस्क व समव्यवसायी स्नेही सांगतात. या कविता उपलब्ध नाहीत. गोखल्यांचे गणित पुढे ठेऊन उदाहरणे सोडवावयाची, त्याप्रमाणे वृत्तदर्पण पुढे ठेऊन एखादा दुसरा लहान श्लोक तयार करावयाचा असे प्रथम

चालले असावे. अशा काव्यरचनेचा आरंभ १८८९-९० साली धरल्यास चालेल. ही रचना कशीही असो, इतके मात्र खरे की घरातल्या या नेहमीच्या भेंड्यांच्या खेळाने लहानपणीच दत्तांचे पाठांतर चांगले झाले व शब्द जिभेवर खेळू लागले. पुढील वयात कल्पना सुचली की प्रयत्नाशिवाय अल्पकाळात कविता बने याचे बीज कदाचित् अंशतः या पाठांतरात सापडेल.

मॅट्रिकचा रिझल्ट लागण्याच्या सुमारास दत्तांचे लग्न झाले. माझ्या आईचे नाव चंद्राबाई. माझे आजोळ नगरजवळील सारोळे नावाच्या स्टेशनाशेजारचे घोसपुरी हे गाव होय. आईचा जन्म राजमाने या कुळात झाला. एकुलता एक मुलगा म्हणून आजाआजींनी हे लग्न फार थाटात केले. दोघेहि स्वभावाने खर्चिक व कमावलेल्या दर्जाप्रमाणे वागण्याची दोघांसही हौस, तेव्हा लग्नात पाण्यासारखा पैसा खर्च होणे स्वाभाविक आहे. वरातीच्या टोलेजंग मिरवणुकीची तर जुनी मंडळी अजून आठवण काढते. लग्नाच्या वेळी माझी आई निरक्षर होती व भातुकलीचा खेळ विसरली नव्हती. सासू प्रेमळ असल्यामुळे तिला तो सासरी विसरण्याचे कारणही नव्हते. लग्न झाल्यावर तिला लिहिणे वाचणे व कशिदाकाम शिकविण्यास मास्तरणी येऊ लागल्या व हळूहळू लिहिण्यावाचण्यात जरी विशेष नाही तरी इतर कामात ती चांगली तरबेज झाली.

माझी आई बांध्याने फार ठेंगणी असून ती उज्ज्वल अशा गौरवर्णाची होती. तिचे डोळे विशाल व तिच्या गावच्या हवेप्रमाणे मोकळे व प्रसन्न असत. तिची देहयष्टि अत्यंत नाजूक असे. यामुळे ती एखाद्या लहानशा नाजूक पुतळीप्रमाणे दिसे. दत्त उंच व सडपातळ होते. त्यांचा वर्ण साधारणपणे काळासावळा होता. त्यांचे डोळे तेजस्वी व आकर्षक आणि नाक तरतरीत होते. या त्यांच्या नाकाडोळ्यांची छाप लोकांवर तेव्हाच पडे.

येथपर्यंत दत्त कशा परिस्थितीत वाढले ह्याचे उपलब्ध माहितीवरून यथामति विवेचन केले. स्वतंत्रपणे विचार करण्याची व आपल्या आयुष्यास इच्छेप्रमाणे वळण देण्याची ज्या वयात शक्ति नसते व ज्या वयात मातापितरे, नेहमी सहवास असणारी घरातील माणसे व शाळेतील शिक्षक यांच्या जीवनक्रमाचे व शिकवणुकीचे मनावर संस्कार घडत असतात, त्या वयातील चित्र काढताना चरित्रनायकाची व्यक्ती मागे जाते व मागील Background म्हणजे त्याची परिस्थिती ठळकपणामुळे पुढे आलेली दिसते. या न्यायाने दत्तांच्या येथपर्यंतच्या चरित्रात

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



अनुक्रम........................ कि: ...........

त्यांना दुय्यम स्थान होते व ज्या परिस्थितीचा, ज्या व्यक्तींचा त्यांच्या चरित्रावर विशेष परिणाम घडला, ती परिस्थिति व त्या व्यक्ती स्पष्टपणाने रंगविल्या गेल्या. हेतू हाच की कवीच्या बालवयातील गृहस्थिती, त्याच्या मातापितरांचे स्वभाव, त्यांच्या सवयी, त्यांचे आपल्या मुलाशी वर्तन वगैरे गोष्टी जितक्या स्पष्ट होतील त्या प्रमाणाने वाचकांस कवीच्या मनाची वाढ कशी होत गेली याविषयी अनुमान काढणे सुलभ जावे. यापुढे दत्त आपल्या आयुष्याचे जबाबदार आहेत. यापुढे निरनिराळ्या गावी ते राहिले, काही महत्त्वाचे स्नेहसंबंध घडून आले, बहुविध प्रसंगी बहुविध अनुभव आले व ते त्यांच्या मनास सुखदुःख देण्यास कारणीभूत झाले; तथापि त्यांचे विवेकक्षम मन त्यांच्या परिस्थितीच्या पुढे यानंतर स्पष्ट दिसले पाहिजे.

१८९१ साली दत्त मुंबईच्या वुइल्सन कॉलेजात गेले. इतर कॉलेजांना सोडून या कॉलेजाची निवड करण्यात स्मिथसाहेबांचे अंग असावे. दत्त या कॉलेजात १८९४ अखेरपर्यंत असावेत असे वाटते. १८९३ नंतर ते वुइल्सन कॉलेजात नव्हते असे माझे एक मित्र शोध करून कळवितात; परंतु दत्तांच्या कवितांच्या वहीत १८९४ सालामध्ये वुइल्सन कॉलेजच्या रेसिडेन्सीमध्ये व फ्रेंचरूममध्ये लिहिलेल्या अनेक कविता आहेत. या चार वर्षांत दत्तांचा इंटरमी-जिएटपर्यंतचा अभ्यास झाला. ही परीक्षा ते पास झाले नाहीत असे दिसते. १८९१ सालभर ते कॉलेजात होते; १८९२ साली पहिली टर्म भरल्यावर ते घरी नगरास गेले. त्यांना मुंबईची हवा मानवत नव्हती व या सुमारास पोटदुखीचा आजारही झाला होता त्यामुळे त्यांना असे घरी जावे लागले. १८९३ साली परत ते कॉलेजात आले व वर्षभर राहिले. १८९४ साली कॉलेजात त्यांचे नाव नव्हते असे माझे मित्र म्हणतात; परंतु फेब्रुवारी, जून, जुलै, व ऑक्टोबर या महिन्यात कॉलेजात कविता लिहिल्याचा पुरावा असल्याकारणाने १८९४ सालभर दत्त मुंबईस होते हे उघड आहे. उत्तम विद्यार्थी म्हणून नावाजलेल्या व १५ व्या वर्षी मॅट्रिक पास झालेल्या दत्तांना, चार वर्षे इंटरमीजिएटकरिता लागावी व ती परीक्षाही त्यांची पास होऊ नये आणि पुढे बी. ए. ची उपाधी मिळण्यास १८९८ साल लागावे हा एक चमत्कार आहे. या चमत्काराचा योग्य उलगडा त्यांचे अंतरंग जाणलेल्या कॉलेजातील स्नेह्यांकडून झाला असता; परंतु दत्तांना ही सात आठ वर्षे साथ देणारे असे त्यांचे

एकच स्नेही होते; पण मी त्यांना भेटण्यापूर्वी त्यांचा अंतकाल झाला. प्रकृतीची अस्वस्थता हे एक कारण आहेच. १८९२ साल यामुळेच गेले, तथापि खरी कारणे दुसरीच आहेत व ती शोधू जाणे म्हणजे एका भावनाप्रधान कवीच्या बहुविध आयुष्याची छाननी करणे होय. एक उघड उघड कारण मला हे दिसते; वुइल्सन कॉलेजात येण्यापूर्वी दत्त कवी नव्हते. कॉलेजात त्यांची काव्यस्फूर्ती जागृत झाली व चिमुकल्या फुलपाखराप्रमाणे किंवा लहानशा वासराप्रमाणे ताज्या जन्माच्या अपूर्व उत्साहाने व स्वैरपणाने ती उडू बागडू लागली. परमानंदाच्या या अभिनव साधनापुढे दत्तांना ट्रिग्नामेट्री व लॉजिकची अनुमाने नीरस वाटली असल्यास नवल नाही.

परंतु पुढे इंदुरास दत्तांचा अखंड काव्यव्यासंग चालला असताही ते कॉलेजात अगदी वेळेवर जात व अभ्यासी आणि हुशार अशी परत त्यांची तेथे ख्यातिही झाली. मुंबईस इंदुराच्या मानाने त्यांनी काहीच कविता लिहिल्या नाहीत. तेव्हा कवितेनेच त्यांना मुंबईस अभ्यासापासून पराङ्मुख केले असे म्हणवत नाही. या चार वर्षांच्या काळात दत्तांना गायनवादनकलांचा अभ्यास करण्याचा फार नाद लागला होता. त्यांना आवाजी विशेष नसल्यामुळे गायनकलेचा जरी त्यांनी शास्त्रोक्त अभ्यास केला, तरी तिच्याविषयी त्यांची प्रसिद्धी झाली नाही. सतार व हार्मोनियम या वाद्यांचा मात्र त्यांनी चांगला अभ्यास केला व त्यात विलक्षण नैपुण्य मिळविले. दत्त नगरास, बडोद्यास व इतर ठिकाणी त्यांच्या मित्रवर्गात व त्यांना ओळखणाऱ्या सर्वसाधारण समाजात कवी म्हणून जितके प्रसिद्ध होते तितकेच सतार व पेटी वाजविण्यातील त्यांच्या कसबाबद्दल होते. मृत्यूनंतर त्यांच्या मित्रांनी त्यांच्या काव्यप्रतिभेबरोबर वादननैपुण्याचाही उल्लेख केला आहे. पुढे पुढे ते चांगल्या कसलेल्या गवयाची साथ करीत. सतारीवर त्यांची नखी फिरू लागून तंनूतून कोमल व कातर असे ध्वनि निघू लागले म्हणजे आसपास बसलेली मंडळी हरिणाप्रमाणे डोलू लागे. धंदेवाईक बजवय्ये सोडून दिल्यास त्यावेळी दत्तांची या दोन वाद्यांत बरोबरी करणारा कोणी नव्हता असे म्हणतात. पेटी व सतारीच्या खालोखाल त्यांची तबल्याची तयारी होती. परंतु जलशात ते जरूर पडल्याखेरीज तबला कधी वाजवीत नसत. या तिन्ही वाद्यांचा अभ्यास दत्तांनी नगरास केला. पेटी व सतार ते कृष्णराव सांगळे व तबला कोंडीबा गुरव या गृहस्थांजवळ शिकले. हे शिकणे नावाचे होते. दत्त स्वप्रयत्नांनीच या वाद्यात

तरबेज झाले. आजोबांना हे बरेच दिवस माहीत नव्हते. त्यांना सांगण्याइतके दत्तांच्यात धैर्यही नव्हते. शेवटी दुसऱ्या मार्गाने त्यांना हे समजल्यावर दत्तांना पेटी व सतार मिळाली. या अभ्यासाला सुरवात ते शाळेत असताना झाली असेल असे वाटत नाही. कॉलेजात गेल्यावरच इकडे ते वळले असावेत. काही असो, गाण्याबजावण्याकडे इतके लक्ष वेधले असता कॉलेजचा अभ्यास नियमितपणे होणे जरा असंभवनीयच दिसते. गायनवादनकलांच्या मोहाने अभ्यासाची हेळसांड होऊन शिक्षणाची खरावी झाल्याची कित्येक हुषार विद्यार्थ्यांची उदाहरणे माझ्या डोळ्यांसमोर आहेत. वाद्याविषयी प्रश्न निघाला म्हणून येथेच पुढील मजकूर सांगून टाकतो. बडोद्यास गेल्यावर दत्तांनी एका जलशांत जलतरंगाचे वादन ऐकिले. बिऱ्हाडी आल्याबरोबर चहाच्या कपात पाणी घालून ते त्यांतून निरनिराळे स्वर काढू लागले. याप्रमाणे अभ्यास करून लवकरच जलतरंगात त्यांची साधारण गती झाली. जलतरंगाप्रमाणेच कोणीही न शिकविता नखांनी चित्रे काढण्यास ते नगरासच अल्पावधीत शिकले व चांगली चित्रे काढू लागले. या चित्रांचा एक मासला अद्यापि पुण्यास दत्तांच्या चुलत बहिणीजवळ आहे.

याप्रमाणे अनेक व्यापक स्वरूपाच्या व्यवसायांत व्यग्र असता कॉलेजच्या शिक्षणाची हयगय व्हावी हे स्वाभाविक आहे. परंतु ही चार वर्षे दत्तांनी निव्वळ गाण्याबजावण्यात व काव्यरचनेत घालविली असे कोणी समजू नये. लहानपणापासून अमेरिकन मिशनऱ्यांच्या हाताखाली शिक्षण झाल्यामुळे व त्यांच्या सहवासांत काळ गेल्यामुळे दत्तांचा इंग्रजी विषय फारच चांगला होता. इंग्रजी लिहिण्याबद्दल वुइल्सनमध्ये व पुढे इंदुरास मिशन कॉलेजात त्यांची प्रसिद्धी होती. इंग्रजीची त्यांनी कधी हयगय केली नाही. इंग्रजी वाचनाचा त्यांना पूर्वीच नाद होता व मुंबईस त्यांनी वाचनाचा व्यासंग चांगला ठेवला. शेक्सपियर, मिल्टन, शेले, कीट्स् व टेनिसन् आणि आरंभी लॉंगफेलो या कवींचा त्यांनी फार कसून अभ्यास केला होता. बायरन त्यांना प्रिव्हियसलाच होता; त्याचेही वाचन त्यांनी केले. ब्राउनिंगच्या भानगडीत ते पडले नसावेत. त्यांचा पुस्तकसंग्रह बराच मोठा होता व तो साधारण समजत असताना माझ्या पाहण्यात आला. त्यात या वरील कवींपैकी एकेकाच्या कितीतरी निरनिराळ्या एडिशन्स होत्या व या पुस्तकांत जेथे जागा सापडेल तेथे टीपा लिहिलेल्या होत्या. इंग्रजी कवींत त्यांचे आवडते कवी कोण होते हे आता समजण्यास मार्ग नाही. परंतु शेक्सपियरच्या सॉनेट्स् त्यांना फार आवडत असे

दिसते. कारण उघड आहे; प्रणयिनीविषयी निरनिराळ्या प्रसंगी मनात येणारे विचार व त्या योगाने जागृत होणाऱ्या विविध मनोवृत्ती यांची चित्रे या सॉनेट्स्-मध्ये नितांत मधुर आहेत. केशवसुतांनाही या सॉनेट्स फार आवडत असाव्यात. दत्तांचा आवडता इंग्रजी कवी शेले असावा; शेलेवर त्यांनी एक सुंदर इंग्रजी कविता लिहिली आहे.

संस्कृत हा विषयही त्यांचा चांगला होता. व्याकरणाची त्यांना कितपत गोडी होती कोण जाणे, परंतु संस्कृत काव्यवाङ्मय त्यांना अत्यंत प्रिय होते. विशेषतः कालिदास आणि भवभूती या दोन्ही महाकवींच्या काव्यांची त्यांनी अनेक पारायणे करून त्यांना आत्मसात केले होते.

गणित हा विषय त्यांचा कच्चा होता; यातच ते नापास होत असावेत. इतर विषयांसंबंधी माहिती नाही. दत्तांच्या वाचनाविषयीच्या माहितीवरून आढळून येईल की जरी ते काही ना काही कारणामुळे आपला शिक्षणक्रम वेळेवर आटोपू शकले नाहीत, तरी त्यांनी आपल्या ज्ञानवृद्धीकरिता व ज्या कार्यासाठी त्यांचा अवतार झाला होता, त्याची पूर्वतयारी करण्यासाठी बरेच परिश्रम घेतले.

या त्यांच्या जीवनकार्याकडे आता वळू. वुइल्सन कॉलेजात आल्यावर दत्त कविता लिहू लागले. ही निव्वळ सुरवात होती. पुढे त्यांच्या कवितेतील ज्या गुणांनी रसिकांना मोहविले ते गुण या आरंभींच्या कवितांत आढळत नाहीत. ज्याप्रमाणे इंग्रजी चवथीमध्ये गेल्यावर मुलाला संस्कृतचा ‘ रामः, रामौ, रामाः ’ हा धडा मिळाला की ‘ घोडः, घोडौ, घोडाः, ’ ‘ बैलः, बैलौ, बैलाः ’ याप्रमाणे जे काही नजरेस पडेल त्यावर त्याच्या संस्कृत पाठाचा हल्ला होतो, तशीच दत्तांच्या वुइल्सन कॉलेजातील चारी वर्षांच्या कवितेची स्थिती आहे. कॉलेजच्या वर्गामध्ये मित्रांनी सुचविलेल्या विषयांवर काही कविता आहेत. यांत उत्तान शृंगार भरला आहे, व कालिदास चांगला वाचला असल्याची साक्ष पटते. अशा शृंगारिक त्रोटक कविता व चुटके बरेच तयार आहेत; यांच्या उलट ‘ प्रभुराया । वाया ही नरकाया ।। दावी तव पाया ! ’ किंवा ‘ देवा तुझी करवि या करवी सुसेवा, ’ अगर ‘ खास नको सहवास खळाचा वास वनाचा बरा ’ अशी वैराग्यपर पदे व ‘ कायावाचामने, ईश्वरा भजणे ।। ना तरी हे जिणे व्यर्थ व्यर्थ ।। ’ किंवा ‘ क्षपणकाचीये गावी । काय रजकाची थोरवी ।। जेथ बधि-रांचा जमाव । काय करील गंधर्व, ।। जेथ अरसिक जमले । काय कविकाव्याचे

चाले' असे अभंग आहेत. त्याचप्रमाणे 'तनू हेची तीर्थ' असे रूपक, 'काशी', 'विधवाविलाप', 'भगिनीविलाप', 'दुर्व्यसनमाला', 'मित्रपरीक्षा', 'कविप्रशंसा' (अनंतफंदीची एक गोष्ट), 'श्रीशिवछत्रपति', 'शिमगा' वगैरे विविध विषयांवर काव्यरचना आहे. या काव्यात भावनेची उत्कटता नसली किंवा कल्पनेच्या भराऱ्या नसल्या तरी भाषेत साधेपणा व प्रेमळपणा आहे. वामन, श्रीधर, रामजोशी वगैरे जुन्या कवींच्या भाषेची छाप या कवितांवर आहे. नगरास पाठ केलेले नवनीत आता कामास येऊ लागले होते. आकाशात अद्यापि चंडोलाने भरारी मारली नव्हती. परंतु तो पंख फडफडवीत उडण्याच्या तयारीत होता.

वुइल्सन कॉलेजात असताना ७।८ इंग्रजी कविता दत्तांनी लिहिल्या व पुढे दोन लिहिल्या. या कविता पोपच्या धर्तीवर असून Liberty, Love, A Stormy day, Epitaph वगैरे निरनिराळ्या विषयांवर आहेत; यात काव्य नाही. ही इंग्रजीत पद्यरचना करण्याची कसरत आहे. भाषेवरून दत्तांच्या इंग्रजी वाचनाची कल्पना होते.

याप्रमाणे हा मुंबईततील ३।४ वर्षांचा काळ संपला व पुढे मुंबईस शिकण्याचे सोडून देऊन दत्त नगरास गेले. या वेळी इंटरमीजिएटपर्यंतचा अभ्यास झाला होता. पुढील शिक्षणासाठी कलकत्ता युनिव्हर्सिटीत जाण्याचा दत्तांचा व त्यांच्या एका स्नेह्याचा विचार ठरला होता. त्यावेळी मुंबईची इंटर नापास झालेल्या विद्यार्थ्यांचा कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या वर्गात शिरकाव होई असे सांगतात. बी. ए. च्या पूर्वी कलकत्त्यास फक्त एफ ए. ची परीक्षा आहे; परंतु मुंबईस प्रीव्हियस व इंटर या दोन परीक्षा द्याव्या लागत; तेव्हा मुंबईची प्रीव्हियस एफ. ए. च्या बरोबरीची समजली जाऊन मुंबईच्या विद्यार्थ्यांना अशी सवलत मिळत असावी. या सवलतीचा फायदा दत्तांनी १८९५ साली घेतला नाही. या सालभर व ९६ चे ६।८ महिने ते घरीच होते.

भावनाप्रधान माणसांच्या आयुष्यात कधीना कधी असा काळ प्राप्त होतो की जेव्हा जगाच्या व आपल्या सद्यःस्थितीबद्दल असंतोष वाटून, तिच्याशी व्यवहारी जनांच्या सल्ल्याप्रमाणे तडजोड करण्यास तयार न होता ते आजन्म त्या पिंजऱ्याशी झगडत राहतात, किंवा तितकी ताकद नसल्यामुळे त्या पिंजऱ्याकडे तिरस्काराने पहात मान पोटात घेऊन कोपऱ्यात बसतात, किंवा डोके पिंजऱ्यावर आपटून मरण पतकरतात. या काळात साशंकवृत्ती प्रबल होऊन ईश्वराचे अस्तित्व मानवी

बुद्धीस पटत नाही, जगात काही चांगुलपणा असेल असे वाटत नाही व जगण्यात काही मौज असेल, काही हेतू असेल अशी श्रद्धा मनात बाणत नाही. या कालाच्या भेसूर छायेखाली गटेचा प्रेमास मुकलेला वर्टर जगात प्रेम नाही म्हणून पिस्तुल छातीत मारून जगाची रजा घेतो; जगाच्या कृत्रिम व दिखाऊ सुधारणेने विथरलेले रूसो व कार्लाईल तिच्याशी आजन्म झगडतात; स्वसुखास आचवल्यामुळे जगापुढे मारक्या बैलाप्रमाणे पाहणारा बायरन याच Storm and Stress च्या काळात ग्रीसला स्वातंत्र्याचे पोवाडे म्हणून दाखवितो व ते म्हणत म्हणत निघून जातो.

असा Storm and Stress चा काळ दत्तांच्या आयुष्यात डोकावू लागला होता. कालिदास, भवभूती, शेले यांच्या काव्यपरिचयाने सुभग शृंगारात मुरून गेलेले व त्यामुळे काव्यपर जीवनाविषयी लोलुप झालेले दत्त वस्तुस्थितीची कविसृष्टीशी तुलना करू लागले, व तुलनेनंतर दोघीत महदंतर आहे असे आढळून आल्यावर विषण्ण झाले. काव्यसृष्टीत परिचित झालेले स्वातंत्र व खऱ्या सृष्टीत दिसणारे पारतंत्र्य या वैषम्याने ते शोकाकुल झाले. माझी आई लग्न झाल्यावर थोडेबहुत लिहिणेवाचणे शिकली होती व वास्तविक पाहता विद्येने आमच्या पुढे गेलेल्या जातीतही त्या वेळी स्त्रियांच्या शिक्षणाची मजल फार पुढे जात नसे. तथापि आपल्या तुटपुंज्या बौद्धिक सामग्रीने दत्तांच्या तीव्र व वाढत्या बौद्धिक व काव्यपर आकांक्षा पुरविण्यास आई असमर्थ होती. तिला बापडीला ‘आविवाहसमयात् गृहे वने’ चे किंवा शेलेच्या सेरिनेडचे काय मर्म समजणार? या असदृश मनोधर्मामुळे व वृत्तिविरोधामुळे दत्तांचे मन वास्तविकातून उडून जाऊन काल्पनिकात वावरू लागले. प्रीतीच्या कविता हाडामासाच्या ‘हृदयशारदे’ वर व्हावयाच्या त्या अदृश्य व भावरूपिणी अशा कवितादेवीवर झाल्या. ‘बघसी अंत किती राजसे’ किंवा ‘स्वप्नभेट’ या कविता एखाद्या काल्पनिक प्रणयिनीला उद्देशून असतील असे प्रथम खरे वाटत नाही, इतका त्यांच्यात वास्तविक प्रेमाचा जिव्हाळा आहे. ही विषण्णवृत्ती दत्तांच्या काव्यात मधून मधून दिसून येते. दत्तांना शृंगारापेक्षा करुणरसच जास्ती साधला. यामुळेच त्यांना भवभूती कालिदासापेक्षा अधिक आवडे व उत्तरराम वेड लावी. माझे एक कविमित्र मला एकदा म्हणाले, ‘दत्तांच्या परमानंदाच्या गायनाच्या लकेरीत सुद्धा एखादा अस्पष्ट आर्त स्वर ऐकू येतो.’ खरे आहे. करुणरसाची उत्कटता, कातरता,

कोमलता या छटा दाखविण्यास दत्तांचा अवतार झाला होता. करुणरसाच्या काव्यास साथ देण्यासच जणू काय दत्तांची सतार अत्यंत नाजूक भावांनी कंपायमान होणाऱ्या दत्तांच्या संवेदनाकुल मनाप्रमाणे अत्यंत नाजूक स्पर्शाने थरारणाऱ्या तारांमधून मूक वेदनांचे अभिनव व गूढ स्फुंदन हवेत सोडीत असे. करुणरसाकडे दत्तांचा स्वाभाविकच ओढा होता व आयुष्यातील विविध अनुभवांनी तो त्यांच्या मनात अगदी मुरून गेला. करुणाची त्यांच्या सर्व काव्यावर छाया पडली आहे अशी अर्थात स्थिती नाही. नाहीतर त्यांच्या काव्यात जो प्रसाद व जे वैचित्र्य आढळून येते, ते आले नसते. त्यांच्या वृत्तीत तो भिनला होता व म्हणून अवसर मिळताच तो डोके वर काढी. 'निज नीज माझ्या बाळा' व 'एका दुष्काळपीडितास' आणि 'मेनका शकुंतलेस काय म्हणते' या काव्यात उदात्त करुणरस चमकतो. 'सरत्या वर्षास', 'नवे पान उघडले' वगैरे काव्यांत आयुष्याची क्षणभंगुरता व जगाची अशाश्वत स्थिति या विचारांनी मन उदास होते. आकाशात उडणाऱ्या घारीमध्ये कोमल करुण आहे. पौर्णिमेच्या चांदण्यात 'झुलत्या पुलावर' आनंदाच्या जल्लोषात बेहोष असतानाही दत्तांना 'जेथे असली श्रेष्ठ मंडळी, तिथेच गरिबा जागा दिधली ॥' अशी आपल्या गरिबीची आठवण होते. कवितेच्या शेवटील 'वारंवार ! कोठुनी असे दिसणार ॥' या दोन लहान ओळीत करुणरसाचा समुद्र भरला आहे. शेलेच्या तत्त्वाप्रमाणे Saddest thought प्रकट करणाऱ्या या कवितांमुळेच दत्त महाराष्ट्रास प्रिय झाले म्हणावयाचे.

पण दत्त तरुण होते. त्यांच्या अंगात गरम रक्त खेळत होते. ते गर्भश्रीमंत होते, विलासी होते. करुणरसाची गाणी गाण्यातच त्यांना इतिकर्तव्यता वाटली नाही. सृष्टीच्या विविध वस्तूंपासून त्यांना सुख वाटे. जनसमाजातील अनेक व्यक्ति अनेक प्रसंगी त्यांना आनंद देत. गायनवादनाचा त्यांच्या मनावर सुखकर परिणाम घडे. प्रेमळ व आनंदी स्वभाव त्यांना जगात 'जा, फिर व सुखी हो' असे म्हणे. जगाचा बाग झेलमच्या काठचा गुलाबी गालिचा नसल्यास, त्यात निदान जागोजाग काटे खास नाहीत असे त्यांना वाटे. आनंदात असताना ते जगाला दोन्ही हातांनी कवटाळू पाहत व या वेळी आनंदी कविता उत्पन्न होत. हा आनंद त्यांच्या बऱ्याच कवितेत भरला आहे. कदाचित पुढे हा आनंद वाढला असता. विपण्णता व आनंद हे विरोधीभाव एकत्र कसे, असे कोणी विचारील.

विरोध म्हणा, विरोधाभास म्हणा, खरी स्थिती ही आहे. जगाशी खरी सहानुभूती असल्यास त्याच्या सुखाबरोबर हसावे लागते व दुःखाबरोबर रडावे लागते. असंख्य विषम वस्तूंचे एकीकरण म्हणजे आमचे जग व असंख्य विषम भावांचे एकीकरण म्हणजे आमचे मन; आणि या विषम द्वंद्वांचे एकीकरण करणारे कोण तर आमचे कविराज. असो.

आपल्या वैयक्तिक जीवनाच्या व मनोभावनांच्या बुरख्यातून दत्तांनी त्या वेळच्या आपल्या मातृभूमीच्या स्थितीकडे पाहिले व ते अधिक विषाद पावले. विक्रमादित्याच्या भारतवर्षाने, शिवरायांच्या महाराष्ट्राने दास्यांत लाजिरवाणी जिनगानी घालवावी हे त्यांस दुस्सह झाले; व वीररसापेक्षा करुणरस जिव्हाळ्याचा असल्यामुळे पूर्वेतिहासातील मर्दुमकीचे पोवाडे गाण्याऐवजी दत्तांनी सांप्रतच्या परवशतेच्या दुःखाने विव्हल झालेल्या मनाने भावगीते गायिली. ‘मनोरंजना’ने दिवाळीकरिता कवितेला बोलाविले असता दत्त तिला म्हणतात, “तू जा बापडी! भावाबरोबर सण साजरा कर. मला—मला सण कसचा? “वसे भीषण अंधार जरि मनात! काय दीपा लावूनि मग जनात? देश बुडला दुःखात आपुला गे। कसा उत्सव मग गोड मना लागे!...जधी होईल जन्मभू पुण्यशाली। तदा माझी गे समज ती दिवाळी!” ‘सुंदर विहंग’ हातात पकडला असता त्याला ते ‘तुला सुंदर पिंजरा आणीन, गोडगोड खाण्यास देईन’ वगैरे सांगून प्रसन्न करू पहातात; उलट तो पक्षी घाबरून ‘दीनवाणी’ होतो. तात्काळ खरे कारण ओळखून दत्त त्याला सोडतात व म्हणतात, “जा बाबा! ‘पारतंत्र्याचे दुःख मला ठावे। मीच तुजला पंजरी कसे न्यावे।’. ‘वर्षप्रतिपदे’ला त्यांना विक्रमाची आठवण होऊन ते त्याला उद्देशून म्हणतात, ‘राग सोड विक्रमा! येई रे डोळे का मिटले। हतभागी तव देश बुडाला हाय! कसे झाले॥ येशिल जेव्हा देशरक्षणा तोच सुदिन मजला। तीच खरी प्रतिपदा! तोच सण सुवर्णभूमीला॥’. ‘स्वामी श्री शिवभूपती झगडले ज्याच्यापुढे आपले। बाजीही पडला, रणी निज तनू तानाजिने वाहिले॥ बाजीरावही विप्र, क्षत्रिय परी झाला जयाच्या बळे।’ असा जो प्रभावशाली ‘भगवा झेंडा’ तो आता कोठे आहे असे म्हणून ‘हा, हा! क्षत्रिय मी असून असु हे त्यावीण का ठेविले॥’ असा दत्त शोक करितात. ‘श्रीशिवछत्रपती’ मध्ये शिवरायांची नरसिंहावताराशी सुंदर तुलना आहे. ‘स्वतंत्रतेस’मध्ये ‘कोंडोनी अपकीर्ति होई न तुझी सत्कीर्ति होते परी। दंडोनी

दुबळी नव्हेच उलटी होशी बलाढ्या खरी ॥ ’ असे स्तुतिस्तोत्र गाऊन शेवटी ‘ ज्यांना त्वद्गुण ठाउके निजगृही त्वद्भक्त जे गाजती येथे तेच तुझ्या वधार्थ उठती ही नीति गे कोणती ? ’ अशी जाता जाता सूर्य कधी न मावळणाऱ्या राज्याची सूत्रे हालविणाऱ्यांची संभावना केली आहे. या उद्वेगजन्य कवितांच्या साह्याने दत्तांची मातृभूमीविषयीची तळमळ दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु तो १८९४–९५ चा काळ दत्तांना निव्वळ कविता लिहून स्वस्थ बसू देईल असा नव्हता. पुण्याहून नवजीवनाचा एक प्रवाह सुरू झाला होता व साऱ्या महाराष्ट्राने त्यापुढे मान वाकविली होती. गणपती व शिवाजी उत्सवां· सारख्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनाची ज्योत जागती करणाऱ्या संस्था एका मागून एक अस्तित्वात आल्या व खाली मान घालून बसलेले महाराष्ट्र ‘ शिवाजी महाराजकी जय ’ म्हणत उत्साहाने रस्त्यातूच नाचू लागले. या पुण्याच्या जयघोषाने नगरास भगव्या झेंड्याकरिता शोक करीत बसलेल्या दत्तांची मान वर झाली व ते उभे राहिले. प्रथम गणपतीचा उत्सव आला. दत्तांनी दीर्घप्रयत्नांनी नगरच्या तरुण पिढीत हुरूप आणला व उत्सव साजरा केला. पुण्यास किंवा कोठेही जितके मेळे झाले नसतील इतके नगरास झाले. त्या मेळ्यात असलेल्या काही मंडळींनी परवा नगरास मला नगरच्या मेळ्यांची संख्या शंभरावर होती असे निश्चयपूर्वक सांगितले तेव्हा ते खरेच वाटेना. या मेळ्यांना दत्तांनीच पदे करून दिली होती. ही पदे दोन लहानशा पुस्तकात दत्तांनी ‘ एक अहमदनगरस्थ ’ या सहीने छापली होती. ही पदे नगरास फार लोकप्रिय झाली व बरीच वर्षे म्हटली जात होती. अजूनही घाणेरड्या व कुचक्या पदांऐवजी याचा उपयोग झाल्यास मेळ्यांची बदनामी होणार नाही. मेळ्यातील मंडळीस—यांत लहानथोर सारेच होते—निरनिराळ्या प्रकारचे वेष देण्यात आले होते. शेवटच्या दिवशी सर्व मेळे आमच्या वाड्यासमोर जमून एक प्रचंड मिरवणूक निघे. याप्रमाणे हाती घेतलेले काम दत्तांनी यशस्वी केले. मेळ्यातील पदे या पुस्तकात घेतली नसल्यामुळे एक खाली देतो. त्यावेळी हिंदु-मुसलमानांचे वैमनस्य होते व कदाचित गणपतीच्या उत्सवाचा जन्मही त्यामुळे झाला असेल. या वैमनस्याबद्दल वाईट वाटून दत्त गातात,

‘ अहो आर्यभूमिवासी ! ’
‘ विनंति ही तुम्हासी ’

‘ त्यागोनि मत्सरासी ’
‘ स्वदेशहित करा. ’
‘ उकरोनि कलह खोटा ’
‘ सकलासि होय तोटा ’
‘ एकीस घात मोठा ’
‘ झाला पहा किती ! ’
‘ अहो ! हिंदुमुसलमान ’
‘ तुम्ही बंधुच्या समान ’
‘ प्रेमे सदा वसून ’
‘ वस्त्रे स्वदेशि घ्या. ’

एकेश्वरी पंथात वाढलेले दत्त गणपतीच्या उत्सवात पुढारी कसे झाले ? उत्तर सोपे आहे. त्यांना उत्सवाच्या धार्मिकबाजूशी कर्तव्य नव्हते. हा उत्सव म्हणजे समाजात जागृती व एकी घडवून आणणारी संस्था हीच दत्तांची दृष्टी होती. शिवाय या उत्सवास धार्मिक स्वरूप कधी असल्यास न कळे, परंतु याची सामाजिक व राजकीय बाजूच महाराष्ट्रापुढे प्रामुख्याने आहे व माझ्या मते त्यात वावगे असे काहीच नाही. आता खोल पाण्यात शिरले तर समाजसेवा किंवा राजकारण ही धर्माचीच अंगे आहेत ही गोष्ट निराळी.

गणपतीच्या उत्सवाच्या सुमारास किंवा कदाचित नंतर स्वदेशीची लाट नगरास आली. कदाचित ती तेथेच उगम पावली असेल.

यावेळी आमच्या वाड्याजवळ परदेशी कपड्यांची मोठी होळी करण्यात आली. यात दत्ताचे अंग होतेच. ते प्रमुख होते किंवा नाही याविषयी मला माहिती नाही.

यानंतर शिवरायांचा उत्सव आला. दत्तांनी अपूर्व उत्साहाने तो साजरा केला. त्यांचे या वेळचे एक मित्र व या चळवळीतील जोडीदार आणि ‘ तुकाराम ’ प्रेसचे मालक रा. बाबासाहेब साळुंखे यांच्या घरासमोर मंडप उभारण्यात आला, व व्याख्यानमाला झाली. याप्रमाणे आपल्या परीने दत्तांनी सार्वजनिक चळवळीला हातभार लाविला. या सुमारास ते नगरच्या “ तुकाराम ” वर्तमानपत्रातून ऐतिहासिक सामाजिक व राजकीय लेखही लिहीत असत.

‘ शिवाजी महाराजांनी खरोखरीच अफझुलखानाचा खून केला काय ’ या विषयावर त्यांचा एक लेख होता म्हणतात. या सर्वांना सांभाळून वादनकलेचा त्यांचा अभ्यास चाललाच होता. या वर्षा-दीड वर्षात काव्यरचना फारच थोडी झाली. वहीत अवघ्या ३।४ कविता सापडतात. या कवितात भाषा व विचार या दोन्ही बाजूने बरीच सुधारणा आहे. परंतु खऱ्या कविताना अद्यापीही आरंभ झाला नव्हता व तो या धामधुमीच्या ठिकाणी व काळी व्हावयाचा नव्हता.

याच सुमारासच दत्तांचा व रेव्हरंड टिळकांचा परिचय झाला. या वेळी नावाजलेले व उच्च प्रतीचे कवी अशी टिळकांची ख्याती होती. उभयतांच्या वयात बरेच अंतर होते, तथापि रसज्ञता व समव्यवसाय या योगाने त्यांना ‘ उपचाराची पीडा ’ झाली नाही. व लवकरच त्यांचा फार जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध झाला. टिळक आमच्या घरी नेहमी येत व माझी आजी त्यांना फार प्रेमाने वागवी. दिवाळीला स्नानास व फराळास टिळक आमच्या घरी असायचेच. टिळकांच्या साहचर्यामुळे दत्तांची काव्यदृष्टी विस्तृत झाली असल्याचा संभव आहे. टिळकांच्या उदाहरणानेच कदाचित लहान मुलांमुलींवरची साधी व प्रेमळ गाणी दत्त लिहू लागले असतील. टिळकांचा ‘ बालबोधमेवा ’ या ख्रिस्ती मासिकाशी संबंध होता. त्यांच्या आग्रहावरून दत्त या मासिकास कविता देऊ लागले. त्यांची ‘ ताई गुणाची माझी छकुली ’ ही कविता हे मासिक परवा बंद पडेपर्यंत प्रत्येक अंकात येत असे. ती ख्रिस्तीसमाजात इतकी लोकप्रिय झाली की घरोघर मुले ती म्हणत असत. टिळक हे दत्तांचे पहिले कविमित्र. दुसरे व शेवटचे चंद्रशेखर. या उभयतांखेरीज इतर कोणा कवीची व दत्तांची ओळख झाली नाही. दत्तांच्या निधनाने टिळकांना फार दुःख झाले व ते त्यांचे स्वतःचे निधन होईपर्यंत टिकले. ‘ बालबोधमेव्या ’त ‘ मुलांनो ! दत्त दूर गेला ’ व ‘ सुविचारसमागमा ’त त्याच धर्तीवर दुसरी कविता लिहून टिळकांनी दत्तांविषयी आपला स्नेह व्यक्त केला. उभयतांच्या वडिलांच्या स्नेहाची परंपरा चालविण्यास रा. दत्तोपंत टिळक तयार झाले व आईंनी या स्नेहावर आपला वरदहस्त ठेवला, हे मी माझे भाग्य समजतो.

१८९६ च्या उन्हाळ्यानंतर दत्त इंदुरास शिक्षणासाठी गेले. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या हद्दीत इंदूर हेच जवळचे ठिकाण होते; शिवाय रे. स्मिथसाहेबांची इच्छा दत्तांनी इंदुरासच मिशन कॉलेजमध्ये ( हल्लीचे ख्रिश्चन कॉलेज ) जावे अशी होती. १८९६ साली उन्हाळ्यानंतर दत्त बी. ए. च्या वर्गात दाखल झाले.

१८९८ सालच्या आरंभी बी. ए. ची परीक्षा देईपावेतो ते इंदूरास होते. येथे त्यांचे कॉलेजात जाणे नियमित असे, व अभ्यासही त्यांनी झटून केला. येथील प्रोफेसरांची त्यांनी आपल्या हुषारीने व अभ्यासाने मर्जी संपादन केली. इंदुरास ते काही दिवस जुन्या तोफखान्यात, त्यानंतर सराफ्यात रा. नारायणराव खुराटे या स्नेह्याच्या घरी, व पुढे डॉ. सुंदराबाई जाधव यांच्याकडे असे राहिले. शेवटी ते छावणीत रहात. इंदुरास त्यांचे रा. ब. माधवरावसाहेब किबे, जनरल गोविंदराव मतकर व रा. खुराटे हे स्नेही झाले.

इंदुरला दत्तांचे जाणे सर्व बाजूने हितावह झाले. मुंबईच्या कोलाहलापेक्षा व नगरच्या १।२ वर्षांच्या धामधुमीपेक्षा इंदुरच्या शांत वातावरणाने त्यांच्या क्षुब्ध मनास समाधान वाटले. इंदुरच्या जनसमाजाची साधी व अकृत्रिम राहणी आणि दिनचर्या यांच्या अनुभवाने त्यांच्या मनोवृत्तीत स्थैर्य आले. मुंबईस मित्रमंडळीची गप्पाष्टके व इतर व्यवसाय, अभ्यासाच्या व काव्यरचनेच्या, डोंगरासारखे आड येत. तीच स्थिति नगरची. तेथे त्यांचा जन्म गेलेला, अनेक ओळखी झालेल्या व अनेक गोष्टींकडे दीर्घपरिचयामुळे मनाचा ओढा. असा कोणताच प्रकार इंदुरास नव्हता. अपरिचित व लांबचे ठिकाण, स्नेही नाहीतच, ओळखीची माणसेही कमी. अशा परिस्थितीत अभ्यास व काव्यरचना हीच काळ घालविण्याची साधने झाली. ही स्थिती मला बायरनसारखी दिसते. पत्नीने त्याग केल्यामुळे व पुढे समाजाने बहिष्कृत केल्यामुळे निरुपायाने लंडनच्या चैनीच्या आयुष्याचा त्याग करून त्यास स्वित्झरलंड व इटलीचा आसरा घ्यावा लागला, तेव्हाच त्याच्या सरस काव्यरचनेस आरंभ झाला. याचप्रमाणे गडबडीच्या बहिर्मुख आयुष्यास रजा दिल्याबरोबर दत्तांच्या लेखणीतून सुंदर काव्यरत्ने उतरू लागली. प्रस्तुत पुस्तकात कवितांखाली स्थलकालांचा निर्देश केला आहे; त्यावरून दिसून येईल की जवळ-जवळ सर्व सुंदर कविता दत्तांनी या १।१॥ वर्षांत इंदुरांत लिहिल्या आहेत. या इंदुरच्या कविता व पूर्वीच्या कवितात फार फरक आहे. भाषासौंदर्य, अर्थगौरव भावोत्कटता, स्वतःच्या बुद्धिवैभवास बळी न पडता प्रतिपाद्य विषयास पोषक अशी कल्पनांची जोपासना व हे सर्व सांभाळून प्रत्येक कवितेत साधलेला किंवा खरे म्हणावयाचे म्हणजे आपोआप प्राप्त झालेला प्रसाद हे गुण इंदुरच्या कवितांत व्यक्त झाले आहेत. जगाविषयी तटस्थपणा न वाटता तद्विषयक सहानुभूतीची वाढ झाली आहे व झोपडीतील गरीब आईबरोबर व दुष्काळात उपाशी मेलेल्या

गरीब जीवाबरोबर तादात्म्य होण्याइतकी स्थिती येऊन अंगात मुरलेला करुण अद्वितीय कवितांवाटे थरारून बाहेर पडला आहे. कालिदास–भवभूतींच्या वाचनाचा पहिला परिणाम वुइल्सन कॉलेजात उत्तान शृंगाराचे हलक्या दर्जाचे चुटके लिहिण्यात झाला होता. इंदुरास ह्या वृत्तीचे दमन होऊन काव्यात अभिनव व सरसरमणीय कल्पनांचा बगीचा पसरला गेला व मार्मिक शृंगार त्यांतील मुग्धकलिकांचा नाजूक चुंबने घेऊ लागला. सृष्टी आपल्या बहुविध रूपात, प्रकाश-छायेत, जलाच्या चंचल तरंगात, फुलांच्या अस्फुट विकसनात, कोकिलेच्या शाश्वत गायनमाधुरीत, वायू आपल्या गूढ गुंजनात व चंद्र शीतल व उन्मादक कौमुदीत रंगून दत्तांना भासमान झाला व दत्त सृष्टीशी एकजीव होऊन अमूर्त आनंदाचा लाभ घेऊ लागले. ही दीड वर्षे चटकन् संपली. ही कधीच संपली नसती, निदान जरा ताणली गेली असती, तर महाराष्ट्र काव्यवाङ्मयात काय मौज झाली असती! पण ते देवाच्या मनात नव्हते. आणखी तसे पाहिले तर वर्षा दीड वर्षात अशी अपूर्व काव्यसृष्टी निर्माण व्हावी व आमचा बुलबुल आम्ही आ वासून पाहत असता भुरकन् निघून जावा यात काय मौज नाही? समाधान नाही?

इंदुरच्या शांत जीवनक्रमाचा परिणाम दत्तांच्या वाचनावरही झाला. काव्य-वाङ्मयाचे वाचन सुरू असेच, परंतु तत्त्वज्ञान व धार्मिक ग्रंथांच्या वाचनाची त्यांना येथे आवड उत्पन्न झाली. या वाचनाच्या कामी त्यांना मदत देणारे त्यांचे इंग्रजी व तत्वज्ञानाचे प्रोफेसर अद्यापि त्याच जागेवर आहेत. ते म्हणतात, "घाटे इंग्लिश वाङ्मयाची व धर्मपर पुस्तके जास्ती वाचीत. माझ्याकडून ते ख्रिस्ती धर्माची पुस्तके विशेषतः नेत असत. हिंदू धर्म व ख्रिस्ती धर्म यातील साधर्म्य शोधून काढण्याचा त्यांचा हेतु असे. त्यांना मित्र फार नव्हते. ते इंग्रजी लिहिण्यात फार तरवेज होते, व त्यांचे संस्कृत फारच चांगले होते. ते फार थोडे बोलत व वर्गात नियमाने येत. ते नेहमी उत्साही होते; वादविवादात त्यांना गोडी नव्हती (He was always enthusiastic but not debative). ख्रिस्ती-धर्माविषयी त्यांची मते फार उदार असत." -प्रमाणे मी लिहून पाठविलेल्या काही प्रश्नांची प्रोफेसरसाहेबांनी उत्तरे कळविली आहेत. या उत्तरात ख्रिस्ती धर्मपुस्तकांचा व धर्माचा उल्लेख आला आहे, तेव्हा बऱ्याच वेळा मागे ओढून धरलेल्या एका प्रश्नाचा येथे विचार करितो. दत्ताचे इंग्रजी सर्व शिक्षण ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या संस्थांत झाले; दत्तांना ख्रिस्ती अमेरिकन स्त्री-पुरुषांचा सहवास

बराच घडला; बायबलचा त्यांचा लहानपणापासूनचा परिचय व रे. स्मिथसाहेबांचे व त्यांच्या पत्नीचे त्यांच्यावर फार वजन. मग दत्त ख्रिस्ती का झाले नाहीत? रे. स्मिथसाहेब मला सांगतात 'ते अंतःकरणाने ख्रिस्ती होते. ते रोज प्रार्थना करीत.' प्रार्थना करणे हा ख्रिस्ती धर्माचा विशेष नाही. दत्तांच्या घरी त्यांच्या लहानपणी सुद्धा प्रार्थना होत असे. दत्तांना भगवान ख्रिस्तांच्या व्यक्तीबद्दल व उपदेशाबद्दल आदर वाटत होता हे सत्य आहे. मोकळ्या मनाने जगातील निरनिराळ्या महात्म्यांच्या उपदेशांचा अभ्यास करणे हे जिज्ञासू बुद्धीचे लक्षण आहे, व सध्याच्या आम्हा हिंदूंच्या दोन पिढ्यांत ते दिसून येते. याचा अर्थ दुसरा का घ्यावा? भगवान ख्रिस्तांच्या उपदेशाप्रमाणे वागण्यास बाह्य संस्कार अवश्य का वाटावे? हा उपदेश आमच्या धर्माच्या विरुद्ध तरी आहे का? जर नसेल तर हजारो वर्षांची आमची आत्मिक, नैतिक, मानसिक व विशेषतः कौटुंबिक परंपरा सोडून आम्ही आमच्या लोकांना परके का व्हावे? परधर्माबद्दल आदर असणे हे इष्ट आहे, पण त्याचा अर्थ स्वधर्मपरंपरेचा त्याग नव्हे. दत्तांना ख्रिस्तांच्याविषयी श्रद्धा होती, परंतु स्वधर्माविषयी अनास्था नव्हती; हेच उत्तर ते का ख्रिस्ती झाले नाहीत या प्रश्नाचे आहे. हिंदुधर्मात राहून डोंगरावरील प्रत्येक उपदेश त्यांना आचरता येत होता. वस्तुस्थिती अशी होती की दत्तांच्या मनात धर्मजिज्ञासा होती. परंतु त्या अल्पवयात त्यांची मते तयार झाली नव्हती. खुद्द त्यांचे इंदुरचे ख्रिस्ती प्रोफेसर सांगतात, ते ख्रिस्ती धर्माची पुस्तके वाचीत, पण ते अन्य धर्मग्रंथांशी तुलना करण्यासाठी. याच हेतूने ब्राह्मसमाजाची पुस्तकेही त्यांनी वाचली.

प्रार्थनासमाजावर त्यांची किती श्रद्धा होती हे समजण्यास मार्ग नाही. त्याचा त्यांनी त्याग केला नाही यावरून काहीच सिद्ध होत नाही. कदाचित जुन्या पिढीच्या विरोधास हिमतीने टक्कर देणाऱ्या या चिमुकल्या सांप्रदायाबद्दल त्यांना प्रेम वाटत असेल.

दत्त इंदूर सोडल्यावर नगरास फार दिवस न राहता बडोद्यास गेले. यापूर्वीही बडोद्यास ते मधूनमधून जात असत. बडोद्यास यावेळी मराठा ज्ञातीचे कैवारी दिवाण-बहादूर धामणस्कर दिवाण होते. यांच्या अमदानीत बऱ्याच मराठे तरुणांना जागा मिळाल्या. यांचा व आजोबांचा स्नेह होता; यामुळे नगरास वेळ न दवडता बडोद्यास जाऊन दिवाणबहादुरांची दत्तांनी गाठ घ्यावी व त्यांच्या तर्फे श्रीमन्महाराजांना भेटावे व नोकरीचे जुळवावे या इराद्याने आजोबांनी दत्तांना बडोद्यास

पाठविले व मागून आपण स्वतः गेले. हे १८९८ च्या उन्हाळ्याच्या सुमारास असावे. बडोद्यास दत्तांच्या नोकरीचे संधान लवकर जुळेना. शेवटी महाराजांची भेट झाली व त्यांनी आश्वासनहि दिले. पण हुकूम मिळेना. दत्तांना त्याची विशेष परवा नव्हती. बडोद्यास त्यांचा व ' सयाजीविजय ' छापखान्याचे मालक रा. दामोदर-शेट यंदे यांचा स्नेह झाला व दत्त आवडीने सयाजीविजय साप्ताहिकात वारंवार लेख लिहू लागले. छापखान्यात त्यांची व विद्वन्मणि रा. शंकर मोरो रानडे यांची ओळख झाली व त्यांच्याकडेही बसणेउठणे होऊ लागले. याच वेळेस दत्तांच्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट घडली. त्यांचा व कविवर चंद्रशेखर यांचा स्नेह जुळला. स्नेहसंबंध घडल्यावर दत्तांच्या मृत्यूपर्यंत हे कविद्वय रात्रंदिवस एकत्र असे. त्यांचे परस्परांचे भावाभावाप्रमाणे प्रेम असे, व जातिभेद व मतभेद यांची छाया त्यांच्या स्नेहाआड कधीच आली नाही. या उभयतांनी रात्रीबेरात्री हिंडून सृष्टीच्या सुप्तस्थितीचा अनुभव घेतला. जागरणे करून उंचावरून सूर्याची पहिली ताजी किरणे ताजेपणातच अंगावर घेतली. कमिटीबागेत रात्रीच्या रात्री जागून काढल्या. ' लक्ष्मीविलासमंदिर—मनोरा ' ही कविता याच स्थितीत झाली. ती वाचली असता दत्तांचा सृष्टीशी किती निकट परिचय होता हे दिसून येईल व त्याबरोबर कवितेतील प्रसाद, समतोलपणा व भाषाप्रागल्भ्य हे गुणही वाढत्या प्रमाणावर दिसून येतील.

या वेळी पॅरिसचे भव्य प्रदर्शन भरणार होते; वर्तमानपत्रातून याविषयी चित्त-वेधक बातम्या येऊ लागल्या. दत्तांना पॅरिसला जाण्याची उत्सुकता लागली. आपल्या आर्य गायनवादनकलांचे तेथे प्रदर्शन करून त्या कलांविषयी तिकडे जागृती उत्पन्न करावयाची हा त्यांचा हेतु होता. ते नावाजलेल्या गवयांस व बजवय्यांस घेऊन जाणार होते. पण बडोद्याच्या सर्व अंगीकृत कार्याप्रमाणे हेही असिद्ध राहिले.

बडोद्यास दत्तांच्या फार कविता झाल्या नाहीत. तेथे गेल्यावर लवकरच ते किर्लोस्कर मंडळीसाठी उत्तररामचरित मराठीत बसवू लागले. यापूर्वी १८९५ साली नगरास किंवा पुढे इंदुरास श्रीमंत शिवाजीराव होळकरांच्या जाहिराती-प्रमाणे दत्तांनी मेघदूतास नाट्यरूप दिले होते अशी माहिती आहे. हे इंदूर दरबारातून कदाचित् हरवले असेल; कदाचित् अपूर्णच राहिले असेल व पुढे हरवले असेल. इतके खरे की हे मेघदूत सध्या उपलब्ध नाही. असो. उत्तर-

रामावर दत्त बरीच मेहनत घेत होते. या सुमारास नव्याण्णवाचा दुसरा प्लेग आला. लोक घरे सोडून जंगलात गेले. चंद्रशेखर व त्यांचे वडील बंधु भीमनाथी राहण्यास गेले. दत्त गावातच राहात असत. दिवसभर उत्तररामावर मेहनत घेऊन रात्री ते भीमनाथी चंद्रशेखरांकडे जात व तेथे चंद्रशेखरांचे वडील बंधू रा. नारायणराव ऊर्फ नानासाहेब व हे उभयता यांमध्ये लिहिलेल्या भागावर रात्रीच्या एक दोन वाजेपर्यंत भवति न भवति होऊन दत्त परत बिऱ्हाडी येत असत. असा क्रम बरेच दिवस चालला होता. तिसरा अंक अर्धा झाला त्या वेळी मुळातील सात अंकी नाटक प्रयोगास बोजड होईल, ते पाच अंकांत आटोपावे असा विचार मनात येऊन दत्त काटछाट करू लागले. या प्रयत्नात ते नाटक तसेच अपूर्ण राहिले व पुढे दत्तांच्या मागे एकाच्या हातून दुसऱ्याकडे असे फिरत असता नाहीसे झाले. त्याचा कच्चा खर्डा मला दोन वर्षांपूर्वी ग्वाल्हेरीस उपलब्ध झाला आहे.

उत्तररामचरिताचे रूपांतर चालले असता दत्तांचे मन अर्वाचीन कवींच्या काव्यांच्या स्थितीकडे लागले. परशुरामपंततात्यांनी रामाजोशीपर्यंतच्या कवींच्या निवडक कवितांचा संग्रह केला होता. तात्यांच्या नंतर १८१२ सालापुढच्या कवींचा परामर्श कोणीच घेतला नाही. आधुनिक कवींच्या चांगल्या कविता वर्तमानपत्रे व मासिके यांच्या रद्दीत पडून लुप्तप्राय झाल्या होत्या. यासाठी तात्यांनी जेथे मुक्काम केला होता तेथपासूनची कविपरंपरा विद्यमान कवींपर्यंत आणून ती महाराष्ट्रास सादर करण्याचा दत्तांनी संकल्प केला व जाहिराती देऊन मृत व विद्यमान कवींच्या काव्यांचे शोधन व संग्रह ते करू लागले. हे काम यांच्या मृत्यूमुळे अपुरे राहिले. ते त्यांचे स्नेही व सहकारी चंद्रशेखर यांनी पुरे करून ‘ अर्वाचीन कविता ’ या नावाने प्रसिद्ध केले व आपल्या प्रिय मित्रास अर्पण केले.

उत्तररामाचे रूपांतर व अर्वाचीन कवितांचा संग्रह चालला असता प्लेगचा सपाटा चाललाच होता, पण तिकडे दत्तांचे पूर्ण दुर्लक्ष होते. १८९९ च्या मार्च महिन्याच्या आरंभी एके दिवशी संध्याकाळी बाहेरून फिरून बिऱ्हाडी आल्यावर दत्तांना एकदम थंडी भरून आली व अंगात ताप भरावयास सुरवात झाली. रात्री १०५ डिग्रीच्या वर पारा चढला. मध्यंतरी हे वर्तमान ऐकून रा. यंदे, कातरणीकर, चंद्रशेखर वगैरे मंडळी धावून आली व उपचारास सुरवात

झाली. बाळ वैद्य या नावाच्या वैद्याचा इलाज सुरू झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ताप थोडा उतरला, परंतु दिवसभर अंगाची लाही होत होती. तिसऱ्या दिवशी आराम पडला. दत्त मित्रमंडळीबरोबर बोलत बसले, कॉफी प्याले. सर्वांना संकट टळले असे वाटून आनंद झाला. चवथा दिवस बरा गेला. दुपारी मिलिटरी ऑफीसमध्ये सध्या तुम्हाला जागा देण्यात आली आहे असा सरकारी हुकूम आला. संध्याकाळ झाली. परत ताप चढू लागला तो त्याने १०६ वी डिग्री गाठली. खाकेत दुखण्यास सुरवात झाली. दत्तांची शुद्धी नाहीशी झाली. बाळ वैद्य दुखणे असाध्य आहे म्हणून घरी गेले. मंडळीनी डॉ. गझदर नावाच्या डॉक्टरांना बोलाविले. त्यानी प्लेग केस आहे असे निदान केले. अनेक उपचार झाले. अंगाची तळमळ व लाही असह्य होऊ लागली. मंडळी रडू लागली. दत्तांना आपल्यास मरण येईल हे खरेच वाटेना. शुद्धीवर आल्यावर तशा दुःखावेगात ते जमलेल्या लोकांना धीर देऊ लागले "अरे! असे वेड्यासारखे काय करिता? मी मरतोय थोडाच, उद्या बघा बरे वाटेल." यंदे, चंद्रशेखर वगैरे स्नेह्यांनी रात्र जागून काढली. सकाळी चिन्हे वाईट दिसू लागली. नगरास 'ताबडतोब या' अशी तार गेली. डॉक्टरांची कमिटी झाली. आशा सुटत चालली. साडेदहा वाजता नानासाहेब गोऱ्हे कोर्टात जाताना प्रकृति पाहण्यास आले. नानासाहेबांचे आज सत्तराजवळ वय आहे. लोणावळ्यास स्नानसंध्या करीत ते कालव्यय करीत आहेत. बावीस वर्षांपूर्वीच्या त्या मृत्युशय्येचे मजजवळ वर्णन करताना त्यांच्या वृद्ध डोळ्यांत आसवे आली. ते म्हणाले "सर्व खोलीभर बिछाना केला होता व घाटे अंगाची सारखी आग होत असल्यामुळे बिछान्याभर सारखे गडबडा लोळत होते. त्यांचे मित्र कोपऱ्यात बसून मुकाट्याने हे शेवटचे दृश्य पाहत होते. मला पाहून दत्त मोठ्याने म्हणाले 'नानासाहेब! क्षमा करा. आपण आलात व मी असा अस्ताव्यस्त पडलो आहे!'" इहलोकचा रामराम घेऊन एक पाऊल पैलथडीला टाकलेले, अशा अवस्थेत तो दत्तांचा हृदयद्रावक विनय पाहून इतका वेळ गप्प बसलेल्या मंडळीस आता राहवेना. ते लहान मुलांप्रमाणे शोक करू लागले. दत्तांनाहि आपला अंतकाळ जवळ आला असे वाटू लागले. यावेळी आपल्या निराधार पत्नीचे किंवा मुलांचे पुढे कसे होईल हा विचार त्यांच्या मनात आला नाही. त्यांनी आपल्या अर्धमृत हाताने आपल्या कवितांची वही चंद्रशेखरांजवळ दिली व 'हिला सांभाळा' म्हणून प्राण सोडला.

याप्रमाणे आपल्या अनुपम काव्यप्रतिभेने महाराष्ट्रास झुलवून माझे बाबा चोवीस वर्षांच्या आत जगाचा निरोप घेऊन निघून गेले.

पुढे काय लिहू ? चरित्र नायक गेल्यावर चरित्र लिहावयाचे कोणाचे ? नगरला दुसरी तार गेली–' सर्व आटोपले ! ' आजोबा बातमी ऐकताच गुडघ्यात मान घालून दिवसभर निस्तब्ध व निःशब्द बसले. त्यांच्या डोळ्यात अश्रू आले नाहीत. परंतु वृद्धावस्थेतील साऱ्या भावी आशांबरोबर आजोबांचे हृदय त्या दिवशी खाक झाले. त्यांनी वकिली सोडली, देशांतर केले व शेवटी झुरत झुरत १९०४ साली देह टाकला.

आजीस मार्चच्या त्या १३ तारखेस ब्रह्म आठवले. मोठ्या प्रयासाने वाढविलेले तिचे मूल अवघ्या २।३ वर्षांत महाराष्ट्रास वेड लावून ताऱ्याप्रमाणे नाहीसे झाले; परंतु तिने धीर सोडला नाही. परत घाट्यांच्या घराण्यास पुढे आणीन या निश्चयाने ती १८ वर्षे जगली. तिने आम्हास पुढे आणण्यास दीर्घ प्रयत्न केले, अनेक संकटांना टक्कर दिली व १९१७ च्या फेब्रुवारीत देह सोडला. तिला दुखणे आलेच नाही. मृत्यूपूर्वी डॉक्टरने तिला तपासले तेव्हा तिच्या काळजाचा त्यांना पत्ता लागला नाही ! याप्रमाणे हजारांवर हुकमत चालवू शकणारी माझी आजी अज्ञातावस्थेत व कष्टात दिवस काढून दत्तांना भेटण्यास गेली.

माझी आई ? ज्या खोलीत तिने बातमी ऐकली, त्याच खोलीतून वर्षा दीड वर्षाने तिचे अस्थिपंजरमय प्रेत बाहेर निघाले ! दत्तांनी आमच्या कुटुंबाची वाताहात केली.

दत्तांचा स्वभाव निगर्वी व प्रेमळ असे. त्यांच्याप्रमाणे थोड्याच कवींनी आपल्या प्रेमळ स्वभावाबद्दल आस्था वाटून इतके दिवस शोक करणारा मित्रसमूह मागे ठेवला असेल. तथापि त्यांना आपल्या काव्याचा अभिमान वाटे व त्यांची कोणी अवहेलना केलेली त्यांना खपत नसे. ते ' मनोरंजन ' च्या व ' सुविचार-समागमा ' च्या सुरवातीपासून त्या मासिकांना कविता पाठवीत असत. ' काव्य-रत्नावली ' सही त्यांनी काही कविता पाठविल्या. एकदा प. वा. मित्रांनी एक कविता छापण्यास काकू केले किंवा कदाचित विलंब लावला. दत्तांनी ' मनो-रंजना ' स कविता पाठविणे बंद केले. मित्रांनी बरेच प्रयत्न केले; शेवटी ते बडोद्यास आले होते तेव्हा प्रत्यक्ष भेटून त्यांनी दत्तांचे मन वळविले, तेव्हा त्यांना

'दिवाळी' ही कविता मिळाली. 'देइ भाऊ! रसिकता जी असेल' ही ओळ या संदर्भाने वाचावी.

दत्त निर्व्यसनी होते. मुंबईस कॉलरा झाला असता डॉक्टर ब्रँडी देऊ लागला, तेव्हा दत्तांनी 'प्राण गेला तरी बेहेत्तर पण दारूस शिवणार नाही' असे सांगितले. पुढे ते विडी ओढू लागले व शेवटीशेवटी विडी तोंडात असल्याशिवाय काव्यरचनेत त्यांना मौज वाटेना. एकदा नगरास ते आपल्या खोलीत विडी ओढीत बसले असता अवचित आजी तेथे आली. आयत्या वेळी दुसरा उपाय न सुचल्यामुळे त्या मातृभक्त व विनयशील पुत्राने हाताच्या मुठीत ती जळती विडी दाबून ठेविली. मृत्युसमयीच्या त्यांच्या विनयशील वर्तनाचा उल्लेख मागे आला आहेच. आजोबा व आजी यांच्या देखत दत्तांनी मला कधीच जवळ घेतले नाही. दत्तांची रहाणी फार झोकाची होती. ते नेहमी उंची धोतरे वापरीत व आजचा सदरा किंवा शर्ट त्यांना उद्याला चालत नसे. अत्तरांचा त्यांना शोक होता व उंची अत्तरे त्यांच्या संग्रही असत. त्यांच्या शृंगारप्रिय मनोवृत्तीस हे साजेसेच होते!

दत्तांच्या काव्याविषयी योग्य ठिकाणी पर्यालोचन केले आहेच. कोणत्या कवींचा त्यांच्या मनावर व काव्यांवर परिणाम झाला हाहि विचार झाला. परिस्थितीने त्यांच्या चरित्राची व कवितेची कशी वाढ झाली हे दाखविण्याचाहि प्रयत्न केला. या बाह्य कारणांचा निर्देश झाला; आता दत्तांची अंतर्वृत्ती कवितेकडे कशा प्रकारची होती, त्यांचा अर्वाचीन कवींमध्ये काय दर्जा आहे हे सामान्य स्वरूपाचे प्रश्न राहिले. हे महत्त्वाचे आहेत व यांचा सांगोपांग विचार करणे म्हणजे या लांबलेल्या लेखाइतकाच दुसरा लेख लिहिणे होय. ते पुढे केव्हा तरी पाहू. सध्या थोडक्यात काही मुद्द्यांचा उल्लेख करितो.

दत्तांचा कवितेशी कशा प्रकारचा संबंध होता हे "बघसी अंत किती राजसे!" या काव्यावरून दिसून येईल. सशरीर व सजीव प्रणयिनीवर जितके उत्कट प्रेम करावे तितके दत्तांनी कवितेवर केले. वरील कवितेतील प्रत्येक अक्षर सत्य आहे. त्यात 'कविसंकेत' नाही. कवितेसाठी दत्त खरोखर 'जनी वनी स्मशानी' फिरले. काव्यस्फूर्ती झाल्यावर, मनात काव्यविषयास अजाणपणे मनोमय आकार येत चालल्यावर, दत्तांचे शब्द साहजिकपणे त्याला बाहेर व्यक्त करीत. दत्तांनी लिहिलेला शब्द परत खोडला नाही. त्यांच्या कविता

प्रयत्नसिद्ध नव्हत्या; याचे कारण दत्त कवितेसाठी कविता करीत होते. धर्म, समाज-सुधारणा किंवा राजकारण अशी ध्येये डोळ्यांपुढे ठेवून कविताशक्तीस एक साधन मानून उपयुक्ततेच्या ( Utility ) मोहक रूपास बळी पडून त्यांनी काव्यरचना केली नाही. हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. त्यांच्या कविता त्यांच्या हृदयातील भावना दाखवितात; त्या वेळच्या स्थितीचा त्या इतिहास नाहीत. त्यांच्या भावना-इतक्या तीव्र व खोल असत की कवितेस त्या बुद्धीचे साधन होऊ देत नसत. दत्तांमध्ये इतर काव्यगुण असोत वा नसोत, जळगावच्या कविसंमेलनात गुरुवर्य महाजनींनी खऱ्या कवीचे लक्षण " केवल समाधीची अवस्था " दाखविले त्या अवस्थेतच दत्तांच्या कविता जन्म पावल्या आहेत.

दत्तांचा आधुनिक कवीत दर्जा काय आहे, हा प्रश्न फसवा आहे व त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्नही करू नये. कोण कवि कोणापेक्षा श्रेष्ठ आहे किंवा कनिष्ठ आहे हे जाणण्याची कसोटी काय ? श्रेष्ठ काव्याची कसोटी ( Criterion ) काय ? ती अद्यापी ब्रूक, अर्नाल्ड यांसारख्या जगन्मान्य टीकाकारांना सापडली नाही. काव्याचे ध्येय काव्यच आहे व कवी आंधळ्या भारद्वाजाप्रमाणे आपल्या भोवती गातो, त्यामुळे प्रत्येक कवीचे काव्य प्रत्येक कवीसारखे असते. मग सदभिरुचीचे सर्वमान्य काही नियम वजा जाता तारतम्यभावास तराजू कोणती ? आनंद हे काव्याचे साध्य नसून परिणाम आहे. ' ज्यात रस आहे ते काव्य ' ही व्यापक व्याख्या व्याख्या न देण्याच्या हेतूनेच कदाचित आमच्या साहित्यशास्त्रकारांनी दिली असेल. हा प्रश्नच सोडणे बरे.

दत्तांच्या काव्याची इतर कवींच्या काव्यांशी तुलना न करण्याचे दुसरे कारण आहे. दत्तांची कविता अपूर्ण आहे. त्यांच्या काव्यात त्यांना विशिष्ट व वाचकांना आल्हाद देणारे असे गुण दिसू लागले न लागले तोच त्यांचे निधन झाले. अवघ्या वर्षा दीड वर्षात लिहिलेल्या थोड्या कवितांच्या साधनावर, कित्येक वर्षे काव्यरचना केलेल्या कवींशी त्यांची तुलना करणे रास्त नाही; आमच्या सर्वच आधुनिक कवींच्या अल्प काव्यरचनेमुळे इंग्रजी कवींशी त्यांची तुलना करण्याचे प्रयत्न हास्यास्पद होतात. शिवाय दत्तांनी टाक खाली ठेवला नव्हता. बडोद्यास त्यांचा काव्योत्साह अपूर्व होता. ते जगले असते तर त्यांची भरारी कोठपर्यंत गेली असती हे सांगवत नाही. इतर कवींचे तसे नव्हते. टिळक जे काही लिहाव-याचे ते लिहून चुकले होते. नवीन व विशेष असे काही त्यांच्या लेखणीतून

निवेल ही अपेक्षा नव्हती. हाच प्रकार विनायकांचा. केशवसुतांच्या प्रतिभेस खंड नव्हता; त्यांनी नवीन प्रदेश आम्हास दाखविले असते. परंतु जी काही त्यांची काव्यसंपत्ती आहे, तिच्यावरून त्यांची महती आम्हांस ओळखता आली हा अनुभव आहे. गोविंदाग्रजांनी हयातीतच काव्यव्यवसाय सोडला. बालकवी अपवाद असावेत असे वाटते. वरील कवींप्रमाणे दत्तांची स्थिती नाही. कीट्सप्रमाणे त्यांनी जे काही अल्प लिहिले त्याचाच विचार न करिता, ते पुढे काय लिहू शकले असते याअपेक्षेवर दत्तांच्या काव्याची योग्यता ठरली पाहिजे. हा प्रयत्न कीट्स्च्या बाबतीत झाला. व तो प्रचंड काव्यरचना करणाऱ्या प्रतिभाशाली कवींच्या जोडीस बसला. हा प्रयत्न दत्तांच्या बाबतीत होणार नाही काय?

अलीकडे केशवसुत गुरू होते, व त्यांच्या बरोबरीचे व नंतरचे कवी त्यांचे चेले होते, किंवा केशवसुतांनी महाराष्ट्र काव्यात नवजीवन आणले व इतर कवी त्या पाण्यावर पोसले गेले, अशा प्रकारची भाषा व 'केशवसुतांचा सांप्रदाय' असे शब्द ऐकू येऊ लागले आहेत व केशवसुतांच्या लोकप्रियतेमुळे त्यांना मान्यताही मिळते. टिळक, विनायक, बालकवी, तांबे हे जिवंत प्रतिभेचे कवी आहेत. त्यांच्या काव्यावर, त्यांतील विचारांवर, भाषेवर, त्या त्या कवीच्या व्यक्तीचे, त्याच्या अनुभवाचे, वाचनाचे, परिस्थितीचे संस्कार घडून प्रत्येकाच्या काव्यावर त्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. केशवसुतांस नवजीवनाचे जनक म्हणण्यापेक्षा भारतवर्षाच्या नवयुगात ज्या अभिनव व परिणामकारी घटना झाल्या, जे नवीन विचार खेळू लागले, जे महात्मे या नवीन विचारांस उच्चारू व आचारू लागले, या सर्वांचा केशवसुतांच्या मनावर परिणाम घडला तसा दुसऱ्या कवींच्या मनावरही घडला असेल असे का मानू नये? केशवसुतांच्या काव्यात धर्मविषयी, समाजाविषयी, नीतीविषयी, सृष्टीविषयी काही विशिष्ट मते आहेत व इतर कवींनी त्यांचे अनुकरण केले असे कोणी सिद्ध केले आहे का? या सर्व मंडळीत केशवसुतांची कविता श्रेष्ठ होती, स्फूर्ती जाज्वल्य होती, हे सिद्ध करण्यासाठी इतर कवींना परभृत बनविणे हाच एक मार्ग आहे काय? भाऊ वडील झाला म्हणून तो बाप होत नाही. सध्या प्रश्न दत्तांचा आहे. त्यांच्यावर चेलेपणाचा आरोप झाला आहे किंवा नाही हे ठाऊक नाही. झाला नसल्यास आनंदाची गोष्ट आहे. झाला असल्यास, किंवा हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर होणार असल्यास, त्याचा आधीच विचार केलेला बरा. दत्तांची व केशव-

सुतांची ओळख नव्हती. मुंबईत दोघेही एकाच वेळी तीनचार वर्षे होते. तरी त्यांचा परिचय झाला नाही. केशवसुतांच्या कविता दत्तांनी 'मनोरंजनात'च वाचल्या. दत्तांच्या कवितेत दत्तपणा—मग त्याला बरा म्हणा, वाईट म्हणा—इतका भरला आहे की इतरांस तेथे स्थान मिळणे शक्य नव्हते. टिळक व चंद्रशेखरां-सारख्या जिवलग कविमित्रांचाहि दत्तांच्या काव्यावर संस्कार झाला नाही. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे केशवसुतांचे श्रेष्ठत्व आम्ही नव्या पिढीने मान्य केले आहे. वीस वर्षांपूर्वी बहुजनसमाजास किंवा कवींना केशवसुतांमध्ये सर्व कवींपेक्षा काही अपूर्व आहे असे वाटत नव्हते व केशवसुत कवींना स्फूर्ती व ध्येय पुरविणारे केंद्रस्थान झाले नव्हते.

माझी वाचकांना विनंती आहे, दत्तांना जे काही स्थान द्यावयाचे असेल ते द्या, परंतु ते कोणाचे चेले होते असे बोलू नका, कारण ज्याने त्यांना या जगात एकदोनच चिजा छेडून परत लवकर येण्यास पाठविले होते, त्याचेच ते चेले होते व त्याच्याच पायापाशी ते आज सतार छेडीत बसले आहेत.

**विठ्ठलराव घाटे**

# १. नवें पान उघडलें !

☐

श्लोक

होती सृष्टि कुठें ? उजेड अथवा अंधार होता कुठें ?
होता मात्र तदा जगज्जनक तो, हा काळ होता कुठें ?
कोणी कांहिं कुठें कधींहि नव्हते तेव्हां जगन्नायक,
इच्छासाधन घेउनी बनविता झाला महा पुस्तक. १

कोरें पुस्तक निर्मिलें प्रथम तें आकाश ज्या बोलती,
नाना तारकपुंज आंत लिहिले त्यांची न कोणा मिती;
येथे काढियलीं यथाक्रम तरू पक्षी पशू माणसें.
"होवो हें" म्हणतांच तें उमटलें जागीं जसेंच्या तसें. २

झालें पुस्तक पूर्ण विश्व म्हणतों, ज्याला इथें आपण,
वाचाया बसला प्रभू, उलटितो पानें स्वयें वाचुन;
त्यानें आजवरी किती उलटिलीं पानें तया ठाउक,
जाणे तोच पुढील यांत उरलीं पानें किती आणिक. ३

जन्मापासुन पाहिलीं वरवरीं तेवीस पानें पुरीं,
कोणा माहित आणखी किततरी पाहीन या भूवरीं ?
दृष्टीदेखत आज पान सरलें; आलें नवें बाहिर,
जाणूं काय अम्हीं शुभाशुभ किती वाचील तो यावर ? ४

इंदूर, १ जानेवारी १८९८

प्रकाशन बालबोधमेवा, ६ जानेवारी १८९८

मराठी ग्रंथ ... सं. ग्रं. स्थळप्रत
नवें पान उघडलें : ४१
अनुक्रम ८६००३ ... ८६५८
क्रमांक ९६५४ ... नोंद दि. ९८।१।६८

## २. एका मद्यप्याची स्त्री.

□

चाल—चंद्रकांत राजाची कन्या०

हात जोडुनी विनंती करिते स्वामी परिसावी,
इच्छा मनिची या दासीची सखया पुरवावी.
नको नको ही सुरा प्रियकरा ! सोडुनि द्या मेली,
इच्या प्रतापें पहा आपुली काय दशा झाली;
विशाळ डोळे नक्षत्रासम तेज जया नामी,
कटाक्षमात्रें धन्य जगीं या मानित होतें मी;
त्या सवतीनें तेज तयांचें चोरुनियां नेलें,
धुंदीमध्यें लाल सदा ते क्रोधें जणुं झाले.

मौक्तिकहारापरी मनोहर दंतपंक्ति आपुली,
भररस्त्यांमधिं त्या सवतीनें काढुनियां नेली !
शुकचंचूसम ओंठ खालचा लाल कसा अपुला,
दंतपंक्ति परी गेली पाहुनि तोहि फिका पडला !
वक्षस्तल विस्तीर्ण जिवलगा ! भव्य किती होतें,
तेंही पोकळ होऊनि राया ! रात्रंदिन दुखतें,
गोंडस होते हातपाय हे, शक्ति कशी होती,
मांसहीन ते होउनि आतां काड्यापरि दिसती

निर्मल कसले पूर्वज अपुले होते मनिं आणा,
अनुचित असली कृती आपुली ब्रह्मकुलीं जाणा.
मामंजीची कीर्ती तैसी धर्मबुद्धि कसली,
वाळीमध्यें पडलों आपण छी थू जनिं झाली.

एक सुरेच्या नादीं लागुनि अजवरि प्रियकांता !
सर्व सोहळे झाले अपुले सोडुनि द्या आतां.
इच्या संगतीं आजवरी तरि कोण सुखी झाला,
स्त्री–सौभाग्यावरी सदोदित पडे हिचा घाला !
सवती आह्मा मरणासम परि करिन सहन त्याही !
सुरा सवत ही नको नको परि धडगत ही नाहीं.
काय करावा बोध आपणा अजाण अबलेनें,
पदर पसरिते भीक एवढी घाला प्रेमानें !

मुंबई, वुइल्सन कॉलेज, जून १८९४
प्रकाशन, काव्यरत्नावली, मार्च १९००

३. यत्रयत्र हरिणीदृशां क्रमः ।
तत्रतत्र मदनस्य विक्रमः ॥

□

चाल०——पारिजातकानिमित्त भामा०

तो०—सहज चालतां मार्गीं तुजला बघतां डोळे भरून्,
धरिलें किति आवरून गेलें मन माझें बावरून्.
हंसापरि चालणें पदर तो दोन्ही गुच्छांवरून्;
वरचेवर सावरून बघसी मान वांकडी करून्;
गालामधि हाससी साजणी लाजुन बघसी दुरून्,
प्रेमखुणा या करून नेसी हृदय आमुचें हरून्.
चैन पडेना सखे ! जिवाला काया सुकली झुरून्.
रमलों मागें फिरून गेला मन्मथ अंगीं भरून्.

ती०—प्राणसख्या ! मी परकी नारी पडलें दुरच्यादुरी,
तुमची प्राणेश्वरी जाहलें बाण लागला उरीं.
करमेना मुखचंद्र पाहिल्यावांचुनि प्राणेश्वरा;
तुमचा मज आसरा सख्या ! मी धरिलें तुमच्या करां.
ईश्वर माझे तुह्मीं राजसा ! मी तुमची पार्वती.
येतें काकूळती मनींचीं दुःखें सांगू किती !

१८९५ (?)

# ४. श्रीशिवछत्रपति

□

चाल०—अर्धतनू वारुळीं बुडाली

हिरण्यकश्यपु दानवशेखर महीवरी मातला
छळाया हरिभक्तां लागला
साधुजना अल्हाद पुत्र प्रल्हाद रत्न भूतला,
स्मरे हरि ह्मणुनि छळी त्याजला
खरतर नखशिखरांनीं रोषें उदरभाग फाडिला,
नृसिंहें साधुवृंद रक्षिला
तैसाच शिवाजीराय मला भासला,
अफझूलखान जो यवन जगीं मातला,
शिवजीवितहरणीं दुष्ट सिद्ध जाहला
वाघनखानें उदर विदारुनि निजधामां धाडिला
दुजा नरसिंह जना लाभला

१८९५ (?)

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम.................. दि: ..................
विभाग .................. नोंद दि..................

## ५. सखे सुमनमाले !

☐

दिंड्या

सुमनमाले ! सोडोनि सुमनचापा,
कशी आलिस नभ त्यजुनि जशी शंपा;
बाण कुसुमाचा काय तुझ्यारूपें,
धाडिला हा मजवरी कुसुमचापें ?
जरी असती सुंदरी आज येथें,
तरी पेटविती खास अनंगातें;
तदंगीची मृदुलता तुझ्या अंगीं
दिसे ह्मणुनिच तुज ठेवितों पलंगीं.

सुबक वर्तुलशा केशकलापांत
तुला असते ठेविलें मी सुखांत,
तस ऐशा पडलीस उरीं आतां,
भोग माले ! मजसवें विरहचिंता.
अहा ! हर हर ! तव काय दशा झाली !
क्षणामध्यें टवटवी तुझी गेली !
विरहवन्ही जो भाजतो मला गे !
आंच त्याची तुजलाहि काय लागे ?

मृदुल काया पाहुनी तुझी माले !
कोमलांगीचें चित्र पुढें आलें.
सोड भीती सोडही तसकाया,
सुखें राही सोडोनि दूर शय्या.

दूर राहुनि सुकलीस अधिक माले !
सांग बाई ! हें काय असें झालें ?
काय सुकली मत्प्रिया तुझ्यावाणी ?
होय म्हणशी कां ? जळो तुझी वाणी !

दुष्ट माले ! जा नीघ इथुनि आतां,
तुझ्यायोगें पेटली अधिक चिंता,
प्रिया असतां मज सौख्य दिलें चित्तीं,
म्हणुनि फसलों घेवोनि तुला हातीं
स्पर्श शीतल संताप वाढवीतो;
सुमनगंधेंही शूल शिरीं होतो;
पहा दैवाची कशी उलट रीती,
सुखद वस्तूही दुःख मना देती.

अहमदनगर ६ एप्रिल १८९६

## ६. बाळा वत्सरा, ये तुझें स्वागत असो !

□

चाल०—बाळा जो जो रे कुलभुषणा०

येई रे सखया, जगतीं या, बाळा, वत्सरराया !
कोमल तव काया, पाहुनिया, उद्भवली मज माया; येई रे सखया !
कोठुनि तूं येशी, समयासी, कवण्या ठायीं जाशी,
हें जरि आम्हासी, नच कथिसी, तरि ये झणि या ठाया. येई रे सखया !
अगणित तव सरिचे, बहु परिचे, गेले वत्सर अमुचे,
तरि ही हृदयाचें, आशेचें, बीज न जळलें राया. येई रे सखया !
पाहुनि तव केली, मति भ्रमली, स्मृतिही जागृत झाली,
वत्सरवदनाली, मनिं आली, टोंचाया मम हृदया. येई रे सखया !
वर्षें घालविलीं, गतकालीं, अनुचित कर्में केलीं,
तीं मज आठवलीं, तनु शिणली, येई रे सुखवाया. येई रे सखया !
पश्चात्ताप मला, बहु झाला, पाहुनि तव मुखकमला,
आतां मी तुजला, प्रतिघटिला, दवडिन कधिं नच वायां. येई रे सखया !
सृष्टी तव भगिनी, मनरमणी, नटुनी वस्त्राभरणीं,
थकली वाहोनी, दिनरजनीं, येई तिज रमवाया. येई रे सखया !
तव संगें जगतीं, गुण, प्रीती, आत्मिक कायिक शांती,
निर्मल सन्नीती, सद्भक्ती, वाढो प्रभुगुण गाया. येई रे सखया !

अहमदनगर, १२ डिसेंबर १८९६
प्रकाशन, बालबोधमेवा, ७ जानेवारी १८९७

# ७. मित्रा विहंगा !

□

दिंडया

कुठें आतां जाशील विहंगारे !
यत्न मित्रा ! खुंटले तुझे सारे.
पंख फडफड का व्यर्थ करीतोसी
चंचु माराया उगिच कां पहासी !
पुरे झाले तव यत्न स्वस्थ राहें,
मृदुल तनुला दुखविणें उचित कां हें ?
तुला नाहीं देणार मुळीं त्रास
सुखें माझ्या घरिं करीं सख्या वास.
नांव सांगे तव काय असे राया !
कुणीं केली ही मृदुल तुझी काया ?
रंग अनुपम अगणीत चमकतीरे !
अम्हां दुर्लभ तुज कुणीं दिलें सारें ?
भ्रमणशक्तीही, चपलता तुझी ही,
कुणीं साठविली सांग तुझ्या देहीं ?
मधुर सुस्वर तव कंठ कुणीं केला ?
सांग, ऐकाया जाहलो भुकेला.
दिली ज्यानें मज श्रेष्ठ मनुजकाया
करीं माझ्यावरि नित्य दया माया
त्याच देवानें काय तुला केलें ?
होय म्हणशी ? लाडक्या, पुरें झालें.
सर्व माझ्या चिमुकल्या अतां राहीं;

मराठा ग्रंथ मित्रा विहंगा
अनुक्रम २८००२ दि:
नोंद दि:

भीति शंका नच धरीं मनीं कांहीं;
सुबक पंजर आणीन तुझ्यासाठीं;
तुला नाहीं होणार कधीं दाटी
तुला देइन मिष्टान्न सदा खाया,
उद्यां नूपुर बांधीन तुझ्या पायां,
सर्व सौख्यें देईन नित्य तूं तें,
सवें माझ्या चल सोनुल्या ! घरातें.
कांपसी कां गोजिऱ्या ! थरारोनी ?
नेत्र गेले कां अश्रूनें भरोनी ?
दीनवाणी कां पाहसी मला तूं ?
सांग मनिंचा निःशंक काय हेतु ?
नको उघडूं तव चंचु, नको बाळा !
हेतु अंतरिचा तुझा ओळखीला,
सर्व सौख्यें तुज मृत्युच्या समान
जरी पडशी पंजरीं बंदिवान !
नको राहूं पंजरीं दीनवाणी;
भोग स्वातंत्र्यानंद सुखें रानीं !
पारतंत्र्याचें दुःख मला ठावें;
मीच तुजला पंजरीं कसें न्यावें ?
सुखें जाई संचार करीं व्योमीं;
भोग विहगा ! स्वातंत्र्यसुखा धामीं !
अम्हां येइल स्वातंत्र्य, तदा मी ही,
मग्न होइन तुजपरी सौख्यडोहीं !

अहमदनगर, १६ डिसेंबर १८९६
प्रकाशन, रसतरंगिणी १९२०

# ८. प्रिये कवितासुंदरी !

□

दिंड्या

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १६३०२

सहज बसलों येऊनि मंदिरांत
वेळ जागा पाहूनि ही निवांत
अशा वेळीं सोडोनि भीड लाज
प्रिये कवितासुंदरी, येईं आज.

कुणी नाहीं या स्थळीं सखे ! आतां.
केलिभंगाची नको धरूं चिंता;
इथें नाहीं रसविमुख अज्ञ कोणी;
तुझ्या दासाविण अन्य नसे प्राणी.

जयीं मंजुळ रुणझुणति नूपुरें गे !
पदें टाकित स्वच्छंद अशी वेगें,
सुमन रुचिरालंकार भूषणांहीं,
भूषवूनी तनुलता तुझी येईं.

विविध रसपूरित रम्य विलासांनीं
धन्य व्हावें मनिं हेतू हा धरोनी,
हृदयमंदिर हे वाट तुझी पाही
भीति लज्जा सोडूनि सखे ! येईं.

चरणनूपुर कलसिंजता करोनी,
तृषित श्रवणा मम टाक तोषवोनी,
इंदुमंडलमदहारि वदन दावीं,
दृष्टि तेणें कृतकृत्य ही करावी.

जिला ऐकुनि कोकिला लाजताती
हरिण रिझती मनिं, शिखी नाचता ती,
नागकिन्नर गंधर्व डोलती, ती
मधुर वाणी तव देउं मला शांति.

अहा दैवा, हें काय असें केलें !
वचन माझें वनरुदनपरी झालें;
नाहिं कवितासुंदरी इथें आली,
मला सोडुनि ती हाय ! कुठें गेली ?

कुठें पाहूं, ती हृदयरंजयंती ?
प्राण माझे हे जाउं कीं पहाती.
शून्य दिसती दशदिशा अतां मातें;
कुणी दावाहो ! प्राणवल्लभेतें !

जिच्याकरितां जन्म या जगीं झाला,
जिच्यासंगें मम सर्व काळ गेला,
तीच गेली सोडूनि मला आज,
जगायाचें संपलें अतां काज.

कुठें असशी सुंदरी सांग सांग !
हृदयभवना लागली पहा आग !
सांग सखये ! तव प्रेम कुठें गेलें ?
हृदय कां गे पाषाणकठिण केलें ?

तनूसंगें तुज वाढविलें स्नेहें
दिलें त्याचें फळ आज मला कां हें !
काय केला अपराध तुझा बाले !
काय सांगें विपरीत मनीं आलें ?

तुझ्याकरितां सोडीन पंचप्राण,
जिथें असशिल येईन तिथें जाण,
नको पाहूं निर्दये ! अंत आतां !
कुणी नाहीं तुजविणें मला त्राता.

दिसत नाहिंस कोठेंच आसपास
कुठें जाऊं मी तुला पहायास !
काय गेलिस निर्दये स्वर्गधामीं !
तुझ्या दासा लोटोनि शोकहोमीं !

तुझ्याकरितां उपभोग भोगिलें गे !
सदा प्रेमें राहिलों तुझ्या संगें;
तुझ्याकरितां इष्टार्थ सोडियेलें;
हेंच त्याचें फळ काय मला आलें ?

तुझ्या संगें हिंडलों स्मशानांत !
रम्य उद्यानीं, घोर अरण्यांत !
सदा छायेपरि तुला वागवीलें !
हेंच त्याचें फळ काय मला आलें ?

भव्य सुंदरशा राजमंदिरांत,
तेंवि आनंदें क्षुद्र कोटरांत,
राहिलों मी तुजसवें तुला ठावें;
काय त्याचें फळ हेंच तुवां द्यावें ?

रम्य ललना, सुमलता, पिता, माता,
तोष देति न लडिवाळ शिशू आतां,
मधुर गायन हें करिती कोकिळादी,
उलट तेणें कर्णास होय व्याधी !

अतां सरिता जणुं उगिच वाहती या.
स्तब्ध पर्वत बसलेत अतां वाया.
विफल होती उपदेश वनश्रीचे.
अतां नुरलें माधुर्य विलासांचें,

मंदशीतल मधु गंध वास कां हा,
फुकट शिवतो शृंगार विमुख देहा ?
चंद्रतारागण रडति असे कां हे
कशाकरितां ही निशा अतां बाहे !

तुझ्या संगें उपदेश शक्ति यांची
निघुनि गेली जशि चेतना मृताची
सृष्टि सुंदरि मजसवें अतां कांहीं
तुझ्या मागें शब्दही वदत नाहीं !

अहमदनगर, २० डिसेंबर १८९६

# ९. बाई लतिके !

☐

चाल०—वसंतीं वधुनि

लतिके, तुजला निर्मुनियां,
कमाल केली विधिनें खर्चुनि अपुल्या चातुर्या.
नवती तव ही रसरसली
दिसेल कां मज नवयुवतीच्या तरुणपणीं असली ?
तव लुसलुसित पल्लवांना
पाहुनि कामिनिबिंबाधर त्यजितील खचित माना.
लढलिस सुमनभूषणांनीं,
पाहुनी त्यजितिल मौक्तिकमाला विलासिनी रमणी.
तुझे नव मृदुतंतू रुळती,
कुटिल मुक्तकुंतल तरुणीचे काय असे दिसती ?
थरथर कांपतेस पवनें,
छळिलें कां तुज सांग मला गे निर्दय मदनानें ?
छे तुज मदन जरी बघता
टाकुनि पांचहि बाण तुला तो हातीं वागविता !
मग कां कांपतेस लतिके ?
लाजुं नको, मज सांग सखे, कुणि नाहीं इथें परकें.
हें कां लक्षण प्रेमाचें ?
किंवा वृक्षालिंगन झालें कारण कंपाचें ?
किंवा भ्यालिस तूं मजला ?
जाणतेस कां वज्रासम या निष्ठुर हृदयाला ?
क्रीडाभंग तुझा केला,

म्हणुनि कोपें कांपतेस कां सांग लते, मजला ?
इतर तरु वांछिति तव संगा,
तद्भयकंपित कवटाळिशि कां निजपतिच्या अंगा ?
वारा गार वनीं सुटला
तेणं रोमांचित होउनि कां कंप असा धरिला ?
कोकिलकूजित ऐकोनी,
भ्यालिस, किंवा लाजलीस या शिखिला पाहोनी ?
तरुचें चुंबन घ्यायाला,
गेलिस प्रेमें तेणं सुटला कंप तुझ्या तनुला ?
लतिके काय तुला झालें ?
किंवा तरुचें प्रेमालिंगन कारण या घडलें ?
नको तूं सांगूं नको मजला,
आहा ! वेडे लाजतेस कां, भाव तुझा कळला,
तुजला निर्मियलें विधिनें
स्त्रीसृष्टीची न्यूनरहित जणुं मूर्ती पहिल्यानें ?
किंवा सृजिलें तुज त्यानें,
मिरवाया चातुर्य आपुलें ? तोच तया जाणें !
किंवा घडली तव काया,
यौवनगर्वित विलासिनींना काय लाजवाया ?
ज्यानें कठिणगिरी घडलें,
त्या ब्रम्ह्यानें कोमल वपु हें काय तुझें केलें ?
छे, तव मदन खरा धाता,
रतिवरि कोपुनि दिली तयें तुज तदधिक सुंदरता !
घेउनी प्रेमाची मूस,
लज्जा विनयादी रस ओतुनि घडिलें तवतनुस.
वर्णूं काय तुझी महती,
प्रेमादी सतिगुण शिकवाया आलिस तूं जगतीं.

निर्जन वनिं कां मग वसशी,
मजसंगें चल, सांग जगाला ठाऊक जें तुजसी.
छे, तूं सोडुं नको तरुला,
कारण मग तूं अयोग्य दिसशिल शिकवाया मजला.
पतिला कवटाळुनि राहीं,
कारण त्यासम सौख्य जगीं या अन्य तुला नाहीं.
झालों शिष्य तुझा आतां,
मीच जाउनी शिकविन तूं जें सांगशील जगता.
तुजसम शिक्षक पाठवुनी,
शिकवी प्रेमळ ईश अम्हांला निजगुण त्या मधुनी.
झालें कार्य तुझें बाई,
शिकलों तद्गुण तुजपासुनि मी; तूंहि सुखें राहीं
पतिसह आनंदें वनिं या,
वास घडो चिरकाल तुझा या जगता शिकवाया !
जातो तुजला सोडोनी,
क्षमा करीं मज हीच प्रार्थना तुज कर जोडोनी.

ओंकारेश्वर आणि खेडीघाट यांच्या दरम्यान
बैलगाडींत. १६ फेब्रुवारी १८९७

## १०. सख्या वसंतवाता !

□

चाल—केशवकरणी अगाध लीला०

वसंतवाता ! बहार केलिस मजला आलिंगुनि,
होतों वाट तुझी पाहुनी.
मनरमणीच्या चंदनशीतल अंगाला स्पर्शुनी,
येशी तूंहि तसा होउनी.
सज्जन—संगति सुखकर, तेणें तूंहि सुखद जाहला,
देशी लाभ तयाचा मला.
छे, पण पवना ! होशिल शीतल कसा तिला स्पर्शुनी,
जळते विरहें जी निशिदिनीं !
पतिव्रतेच्या पवित्र वपुला शिवलासी तूं कसा,
नाहीं हाच येत भरंवसा.
शोक करीते सखी निरंतर हळुच तिथें जाउनी,
पीशी अश्रुजला चोरुनी ?
निद्रेनें सोडिलें ह्मणुनि ती रात्रंदिन जागते,
कसें मग चोरिलेंस अश्रुतें ?
वाहत वाहत येउनि येथें भेटशील तूं मला,
वाटलें असेल ऐसें तिला;
म्हणून आली जवळ तुझ्या ती निरोप सांगावया,
सोडुनी स्त्रीस्वाभाविक भया.
उष्णश्वासें सखिच्या तूंही उष्ण तसा जाहला,
सहवासानें गुण लागला.

नवनीतासम मृदुल मनाची सखी ठाउकें मला;
तूही जाणतोस प्रेमला.
विरहावस्थीं भेटुनि पवना ! भाजशील तूं मशी,
शंका आली तिजला अशी;
म्हणुनी ढाळुनि अश्रुजलातें शीतल केलें तुला,
इथें मग भेटाया धाडिला.
गार जाहला अश्रुजलानें असें म्हणावें तरी,
येते शंका ही अंतरी;
असेल ढाळित अश्रुबिंदु ती अग्निकणाचे परीं,
बसुनि निशिं शून्य शयनमंदिरीं
उष्णाश्रूनें थंड होशि तूं याचा संभव कसा ?
यावा कसा तुझा भरंवसा.
आशा होती तव आलिंगन हृत्तापा शमविल,
कांहीं सौख्य मना देईल,
अग्नीपरि भाजिशी मला तूं काय दया तुज नसे !
प्रसंगीं मित्रहि अरि होतसे !
गार असुनि तू तापद होशी विचित्र करणी कशी ?
सांग मजपासुनि कां चोरिशी ?
येतां येतां मलयगिरीला प्रेमालिंगन दिलें,
म्हणुनि कां शीतल वपु जाहले ?
छे ! पण मलयगिरीवर वसती भुजंग वाताशनी;
तेथुनि येशि कसा वांचुनी ?
सह्यगिरीच्या संगें आली शीतलता कां तुला ?
कसा मग असह्य होशी मला ?
चंदन तरुंना कंपित करुनि तद्‌गुण कां घेतला ?
तिथें पण भुजंग गिळिते तुला !

शशिरायें कां वसंतकालीं हीच दिली दक्षिणा ?
देशि कां तीच पुन्हां या जना ?
अथवा सरितांच्या कटिभागा घट्ट मिठी मारिली,
म्हणुनि कां शीतलता लाभली ?
चोरिलीस कां शीतलता ही कमलवनीं जाउनी ?
ठेविते भ्रमर तुला बांधुनी !
ललितलतांच्या अधरपल्लवा हळुच काय चुंबिलें ?
वा कुचगुच्छा संमर्दिलें ?
पुरें, कशाला हवें मला तें, स्मरण जिवा जाळितें,
त्यांतुनि वहन तुझें झोंबतें,
तापद होशील तर हो पवना, परि आलिंगिन तुला,
देइन प्याया अश्रूजला.
निरोप सखिचा सांगशील तूं म्हणुनि तुला भेटतो
सांग बा हीच भीक मागतो,
सांग, सांग रे, निरोप पवना जाशि कुठें धाउनीं ?
दयेचा लेश नसे कां मनीं ?
हाय ! निर्दया ! चाललास ना दाउनि आशा मला !
पाहिल देव तुला जा खला !

इंदूर, सराफा, ५ मार्च १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी १९२०

# ११. मुग्ध कलिका

□

चाल—हंसगति वृत्त, किंवा भूपती खरें ते०

ही कलिका—छे, ही सौंदर्याची खाण,
ही मूर्तिमती मृदुलता होय निर्माण;
ही मुग्धावस्था आली कां लोकीं या,
तारुण्यविलासा अमुच्या अवलोकाया ?

ही इंद्रलोकिंची काय अप्सरा आली !
कीं दुजी उर्वशी शापें कलिका झाली !
कुसुमायुध निष्फळ सोडुनि पांचहि बाण,
धरि करीं इला कां घ्याया आमुचा प्राण !

कीं कविभक्तांची कुलदेवी अवतरली !
कीं साधुयशाची धवल कळी ही बनली !
कीं मधुमाधवश्री कलिकारूपें आली !
कीं परिमललक्ष्मी लतिकेवर या बसली !

कीं उपवनदेवी प्रदोषपूजा करिते,
कीं दावुनि हीते कुमारिकामद हरिते.
कीं सुता लतेची कलिका जन्मा आली !
कीं धवलत्वाची परमावधि ही झाली !

ही लतिका हातीं घेउनि दुहिता अपुली,
या वसंतराया कीं अर्पाया आली
ही आभरणाचें हृदयंगम आभरण !
कीं उपमानाचें अनुपम ही उपमान !



अनुक्रम ........१०५०३...
.......................
९०५४ ९८

ही अनुमानाचे श्रेष्ठ असें अनुमान !
मज क्षणांत शिकवी दुर्लभ ब्रह्मज्ञान
प्रिय कलिके ! तुजला हीच प्रार्थना बाई !
तूं फुलूं नको कधिं अशिच निमीलित राहीं—

तव कोमल काया छळितिल मधुकर काळे,
लुटितील क्षणार्धीं यौवनरस वेल्हाळे !
छे, लतिका–अंकीं बहुधा तूं फुलशील,
तेथूनि गळुनि मग सुकुनि धुळिस मिळशील.

चल कलिके ! तुजला ठेविन मी सुस्थानीं;
कवितारमणीच्या कुंतलांत गुंफोनी,
मग तिथें राहिं तूं आनंदें चिरकाल
तेथुनी कालही कधिं न तुला हलवील

चल कलिके ! बाई मजसंगें चल आतां,
भूषवी सुमनस्नेहाळ कवीची कविता.
गे लते ! क्षमा कर निर्दय या हाताला,
तुजपासुनि तोडुनि नेई जो कलिकेला;

दुहिताजन हें धन परक्याचें तुज ठावें,
मनिं करुनि विवेका दिवस लते ! कंठावें.
माताकर सोडी, सोडी मायाजाल,
चल कलिके, चल गे ! झाली सायंकाळ !

इंदूर, मिशन कॉलेज, १० मार्च १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी, १९१०

# १२. सायंकाल

□

चाल–नंदाच्या घरीं आनंद झाला.

आकाश अंगणीं रांगत आला,
शीण तान्हुल्या भारीच झाला,
पाळण्यामाजी बाळ घातला,
सृष्टीमाउली लागे गायाला,
जो जो रे जो जो

बाई ग माझें बाळ गुणाचें,
रांगत होतें तरी केव्हांचें;
लाल दीसती डोळे झोंपेचे
नीज रे बाळा नीज सुखाचें.
जो जो रे जो जो

पद्में झांकीले डोळे अपुले,
तुंग तरूही शांत जहाले,
पक्षी गाऊनीं निजाया गेले,
वायु तुला हे म्हणूं लागले
जो जो रे जो जो.

निशामातेच्या अंकीं निजाया,
केव्हांच गेला दिवसराया;
जागुनि जागुनि तापली काया
नीज रे बाळा नीज सखया !
जो जो रे जो जो.

अंधार झाला चंद्रहि आला,
भीऊं नको हा दीप लावीला;
भूलोक सारा निद्रिस्त जाहला,
केव्हांची तुला म्हणते बाळा !
जो जो रे जो जो.

आनंदकंदा जगदाधारा !
नीज सुखानें नीज वासरा !
पहाट होतां जाई माघारा;
नीज रे बाळा ! नीज भास्करा !
जो जो रे जो जो.

इंदूर मिशन कॉलेज
१५ मार्च १८९७

## १३. कुसुम-लालन

□

चालः—भूपती खरे ते

चला चला फुलांनों ! चला तिला भेटाया,
कां उगिच दवडितां काल वनीं या वाया

चला चला गड्यांनों ! उठा धरा या हाता,
पाहुनी तुम्हां तोषेल सुमनप्रिय कविता.

स्मितमुखें बघुनि हीं स्मितमुखि तुम्हांपाशी
बैसोनि विचारील मंजुळ गुंजगोष्टींशी

मृदु कोमल काया मधु गंधानें भरली,
समगुणा बघुनि ठेविल तुम्हां ती जवळीं.

करि घेउनि तुम्हां दाविल ती जग सारें;
कधिं नाहीं तुम्हां शिवणार भयाचें वारें.

ही हास्यमुखश्री कधिं नाहीं सुकणार,
राहील सदा हा तारुण्याचा बहर.

हो मृदुकाया, टवटवी तसा मधु वास
तिजसवें वसुनि देईल तोष जगतास.

अंकावरि घेउनि तुम्हां कवितारमणी,
कोकिलस्वरानें गाइल मंजुळवाणी.

सुतभावें देइल कंठालिंगन कवणा,
मधुगंधमिषें चुंबील जशी स्मितवदना;

लाडानें उचलुनि शिरीं कुणा ठेवील.
कुरवाळुनि कवणा हळु हृदया लावील.

ही बघा तीच ही सुमनविहारी आली,
शोधीत मला या शिरीषतरुच्या खालीं.

येथेंच बसा सुखरूप फुलांनो ! आतां,
तरुपासुनि तुम्हां नेइल कां ही कविता ?

इंदूर, किबेसरकारांचा बाग
१ एप्रिल १८९७

# १४. वर्ष-प्रतिपदा

□

चाल—घनश्याम सुंदरा

दिन रजनीचा विभाग व्हाया रविशशि निर्मियले,
तेंच दिनीं या जगतीं पहिलें वर्ष सुरू झालें,
ईशकृपेचा प्रकाश आला रविहस्तें जगतीं,
ती पहिली–ती खरी प्रतिपदा; ठावें कवणा ती ?

अनंत दिन लोटले प्रतिपदा न कळे कवणाला,
म्हणुनी मंगलकालीं दुसरा रवि उदया आला.
अवन्ति प्राची, नृपसिंहासन–उदयगिरीशिखरीं
विक्रमशाली विक्रमभानू उगवे भू-अंबरीं.

यवन-तमा विध्वंसुनि प्रकृतीजीवित संरक्षिलें,
विक्रमसंवत राज्यारोहणदिनीं सुरू झालें.
दुसरी ती प्रतिपदा, दिवस तो मंगल भूमंडला,
गेली ती प्रतिपदा ! तियेला काळ किती झाला !

गुढयातोरणें उंच अंबरीं आज उभारीती,
मिष्टान्नें सेविति नरनारी, आनंदें डुलती.
विलासरंगीं होती दंगहि; मन परि तळमळतें,
धांव धांव बा विक्रमराया ! रक्षि आर्यभूतें ?

परवशता जाळिते जनाला, असुर बहू मातले !
धांव धांव रे विक्रम नृपते ! कुठें गमन केलें ?
राग सोड विक्रमा, येइ रे ! डोळे कां मिटले ?
हतभागी तव देश बुडाला ! हाय कसें झालें !

येशिल जेव्हां देशरक्षणा, तोच सुदिन मजला,
तीच खरी प्रतिपदा ! तोच सण सुवर्णभूमीला !

इंदूर, सराफा, चैत्र शुद्ध १ शके १८१९
३ एप्रिल १८९७

# १५. कोकिलकूजित

□

चाल–घनश्याम सुंदरा

प्रातःकालीं कुणी कोकिला तरुशिखरीं बैसुनी,
उंच स्वरानें सांगु लागली जगतालागोनी;
वसंतरायें आज्ञा देउनि मजला पाठविलें,
राजदूति मी आज्ञा त्याची सांगाया आलें;
वसंतराया येइल आतां तुम्हां भेटाया,
राजदर्शना सज्ज रहावें आलें सांगाया.

अलंकारभूषणें लेवुनी तनुला सजवावे
सुहास्यवदनें चतुर खगांनीं सामोरे जावें
बालतृणाचे रम्य गालिचे वनांत पसरावे
विविध फुलांचे सडे तरूनीं मार्गीं घालावे
प्रफुल्ल सुमनें हातीं घेउनि लतिकांनीं रहावें
मंद सुगंधित शीतल अनिलें वनीं संचरावें.

तन्वंगी सरितांनीं प्रेमें नाचावें गावें
तुंग गिरींनीं वसंतवैभव जगता दावावें
मिलिंद बंदीजनीं त्यापुढें पथिं ललकारावें
विहंग वैतालिकें तरुवरीं स्तुतिपाठां गावें
तालतरूनें छत्र, कीचकें चामर ढाळावें
तरुलतिकांनीं विनयें वांकुनि राया वंदावें.

बालरवीनें अरुणगुलाला गगनीं फेंकावें
विकसित सुमनीं रायावरि मकरंदा उधळावें
दिगंगनांनीं दहिंवर सिंचुनि स्नाना घालावें
उपवनश्रीनें वस्त्राभरणें राया सजवावें
वनदेवींनीं षड्रसयुत फलभोजन घालावें
सरोवरांनीं कमलसुगंधी जल प्याया द्यावें

मदनोद्यानीं उंच आसनीं राया बसवावें
वृक्ष वल्लरी मिळुनी मंगलपूजन साधावें
विलासिनींनीं उठुनि वसंता प्रेमें भेटावें
केलिसाधना तयापासुनी मागुनिया घ्यावें
वनीं येउनी कविंनीं कोकिलकूजित ऐकावें
हा बघ आला वसंत कविते! यातें वर्णावें.

अहमदनगर, २२ मे १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी, १९१०

## १६. राजा रविवर्मा यांच्या चित्रांतील

# मेनका शकुंतलेस काय म्हणते ?

□

चाल—माझा भरत पाहिला काय

बाई ! सांगु किती तुजला । आवर शोकाते ॥ ध्रुव० ॥

काया कुसुमाहुन सुकुमार, त्यांतुनि गर्भाचा हा भार,
शिणलिस मार्गक्रमणें फार, बाई ! वार शोकाते.
पतिसेवेची होती आस, नाहीं कळली त्या दुष्टास,
दिधले तुजला फार आयास, लावुनि फांस स्वहिताला.

पाणिग्रहणीं घेउन आण, झाला एकांतीं रममाण,
आतां तोच करी अपमान, विसरुन भान पूर्वींचें.
माय अप्सरा, कौशिक तात, पालक कश्यप, तेज स्वतांत,
ती तूं झालिस केवि अनाथ, या जगतांत वेल्हाळे !

निर्दय कपटी या लोकांत, राहुं नको चल खगपुरांत,
राही माझ्या सुखसदनांत, आनंदांत मजसंगे.
राया होतां पश्चात्ताप, येइल चालत आपोआप,
बाई ! करूं नको संताप, झाला कांप शरिराचा.

भरला नेत्रीं अश्रूपूर, आझुनि भडभड उडतो ऊर,
बाई ! नको करूं हुरहूर, गेला नूर पालटुनी.
करिशिल कितीतरी आक्रोश, पडला तव कंठाला शोष,
होईल सत्याचा जयघोष, हा संतोष मानुनि घे.

यापरि समजावित, कवळून, शकुंतलेसी जगताहून,
गेली जननी वर घेऊन, गगनांतून वीज जशी.

अहमदनगर, २५ मे १८९७
प्रकाशन, मनोरंजन

## १७. फुलांनों ! चला.

□

चाल—भला जन्म हा

वसंतराया म्हणे फुलांनों ! करा त्वरा झडकरी,
चलावें अपुल्या वरच्या घरीं;
विधिआज्ञेनें येथें आलों तुम्हांला घेउनी,
सरला काळ चला येथुनी;
रहाल मागें तरि तो निर्दय वर्षाऋतु येउनी,
टाकिल ठार तुम्हा मारुनी;
प्रेमपाश हा क्षणिक येथला, सोडा तरु वल्लरी,
चलावें आनंदानें घरीं.
ही आम्रमंजरी, हा अलिगुंजारव,
हें कोकिलगायन, हे कोमल पल्लव,
ही मधुमाधवश्री, हें सरितालाघव,
हे नवयुवतीचे विलास, हें गौरव,
येतिल सारे अपणासंगें; फिरुनि येऊं भूवरी,
चलावें आतां अपुल्या घरीं.

अहमदनगर, ३० मे १८९७

# १८. जा दृष्टीबाहेर !

□

श्लोक

जा दृष्टिबाहेरुनि दुष्ट पोरी,
राहूं नको मन्नयनां समोरी !
वाटे मनाला तुज घालवावें,
कोरें फिरोनी हृदया करावें.

मूर्ती तुझी हृत्पटलांवरील,
पूर्वीं कितीदां पुशिली असेल;
आलीस तेथें फिरुनी कशाला ?
नाहीं कशी लाज तुझ्या मनाला ?

गानें जसा फसवितो हरिणा शिकारी,
केलेंस तूंहि तसलें दिवसांदुपारीं.
शृंगारभाव करुनी मन मोहिलेंस,
रानीं जसें मृगजलें मृगशावकास.

चोरी करोनि दिवसां नयनासमोर,
माझें म्हणोनि शिरला सदनांत चोर,
धिक्कारिलें कितिकदां तरि जात नाहीं,
दुष्टे ! तशीच करणी दिसते तुझीही.

तें हास्य, ते प्रणयसूचक हावभाव,
ती लोल दृष्टि, करि जी हृदयास घाव,
तें गोड गोड तव भाषण, सर्व कांहीं
आटोप, नीघ, नलगे तव नांव तेंही.

माझ्या स्मृतींतुनि तुला बघ हांकलीतों,
धूवूनि निर्मळ पुन्हां हृदया करीतों.
देवा ! नको पुनरपि असले प्रसंग !
याहूनि फोडुनि करी हृदया दुभंग !

अहमदनगर, ३० मे १८९७

## १९. प्रतिभा-विहंगा—

◻

नेई मला तुजसवें प्रतिभा विहंगा,
नेतो जसा सदय वात नभीं पतंगा;
संगें तुझ्या सहज जाइन उंच उंच,
संताश्रयें वर चढे कसलाहि नीच.

आकाश पाहिन कसें असतें खरें तें,
भेटेन जाउनि पुढें घनमंडलातें.
हातीं धरीन मग रंगित इंद्रचाप,
सोडोनि वृष्टि सगळा शमवीन ताप.

पाहीन तेथुनि कसे दिसतात देश,
घेतो शिरावरि कसा महिभार शेष,
गंधर्वलोक मग पाहिन तो कसा रे!
जेथें सदा करिति गायन लोक सारे.

पाहीन दिव्य अलकाचल तूंहि पाहीं,
पाहीन इंद्रनगरींतिल अप्सराही.
कैलास पाहुनि खगा उतरोनि येऊं,—
राहूं तिथेंच अथवा; चल ऊठ जाऊं.

कैलास, इंद्रनगरी, अलकावतीही,
या कल्पना उगिच तथ्य तयांत नाहीं!
वर्णीत मूढमति त्या; मज देइ शांती
दावोनि सृष्टिरचना असते कशी ती.

जो त्यागितो निरस मानुनि रम्य सृष्टी
ठेवोनि कल्पित कृतीवरि नित्य दृष्टी,
तो टाकुनी उदकपूर्ण घटा घरांत
प्याया सदा मृगजळा फिरतो वनांत.

सृष्टीच इंद्रनगरी अलकाहि तीच,
कैलास तीच, कविला जननीहि तीच !
अंकीं तिच्या विहरतां कविबालकाते
त्रैलोक्य तुच्छ, चल दाखिव सृष्टि माते.

इंदूर, सराफा, १५ जून १८९७

## २०. मित्रा नारायणा !

☐

तुझ्यामाझ्यामध्यें अगणित जरी कोस असले,
नद्या नाले सिंधू गिरिहि जरि येऊन पडले,
जरी दोघांमध्यें विकट यमराया प्रकटला,
तरी एकेजागीं सतत जिव राहील अपुला.

शशी तो आकाशीं, जलधि जरि भूमीवरि असे,
तरी आकर्षीतो शशि जलधिला—तूं मज तसें !
कुठें तूं, मी कोठें, तुजमजमध्यें पर्वत कडे,
तरी माझें वेडें मन सतत धांवे तुजकडे.

बाल्यापासुनि ज्यास आजवरती स्नेहोदकें पोषिलें,
आली संप्रति ज्या वसंतसमयीं विश्वासरूपी फुलें,
जाळूं पाहति त्यास मत्सरकिडे मूळामधें जाउनी,
विघ्नें वारुनि नित्य प्रेमतरु तो ठेवी जिवा जोपुनी.

सराफा, इंदूर, २० जून १८९७

## २१. लाडके—

□

नाहीं सौख्य जगांत वाटत असें होतें जयाला खरें,
साराया श्रम तो क्षणैक दिधलें कां सौख्य त्याला बरें ?
स्वप्नीं कल्पलतेतळीं विहरतां आली मला जागृती;
गेली कल्पलता कुठे ? मज अतां कांटे पुन्हा टोंचती.

आनंदें भवसागरांत फिरतां त्या प्रेमनौकेंतुनी,
झालें वादळ हाय ! हाय ! बसली नौका तळीं जाउनी.
एकाकी पडलों तशांत वणवा चोहींकडे पेटला
सर्वस्वीं जळतों दयाघन प्रभो ! सोडीव आतां मला.

" प्राणेशा ! हृदयामधीं वसतसा रात्रंदिनीं माझिया, "
ऐसें सांगत तूंच नित्य मजला होतीस ते कासया ?
गेली सोडुनि तूं जगास तरि मी येथेंच कां हें असें ?
झालें भस्म तुझें तरी न जळलों हें सांग झालें कसें ?

सांगावें मजला " सदैव सखया राहीन छायेपरी,"
प्रेमाचीं वचनें तुझीं अजवरी मानीत आलों खरीं;
आतां या तनुवांचुनी वद कशी छाया तिथें राहिली ?
ने तेथें मजला सवें झडकरी वा तूंच ये भूतलीं.

अंधारीं चपला नभीं चमकली काळोख झाला पुन्हा,
सौख्यें तीं दिसलीं पुन्हा हरपलीं भ्रांतिष्ट माझ्या मना.
संसाराटवि एकला फिरूं कसा, अंधार चोहींकडे !
ये ये धावुनि लाडके ! मुखशशी दाखीव आतां गडे !

सौख्या, हा हतदेह सोड, चल ये दुःखा गड्या धावुनी,
तारुण्या, मज तूं नको, प्रियजरे ! येई सुखें यौवनीं,
शृंगारा, क्षणिका, जळो मुख तुझें ! भेटे विरागा मला,
रे रे कां स्मरणा, उगीच छळिशी ! दाखीव देवा तिला !

इंदूर, सराफा, जुलै १८९७

# २२. भगवा झेंडा

☐

भिक्षा वाढ असें समर्थ ह्मणती, न्यायासनीं ऐकुनी,
आला धावत दानशूर नृपती, बोले करा जोडुनी,
" लक्ष्मी ही अपुलीच, राज्य अपुलें, मीही असे आपुला,
घ्यावी ही तलवार, हा मुकुट, हा माथा पदीं वाहिला."

पाहोनी निरपेक्षबुद्धि गुरुजी शिष्याप्रती बोलती,
" आहा रे शिवबा ! जगांत असला तूं एकला भूपती;
बारे, ऊठ, पुरे पुरे विनय हा, संतुष्ट झालों मनीं.
आम्ही नित्य निरिच्छ संपत आम्हा कांहीं नको याहुनी—

हेतू एकच, यत्न एकच असे राया ! तुझा आमुचा,
देशा तारुनि धर्म रक्षुनि करीं संहार या शत्रुचा;
हें देई. दुसरी मला मग नको राया ! तुझी दक्षणा.
नीती न्याय बघोनि नित्य करिजे राजा ! प्रजारक्षणा."

बोले छत्रपती " धरोनि गुरुजी ! आज्ञा शिरीं आपुली,
आहें वागत मी यथामति, जया द्याया भवानी बली !
धर्माचा प्रतिपाल योग्य करणें कर्तव्य माझें खरें;
घ्यावें मागुनि आज आपण गुरो ! कांहीं तरी दूसरें."

" घ्यावें कांहिं तरी असेंच म्हणशी ? दे हेंच राजेश्वरा !
बोलो क्षत्रिय रामराम, पहिला जोहार नीचा बरा.
ठेवोनी निरपेक्षबुद्धि लढती सारे मराठे रणीं,
याची खूण असो तुम्हांस भगवा झेंडा अतांपासुनी.

देवो श्रीरघुवीर मंगल तुला–येतों–बसावें–पुरे, ''
ऐसें बोलुनि रामदासगुरुजी गेले निघोनी त्वरें.
आज्ञा मानुनि ती प्रमाण भगवा झेंडा रणीं लाविला—
कोठें तो नृप, ते गुरू, समय तो, झेंडाहि तो आपुला !

ज्याला पाहुनि धीर वीर समरा सोडोनि भांबावले,
शस्त्रें टाकुनिया स्त्रियांत दडले, देशोधडी लागले,
भ्याले, रानधुळींत चीत पडले, अल्लाकडे धांवले,
झेंडा तो अरिधैर्यभेदक कुठें गेला ? कसें जाहलें !

ओष्ठा चावुनि, दांत खावुनि, मर्दे गर्जोनि रानींवनीं
गेले धावुनि खड्ग घेउनि अहा माझे मराठे रणीं,
मांडी थोपटुनी रणीं झगडले, मेलेहि ज्याच्यास्तव,
झेंडा तो, रणसिंह ते, मज विभो ! स्वप्नीं तरी दाखिव

दिल्ली ध्वंसुनि नाचला झयझया जो शत्रु-छातीवरी,
पाहोनी अटका पुन्हा फडकला जावोनि कोल्हापुरीं,
झाला भीमपराक्रमी, जयजयी, धर्मप्रजापालक,
झेंडा तो मज दाखवा कुणितरी या छातिचा मालक !

स्वामी श्रीशिवभूपती झगडले ज्याच्यापुढें आपुले,
बाजीही पडला, रणीं निजतनू तान्हाजिनें वाहिलें,
बाजीरावहि विप्र, क्षत्रिय परी झाला जयाच्या बळें,
हा ! हा ! क्षत्रिय मी असूनि असु हे त्यावीण कां ठेविले ?

इंदूर, सराफा, जुलै १८९७

## २३. बघसी अंत किती राजसे ?

☐

चाल०---केशवकरणी अगाधलीला

जिकडे तिकडे जगांत सारें प्रेम सांचलें दिसे;
तयाविण कोठें कांहीं नसे.
प्रवाह सारे धांवत जाती नदीकडे अक्षय;
होती तिज भेटुनि अक्षय;
निशिदिनिं रानींवनीं वाहुनी तटिनीही झरझरा,
देती आलिंगन सागरा.
या पुष्पवल्लरी तरुसंगें क्रीडती,
शशिसंगें रमते सदा कौमुदी सती,
अंबरीं समीरण सारे सम्मीलती,
प्रेमावांचुनि निष्फल जीवित ठावे तुजला असे.
बघसी अंत किती राजसे ?

तुंग महीधर गगनश्रीच्या वदनाला चुंबिती;
शशिकर जललहरी कर्षिती.
दिनमणि येतां घरीं प्रेमला पूर्वदिशा सुंदरी
फुलते कदंबकुसुमापरी.
हांसत हांसत प्रफुल्लवदनें तारागण खेळती,
अंबरीं परस्परा ओढिती.

रवि येतां उघडी नेत्रातें कमलिनी,
शशि दिसतां हांसे आनंदुनि कुमुदिनी
वनलक्ष्मी नटते मधु आला पाहुनी
चंचल चपला, परि मेघाला सोडुनि दूर न वसे
बघसी अंत किती राजसे ?

शालदुशाला नको, नको मज मंदिलही भरजरी,
त्याहुनि कंथा माझी बरी.
सुरेंद्रनगरी नको, तुजसवें राहिन मी काननीं,
दुजें धन नको मला तुजहुनी,
ओवाळुनि टाकिन तुजवरुनी साठ कोटि अप्सरा !
नको ती विष्णूची इंदिरा !
तुज शोधित फिरलों जनीं स्मशानीं वनीं,
तरु वल्ली विहगा विचारिलें जाउनी,
गिरि सरिता उडुगण नाहीं सांगत कुणी,
काय करूं तुज पाहूं कोठें तुजविण भरलें पिसें
बघसी अंत किती राजसे ?

झुळझुळ वाहे प्रवाहजल हें एकसारखें जसें,
माझें आयु चाललें तसें.
तुजविण दिसती शून्य दशदिशा ये लवकरि धाउनी
देई आलिंगन साजणी !
सुमनभूषणें रचुनि परोपरि तनुलतिका मंडिन;
गुंफुनि अलंकार देइन;
नवकाव्यमाळ वेणींत तुझ्या घालिन,
नवरसी सुरस मिष्टान्न तुला चारिन,
या कविकुंजांतच तुजसंगें राहिन,

सखये कविते ! दर्शन दे मज तुजविण कोणी नसे;
बघसी अंत किती राजसे ?

शास्त्राभ्यासा करुनी विटलों, विटलों विद्यालया;
यानें जाइन लवकरि लया.
महापरीक्षा झाली, आली विद्या अथवा कला,
तरि मी तुजवांचुनि एकला !
प्रेमदृष्टि तूं ठेव मजवरी, मग सारें तत्क्षणीं
देइन हाकुन हृदयांतुनी !
ही विद्या साधिल तव पदसंवाहन,
ही कला करिल तव तनुलतिकामंडन,
नवकाव्य रचुनि हा दास करिल रंजन,
तव चरणीं सर्वस्व वाहिलें, येउनि घे त्या कसें
बघसी अंत किती राजसे ?

इंदूर, सराफा, ऑगस्ट, १८९७
प्रकाशन, सुविचार समागम, सप्टेंबर १८९७

## २४. निजनीज माझ्या बाळा !

□

चाल—सुतार निर्गुणिंचे तुजसाठीं आणवीले

बा नीज गडे नीज गडे लडिवाळा !
निज नीज माझ्या बाळा ॥ ध्रु० ॥

रवि गेला रे सोडुनि आकाशाला,
धन जैसें दुर्भाग्याला.
अंधार वसे चोहिंकडे गगनांत,
गरिबाच्या जेंवि मनांत.
बघ थकुनि कसा निजला हा इहलोक;
मम आशा जेंवि अनेक.
खडबड हे उंदिर करिती,
कण शोधायातें फिरती,
परि अंतीं निराश होती;
लवकरि हेही सोडितील सदनाला;
गणगोत जसें अपणाला.

बहु दिवसांच्या जुन्या कुडाच्या भिंती;
कुजुनी त्यां भोकें पडती.
त्यांमधुनी त्या दाखविती जगताला
दारिद्र्य आपुलें बाळा.
हें कळकीचें जीर्ण मोडकें दार
कर कर कर वाजे फार;

हें दुःखानें कण्हुनि कथी लोकांला
दारिद्र्य आपुलें बाळा.
वाहतो फटींतुनि वारा;
सुकवीतो अश्रूधारा;
तुज नीज म्हणे सुकुमारा !
हा सूर धरी माझ्या या गीताला
निज नीज माझ्या बाळा !

जोंवरतीं हें जीर्ण झोपडें अपुलें
दैवानें नाहीं पडलें,
तोंवरतीं तूं झोंप घेत जा बाळा;
काळजी पुढें देवाला !
जोंवरतीं या कुडींत राहिल प्राण,
तोंवरि तुज संगोपीन;
तदनंतरची करूं नको तूं चिंता;
नारायण तुजला त्राता.
दारिद्र्या चोरिल कोण ?
आकाशा पाडिल कोण ?
दिग्वसना फाडिल कोण ?
त्रैलोक्यपती आता त्राता तुजला,
निज नीज माझ्या बाळा !
तुज जन्म दिला सार्थक नाहीं केलें;
तुज कांहिं न मीं ठेवीलें.
तुज कोणि नसे, छाया तुज आकाश;
धन दारिद्र्याची रास;
या दाहि दिशा वस्त्र तुला सुकुमारा;
गृह निर्जन रानीं थारा;

तुज ज्ञान नसे अज्ञानाविण कांहीं;
भिक्षेविण धंदा नाहीं.
तरि सोडुं नको सत्याला,
धन अक्षय तेंच जिवाला;
भावें भज दीनदयाळा;
मग रक्षिल तो करुणासागर तुजला.
निजनीज माझ्या बाळा !

[इंदूर, सराफा, सप्टेंबर १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी १९१०

# २५. विश्वामित्रीच्या कांठा

( स्थल—बडोदें येथील कमिटी बागेंतील झुलता पूल.
वेळ—पौर्णिमेची चांदणी रात्र )

□

चाल—फुलें वेलीचीं

बघुनि मन धालें
साफल्य दृष्टिचें झालें ! ध्रु०

पाउस बर्फांचा जणुं पडतो;
रजताचा जणुं मेघ वितळतो;
किंवा चंद्रकांत पाझरतो;
जणूं शीतांगी—
मत्प्रिया मला आलिंगी ! १

शीतल चंदनरसांत पडलों;
अथवा अमृतडोहिं बुडालों;
किंवा सुखस्वप्नीं सांपडलों;
न कळे कांहीं—
जिव वेडावुनि हा जाई ! २

शांतिदेवता निराकारिणी
वसते जणु या मंगल स्थानीं;
सांगे मजला या उद्यानीं,
" चंचल बाला !—
बघ इथें जगन्नाथाला ! " ३

सृष्टिसुंदरी नटली थटली,
सूक्ष्म धवल वल्कला नेसली;
खुलली जणुं सुमवेली फुलली;
रम्य ही शोभा—
हिजपुढें काय ती रंभा ! ४

शांत तटिनि जणु पथ स्फटिकाचा
जातिपुष्पपथ वनदेवीचा
किंवा ओघ सजिव रजताचा
कीं रत्नाची—
मेखलाच उद्यानाची ! ५

विश्वामित्रीजलिं या कालीं
तटवनभूमी बिंबित झाली;
वरतीं तैसें दिसतें खालीं;
अद्भुत झालें—
पाताळ आज पाहीलें ! ६

तारांगणही स्पष्ट बिंबलें,
स्नाना जणुं हे मुनि अवतरले;
तेजोनिधि कीं ऋषी बैसले
ध्यान धरोनी—
जलसमाधिस्थ होवोनी ! ७

शशिरायाही आंत उतरला,
कलहंसापरि पोहुं लागला;
तटिनीनें जणुं हृदयीं धरिला;
प्रेमळ कांत—
पाहुनी इथें एकांत ! ८

जेथें असली श्रेष्ठ मंडळी,
तिथेंच गरिबा जागा दिधली;
शंका सखये ! परि उद्भवली,
खरी मग काया—
उदकांमधिं वा भूवरि या ! ९

वरतीं खालीं दिसतें गगन;
मध्यें लंबित अपुलें भवन;
वातावरणीं आधाराविण
गोजिरवाणी—
फेंकिला चेंडु हा कोणी ! १०

वरतीं खालीं ही शशिकांती;
द्विगुणित शोभा द्विगुणित शांती;
द्विगुणित आनंदाची भरती,
दृष्टि बावरली—
वर पाहूं किंवा खालीं ! ११

स्मरणशक्तिके ! जागृत होईं;
दर्शनदुर्लभ शोभा पाहीं,
विसरूं नको बघ यांतिल कांहीं;
वारंवार—
कोठुनी असें दिसणार ? १२

इंदूर, ८ ऑक्टोबर १८९७, आणि बडोदें
प्रकाशन, मा. मनोरंजन. डिसेंबर १८९८

## २६. तरुवरा !

□

चाल–केशवकरणी अगाध लीला

क्षुद्रबुद्धिनें अवगणिलें तरि थोर करी उपकृती,
    दिसते तीच मला तव रिती. १
कितीक वेळां जवळुनि गेलों, नाहिं पाहिलें तुला;
    मनीं तूं राग न तो मानिला. २
विहंगवदनें हका मारिल्या, जवळि न आलो, तरी
    धरिला राग न तो अंतरीं. ३
अपराध्यावरतींही करिती संत दया अक्षय;
    दिसतो तोच तुझा निश्चय. ४
जलवृष्टीनें भिजलों आलों जवळ तुझ्या तरुवरा !
    दिला तूं प्रेमानें आसरा. ५
संकटसमयीं सहाय्य करिती संत सुजनदुर्जनां,
    नाहीं भेद मनीं सज्जना. ६
शाखाकर पसरुनी तयांच्या खालीं मज घेतलें,
    सुतासम स्नेहें सांभाळिलें ७
फेडुं कसा उपकार तुझा मी दुर्बल नकळे मला;
    अर्पितों पद्यसुमन हें तुला. ८

इंदूर, नदीचें तीर, १० ऑक्टोबर, १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी १९१०

## २७. एका आसन्नमरण दुष्काळपीडितास

□

चाल—नृपममता रामावरतीं

सुटलासी दीन अनाथा,
धरिलेंसी मृत्यूपंथा; शेवटीं. १

संपला येथला वास;
सरला तव आयुप्रवास; शेवटीं. २

दारिद्र्यदशा तनुसंगें
येथेंच राहिली मागें; यापुढें. ३

तुज तीव्र रवीचा ताप
मावळला आपोआप; यापुढें ४

तुज अदय हिंवाचें वारें
झोंबेल कधींहि न वारे; यापुढें ५

घनवृष्टि पुन्हां येथील
कधिंही न तुला भिजवील; यापुढें. ६

हंसतील न आतां धनिक;
छळितील न निर्दय लोक; यापुढें. ७

वसनाची न करीं चिंता;
झालास दिव्य तूं आतां; यापुढें, ८

गेलास करुनि अन्नान्न;
करिं आतां अमृतपान; यापुढें. ९

हरल्या तव आधिव्याधी;
टळल्या तव सर्व उपाधी; यापुढें. १०

बहुमान तसा अपमान
तुज आतां सर्व समान; यापुढें. ११

तनुविकार येथिल सारे
येथेंच राहिले बारे; यापुढें. १२

गेलास खऱ्या सुखधामा;
घे आतां चिर विश्रामा; यापुढें. १३

अशनाविण वसनावीण
गेलास अम्हां त्यागून; त्रासुनी. १४

सांगशील ना सुरभवनीं
किति निर्दय आम्ही प्राणी; येथले. १५

प्रेमाचें मोल कुणाला
ठाऊक नसे आम्हांला; सांग तूं. १६

या सांग सुखानें कांहीं;
मज आतां बघवत नाहीं; ही दशा. १७

चाललों तरी सखया मी;
भेटेन तुला निजधामीं; लवकरी! १८

इंदूर सराफा, १२ ऑक्टोबर १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी १९१०

## २८. विनवणी

□

चाल—राग आला ना फार केशवा

काय झालें हो आज साजणा,
रुसुनि बसलां कां हृदयरंजना ?

प्रणयकलहीं बोललें टाकुनी,
काय बसलां हो तेंच घेउनी,
पदर पसरीतें हात जोडुनी,
जळो मेला हा जीव राहिना !
काय झालें हो आज साजणा ?

पुरे नाहीं कां राग जाहला,
दोन घटका मशिं नाहिं बोललां,
काय माझा हा अंत पाहिला,
गडे बोलांना कां दयाघना ?
काय झालें हो आज साजणा ? २

" येइं माझे लाडके साजणी, "
म्हणा माझा हा पदर ओढुनी,
गोड बोला मशिं जवळ घेउनी,
शपथ कंठाची प्राणजीवना !
काय झालें हो आज साजणा ? ३

इंदूर, सराफा, १५ ऑक्टोबर १८९७

# २९. बोलत कां नाहीं ?

□

चाल–कृष्ण गडी अपुला

बोलत कां नाहीं, झालें काय तुला बाई !
चोळी परकर नवीन केले,
दागदागिने सर्व घातले,
चूल बोळकें जवळ मांडिलें,
दिलें सर्व कांहीं, तरी तूं बोलत कां नाहीं ? १

आई तुजला रागें भरली ?
कीं दादानें खोडी केली ?
रुसली माझी बाळ सोनुली,
काय करूं बाई, गडे तूं बोलत कां नाहीं ? २

सांग तुला कां भूक लागली ?
देउं काय मी लाटुनि पोळी ?
रुसूं नको, घे ही बघ झाली
छकुले ! ये खा ही, गडे ! तूं बोलत कां नाहीं ? ३

शेजारिण वेणुचा बाहुला,
नवरा तुजला आज पाहिला,
म्हणुनि लाजुनी धरिशि अबोला ?
ओळखलें बाई, नको तूं सांगु नको कांहीं ! ४

इंदूर, सराफा, १७ ऑक्टोबर १८९७

## २०. प्रभात

□

चाल—घनश्याम सुंदरा

प्रभात झाला रवी उदेला ऊठ उशिर झाला;
प्रेमळ भावें सरळ मनानें वंदिं जगत्पाला. १

दहिंवर पडलें मौक्तिकवृष्टी जणुं भूवर झाली.
प्रेमरंगरंगित ही स्मितमुखि पूर्व दिशा खुलली. २

मंदमंद मधुगंधि समीरण येती भेटाया;
आलिंगुनि सांगती ' काळ हा दवडुं नको वांया. ' ३

हास्यवदन ही सुमनमंडळी उठुनि उषःकालीं,
दहिंवरतोयें जणुं कां प्रातःस्नान करित बसली. ४

प्रसन्नवदना वनलक्ष्मी ही शुचिर्भूत दिसते;
नानाविध नवपल्लव वाहुनि देवपुजा करिते. ५

तरुवर उठले, प्रफुल्ल झाले, आनंदें डुलती;
तन्मय होउनि मानसपूजा जणुं कां हे करिती. ६

विहंग उठले, गाउं लागले तरुवरि केव्हांचे;
मंजुळ वाणी ऐक, जणूं हे गायक स्वर्गींचे. ७

गगनविहारी खग वैतालिक वायूवरि बसुनी
प्रभुगुण गाती उंच अंबरीं तल्लिन होऊनी. ८

खळखळ वाहत लगबग येती तटिनी गिरिवरुनी;
देवदर्शना जणूं चालल्या भाविक या तरुणी. ९

तरुवसनावृत तुंग पुरातन पर्वत हे दिसती
वल्कलधारी आद्यऋषी जणुं ध्यान धरुनि बसती. १०

जिकडे तिकडे मंगलमय हें भूमंडल दिसतें.
ऊठ मानवा ! आळविं प्रभुला जाइं शरण त्यातें. ११

इंदूर, सराफा, २० ऑक्टोबर १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी १९१०

# २१. आगगाडीस

□

चाल—ऊठ गडे सत्वरी । सेवा शेवटची ही करीं

नेइं मला लवकरी
झाला उशिर किती हा तरी ॥ ध्रु० ॥

मानस माझें स्वेच्छाचारि,
मला सोडुनी तव स्कंधावरिं,
जाउन बसलें केव्हांचें धरिं;
जड काया ही परी,
तरी तू नेइं तिला सत्वरी. १

पवनचपल जन तुजला म्हणती,
मग कां धरिशी ही मंद गती ?
ऐकुन माझी दीन विनंती,
द्रव तुझिया अंतरीं,
आला नाहीं ना तिळभरी ? २

जों जों जवळ घराच्या जातों,
तों तों अधिक उताविळ होतों,
तव निर्जिवपण विसरुनि म्हणतों
वेड्यावेड्यापरी,
बाई नेइं मला झडकरी. ३

आगगाडींत, २२ ऑक्टोबर १८९७

## ३२. १८९७ या वर्षाला

□

चाल—विठाबाई माउली

कालतरूच्या फुला, जाइं रे कालतरूच्या फुला ॥ ध्रु० ॥
कष्टप्रद तव आयु संपलें, घे चिर विश्रांतिला,
अनावृष्टिनें सुललेंशी तूं रोग तुला लागला. १
ज्वरकीटें तव पराग नेले, केलें नीरस तुला,
मास पांकळ्या गळल्या अकरा, सोडीं बाराविला. २
हीच भेट, हा नमस्कार घे आतां शेवटला.
तुजसम अगणित फुलें उमलुनी, गेलीं विलयाला. ३
कालवृक्ष तरि सदैव धरितो नवीन सुमनाला;
विश्वोद्यानीं लावी उपटी एक तोच त्याला. ४
नंतर "आज" निरंतर राहिल "काल" इथें इथला;
तो दिन येइल चिरसुख देइल केव्हां न कळे मला. ५

अहमदनगर, २ नोव्हेंबर १८९७
प्रकाशन, बालबोध मेवा, २ डिसेंबर, १८९७

# ३३. आकाशांतील घारीस

□

अमर्याद हा व्योमसिंधू गभीर
मधें चालली घार ही नाव धीर
अशी उंच ही एकटी संचरे कां
पुसाव्या हिला सर्व येथून शंका १

जगाचा भला थोरला हा पसारा
तुला वाटला काय निःसार सारा
म्हणोनी अम्हां सोडुनी भूमिभागीं
सदा हिंडसी उंच आकाशमार्गी २

खरें प्रेम नाहीं, खरा स्नेह नाहीं,
दयालेश माया नसे येथ कांहीं,
असें वाटलें काय बाई तुला गे !
म्हणोनी तुला अंबरीं गोड लागे ?

जयानें तुझें प्रेम चोरूनि नेलें,
तुला एकलें खालतीं सोडियेलें,
तया वल्लभा अंबरीं शोधण्यातें,
निघालीस का सांग बाई ! खरें तें ?

गतप्राण झालीं तुझीं काय बाळें,
तुला वाटलें प्राण त्यांचे उडाले,
म्हणोनी पुन्हां त्यास आणावयाला
नभीं हिंडशी सांग बाई ! कशाला ? ५

जयानें तुझी निर्मिली पक्षिकाया,
दिली अंबरीं शक्ति तूतें उडाया,
तुला जो सदा पोषितो वाढवीतो.
नभीं शोधिसी काय बाई ! विधी तो ? ६

जगा त्रासुनी लोक संन्यास घेती,
घरा सोडुनी वास रानीं करीती,
परी रानही सोडिलें दूर खालीं,
विरक्ती अशी प्राप्त कां सांग झाली. ७

जगाचा तुला वीट आला कशानें ?
मला गूढ सांगें, तुझ्या संगतीं ने !
नको येथलें प्रेम खोटें क्षणाचें,
गडे ! दाव जें सत्य, जें शाश्वतीचें ? ८

अहमदनगर, २ नोव्हेंबर १८९७
प्रकाशन, रसतरंगिणी, १९१०

## ३४. आंदोलन

□

चाल—नंदाच्या घरीं आनंद झाला

ताई गुणाची माझी छकुली,
" झोंका दे दादा " म्हणूं लागली;
संभाळ ताई ! फांदी वांकली,
दोहीं दोरांना गच्च आवळीं;
जो जो गे जो जो. १

वायुसागरीं आल्या लहरी,
ताई तरंगे नौका त्यांवरी;
कुंतलध्वजा फडफड करी;
पायाचें वल्हें हाण सत्वरी;
जो जो गे जो जो, २

वायुसिंधूला भरती आली,
नौका हालते वरतीं खालीं,
परकर शिडांची त्रेधा उडाली.
शाबास ताई ! माझी सोनुली;
जो जो गे जो जो. ३

देवदयेचें झाड थोरलें,
भक्तिप्रीतीचे दोर बांधले;
मोक्षप्राप्तीचा झोंका हा बाळे !
आनंद देवो तुला वेल्हाळे !
जो जो गे जो जो. ४

अहमदनगर, ५ नोव्हेंबर १८९७
प्रकाशन, बालबोधमेवा १८९७

# ३५. असंतुष्ट पति

□

विद्या दावुं कुणा ? कुणा रसिकता दावूं ? कुणा चातुरी ?
केलेली कविता कुणास शिकवूं ? दावूं कुणा माधुरी ?
अंगीं खेळुनि राहिला सुरस हा शृंगार दावूं कुणा ?
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला धात्या ! अरे दुर्जना ! १
प्रेमें निंदिल कोण ? कोण रसिका कोपेल माझ्यावरी ?
ग्लानी हारिल कोण ? कोण मजला रंजील नानापरी ?
कोणाच्या वदना बघूनि रिझवूं उद्विग्न माझ्या मना ?
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला धात्या ! अरे दुर्जना ! २
कोणाचें सुख साधुनी सुख मनीं मानूं ? कुणा शांतवूं ?
कोणाला विनवूं ? कुणावर रुसूं ? प्रेमा कुणा दाखवूं ?
वाटे जीव नको, असार सगळा संसार वाटे सुना !
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला धात्या ! अरे दुर्जना ! ३
वृद्धाला तरुणी कुरूप पतिला पत्नी मिळे सुंदरी,
मूर्खा बुद्धिमती मिळे अरसिका शृंगारभोक्ती खरी;
ऐशीं योजिशि जोडपीं विषम तूं ! ही कां तुझी योजना ?
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला धात्या ! अरे दुर्जना ! ४
त्यापक्षीं मज मूर्ख अंध करुनी देता बरी बायको,
होता तो उपकार; हाय ! परि ती आशाहि आतां नको !
संसारीं मज गोंवुनी, मज नको ऐसी दिली अंगना !
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला धात्या ! अरे दुर्जना ! ५

१८९७

## २६. दीपका !

□

स्नेहानें जळशी, तयासह दिव्या ! तूं राहसी अक्षय;
स्नेहावांचुन जीवही न धरिशी ऐसा तुझा निश्चय.
स्नेहाचा लवही मिळे न मजला, प्राणास कंटाळलों,
स्नेहावांचुन कोरडाच जळतों—हें काय मी बोललों ? १

कानीं हें पडतांच काय तुजला वाटेल आई बरें ?
वेड्याचें वच मानशील सखये ! कैसें बरें तूं खरें ?
मित्रा ! तूं म्हणशील खास बनला वेडा तुझा सोबती;
बोला—कांहिं म्हणा वदून चुकलों आतां न त्याची क्षिती ! २

अहमदनगर (?) १८९७

## ३७. शाहणी बाहुली

□

चाल-ला बाई ला, वेलाचं पान माझ्या महादेवाला

या बाई या, बघा बघा कशि माझि बसलि बया;
ऐकुं न येतें, हळुहळु अशि माझि छबि बोलते. १
डोळे फिर्वितें, टुलुटुलु कशि माझि सोनि बघते. २
बघा बघा तें, गुलुगुलु गालांतच कशि हंसते. ३
मला वाटतें, इला बाइ सारें कांहिं सारें कळतें. ४
सदा खेळते, कधिं हट धरुन न मागे भलतें. ५
शाहणि कशी, साडिचोळि नवि टेवि जशिच्या तशी. ६

१८९७

प्रकाशन, बालबोध मेवा, २ मार्च १८९९

## ३८. स्वतंत्रतेस—

□

बांधी ज्यास न शृंखला, न कधिं जें कोणा उगा भीतसें,
ऐसें मानस मात्र मंदिर तुझें स्वातंत्र्यदेवी ! असें,
जेथें नित्य घनांधकार असतो कारागृहीं त्या सदा
त्वत्तेजस्तरणी प्रकाश करुनी त्याची हरी आपदा. १

जों जों चंदन घाशिती अधिक दे तों तों सुगंधाप्रती,
जों जों कांचन तावती अधिक तें तों तों झळाळे अती;
जों जों रत्न शिलेवरी उगळिती तत्तेज तों तों चढे,
जों जों बद्ध तुला करूं बघति तूं स्वच्छंद तों तों गडे. २

कोंडोनी अपकीर्ति होइ न तुझी सत्कीर्ति होते परी,
दंडोनी दुबळी नव्हेच उलटी होशी बलाढ्या खरी,
ज्यांना त्वद्‌गुण ठाउके, निज गृहीं त्वद्भक्त जे गाजती,
येथें तेच तुझ्या वधार्थ उठती ही नीति गे कोणती ? ३

१८९७

## ३९. अ आ ई !

□

चाल—तुम्ही चला हो वरमायी, नोवरियाचे आई

मोत्या ! शीकरे अ आ ई,
सांगू कितीतरि बाई ॥ ध्रु० ॥

दादा आई म्हणताती
अ आ इ ई कठिण किती,
तुजला कधी न येइल ती;
म्हणुं दे कोणी कांही
शीक रे अ आ ई. १

यू यू ये ये जवळ कसा,
गुपचुप येथे बैस असा,
ऐक, ध्यान दे, शीक तसा;
धडा पहिला घेई
शीक रे अ आ ई. २

म्हणतां तुजला येत नसे,
शिकविन तुज येईल तसें,
अ आ ई ई भुंक कसें;
कां रे भुंकत नाही
शीक रे अ आ ई. ३

१८९७

# ४०. बाललेखन

☐

[ एका कविमित्राचें मौल्यवान् पुस्तक वाचावयास आणलें
त्यावर आमच्या पश्चात् चिरंजिवानें यथेच्छ रेखाटलें
त्यास उद्देशून :— ]

दिंडी

दौत शाई पुस्तकें छान छान
कुणीं आणिलीं खेळणीं लहान
अशा भावें खेळलें अज्ञ बाळ
बघा त्याचा हा दर्शनीय खेळ ! १

जया लेखन हें काय नसे ठावें.
तया आलें मनिं कांहिं तरि लिहावें.
प्रथम त्याचा हा यत्न इथें झाला
काय लिहिलें तें ठाउकें तयाला ! २

बाललेखक बैसला लिहायाला
मला गमलें जणुं देवदूत आला.
लिपी भाषा स्वर्गिंची हा लिहून
करी वर्णन तेथलें आठवून ! ३

अम्हां कळतें जरि काय तो लिही तें
तरी सार्थक जन्मून खरें होतें;
अमरपुरिचें जें गूढ तया ठावें
काय आम्हां तें कळतही नसावें ? ४


... संग्रहालय, ठा...

सदा आनंदी दुःख लेश नाहीं
सदा निर्मल मग पाप कुठुनि येई ?
शांत कोमल तेथला जसा तैसा
इथें होतों शैशवीं मुक्त जैसा ! ५

कुठुनि आलों मी, कुठें जावयाचें ?
कसा ईश्वर तो, कसे भक्त त्याचे
कसा त्याचा आनंदलोक बा रे !
स्मरत होतों तें बाळपणीं सारें ! ६

हरिणबालासम दुडुदुडू उडावें,
विकच कमलासम गुलुगुलू हंसावें !
विहंगासम किति मधुर मधुर गावें,
स्वर्ग होता तेधवां मला ठावें. ७

अनल जाळी हें जेधवां न ठावें
म्हणुनि भेटावें जया सुमनभावें;
अंग जळतां परि आठवे विशेष
स्वर्ग माझा हा नव्हे अन्य देश. ८

उदक गमलें ही शिळा पसरलीसे
तिथें जाउनि वाटलें रमावेंसें
हाय ! दुःखा आरंभ असा झाला !
सदा सौख्यद तो स्वर्ग कुठें गेला ? ९

पुढें खेळामधिं चित्त गुंग झालें,
लुटूपुटिचें घरदार गळीं आलें,
बालसंसारीं चित्त रंगवीलें,
स्मरण स्वर्गाचें हाय ! निघुनि गेलें ! १०

पित्या शिक्षण हें वाटलें अगत्य
मार चुकवाया बोललों असत्य
अशा परिनें संसर्गदोषयोगें
अघा मागुनि अघ मनीं शिरूं लागे ११

जन्मतः जो लाजवी देवदूता
तोच नीचाहुनि नीच पहा आतां !
अहा ! मूढा, पामरा, पापराशी !
काय केलें तूं स्वयें आपणाशीं ! १२

१८९८
प्रकाशन, सुविचारसमागम, मार्च १८९९

# ४१. देवाजीचीं सर्व मुलें

□

जिकडे तिकडे फुलें फुलें
गोजिरवाणीं जशीं मुलें,
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, १

रंग मजेचा किती खुले,
सुवास चाले चित्त भुले
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, २

जिकडे तिकडे फुलें फुलें!
सान पाखरें, किती किती,
गाती तालसुरांवरती!
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, ३

कुणी खेळती कुणि उडती,
बसती हंसती चिंवचिंवती
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, ४

सान पांखरें किती किती!
सान पांखरें फुलें फुलें,
देवाजीचीं मुलें मुलें!
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, ५

प्रभुयश गाती, घेति झुले,
ऐकुनि हर्षें सृष्टि डुले,
तुम्हि जनांत पहा,
तुम्हि वनांत पहा, ६
देवाजीचीं सर्व मुलें!

१८९८

प्रकाशन, बालबोध मेवा, फेब्रुवारी १८९९

## ४२. एक फुलें विकणारी पोर

□

कुणि घ्या हो ताजीं ताजीं हीं फुलें,
घरिं वाट पहाती भाऊ तान्हुले,
घ्या गुलाब जाई चांफा मोगरा,
कल्याण करिल देवाजी घ्या तुरा.
        ही स्वस्त लाविली वेणी;
        एकेक कळी अश्रूंनीं
        आभारयुक्त भिजवूनी
        देईन तुम्हांलागूनी,—घ्या फुलें १
घ्या बाई लवकर वेण्या; घ्या तुरे;
घरिं रडत असतिल तान्हीं लेंकरें;
मी लहान होतें बाबा वारले;
आईनें मागोमागीं सोडिलें;
अंगावर चिरगुट नाहीं राहिलें;
हे प्राण नकोसे आतां जाहले.
        भावंडें उघडीं पडलों;
        देवाची मर्जी फिरली,
        हीं फुलें विकोनी सगळीं
        खाया नेइन त्यांजवळी—घ्या फुलें. २

अहमदनगर, १८९८
प्रकाशन, बालबोध मेवा, ६ ऑक्टोबर १८९८

# ४३. मावळ्यांस आमंत्रण

☐

भुजंगप्रयात

चला मावळे वीर हो ! या घडीला;
धनी संगरा बोलवीतो तुम्हांला;
लढाया चला सोडुनी सर्व काज,
रणीं दाखवा शत्रुला शौर्य आज. १

चला सज्ज व्हा, घ्या यशस्वी हत्यारें,
चला ज्वान हो ! वृद्ध हो ! आज सारे,
चराया गुरें राहुं द्यावीं वनींच;
असें सांगतों मी न, सांगे धनीच. २

त्यजा चालत्या नांगराला तसाच,
धन्याची करा चाकरी आज साच.
पुरें तोडणें वृक्ष, घ्यावी कुठार
रणीं शत्रुला मारण्या आज ठार. ३

पुरें जेवणें, हातचा घास टाका.
उठा सज्ज व्हा, दुंदुभीनाद ऐका;
नका घालवूं वेळ होतो उशीर,
रणीं पाहतें शत्रुचें वाट शीर. ४

उठा आवळा कंबरा वेळ झाला;
उठा ढाल घ्या खड्ग घ्या लांब भाला.
कुणी गोफणी तीर वा घ्या कृपाण;
अरी–संगरीं माजवावें तुफान. ५

निघा सत्वरीं वादळीं जेंवि लाटा;
चला वेळ झाला, धरा चोरवाटा,
जमा इष्ट जागीं, पळा वायुवेगें
त्यजा आळसा चित्त ठेवा न मागें. ६

चला मावळे वीर हो ! या घडीला;
शिवाजी रणीं बोलवीतो तुम्हांला.
लढाया चला सोडुनी सर्व काज;
रणीं दाखवा शत्रुला शौर्य आज. ७

बडोदें, १८९८

## ४४. दिवाळी

□

दिंडी

कालमहिषासम चंड ते पयोद,
वीरगर्जितसम भयद मेघनाद,
शरापातासम वृष्टि, सर्व कांहीं
नष्ट वर्षाधिपसवें लया जाई. १

शरद्राजा राज्याभिषेक झाला
काळ भीतीचा सर्व तो निमाला
शांतिसमृद्धी शरद्राजकांता
सुखें नांदू लागल्या इथें आतां. २

मेघरूपा पाहूनि अंबरांत
पळत होत्या ज्या तटिनि भयाभीत,
सदय शरदें तच्छत्रु लया नेला,
शांत आतां त्या चालल्या घराला ! ३

जलद–शरवृष्टी सहन वनीं केली
जागजागीं घायाळ तनू झाली
इंद्रधनु तें मोडलें, अरी गेले,
बघुनि फुलले तरु मुदित मनीं झाले. ४

पौरजनही निजगृहा रंगवीती;
द्वारदेशीं सुमहार घालितातीं;
नवीं वस्त्रें भूषणें लेवुनी ही
घरें सजलीं जणुं पुरुष भव्यदेही. ५

गेहगेहीं आकाशदीप मोटे
लाविले हे पाहूनि मना वाटे,
नभा सोडुनि नक्षत्रलोक आला
भूमिभागीं वास्तव्य करायाला. ६

रत्नहारासम अमित दीपराजी
बघुनि आली कल्पना मनामाजीं,
पूर्वजात्मे सोडूनि वीरलोका
विक्रमोत्सव पाहण्या पातले का ! ७

करुनि स्नानें अभ्यंग अंगणांत,
अंगरागा अंगास लावितात,
वसन कनकालंकार लेवुनीयां,
तरुण नटती, नटतात तरुण जाया. ८

जणूं नूतन अभिषिक्त विक्रमाला
बघुनि अनुपम आनंद जनां झाला
म्हणुनि उत्सव करितात—हाय हाय !
दिवस गेले येतील पुन्हां काय ! ९

असो, होतों मंदिरीं या विचारीं,
तोंच कविता पातली मनोहारी !
खिन्नवदना पाहूनि विचारीलें,
“ प्रिये कविते ! काय गे तुला झालें ! ” १०

म्हणे कविता “ ही भाऊबीज आज,
म्हणुनि वाटे सोडूनि सर्व काज,
मनोरंजनभाउची भेट घ्यावी
आस मनिंची कवि ! पूर्ण ही करावी. ” ११

" सखे कविते ! बोलवी तुझा भाऊ,
स्नेहतैला लावूनि घाल न्हाऊं,
कृपावस्त्रें ल्यायास दे तयातें,
सुरस नवरसयुत घाल भोजनातें; १२

भावबल दे पाट त्या बसायास,
भक्तिरांगोळ्या काढ आसपास,
सदयहृदयाचें ताट घे करांत,
ज्ञानदीपा लावूनि ठेव त्यांत; १३

बोध नीरांजन, घृत प्रेमरूप,
वात षड्रिपु, अध्यात्मज्ञानदीप
हाच घेउनि ओवाळ भाउभोंतीं,
खाउ म्हणुनी दे निरभिमान शांती. १४

लाव कुंकुम मग बांधवानुराग,
क्रोधकज्जल हा लावुं नको डाग,
कनक-मौक्तिक हे शब्द-अर्थ घेईं;
लाव भालीं, आनंद विडा देईं. १५

काव्यमाला मग घाल ही गळ्यांत,
यशःपरिमल पसरुं दे दिगंतांत;
माग ओवाळुनि हेंच मनांतील,
देइं भाऊ ! रसिकता जी असेल. " १६

सखे कविते, कल्पने निर्विकारे !
हेंच घेईं मागून तुला सारें.
जिथें नाहीं रसिकता तिथें जाण,
असुनि नसुनी तव सारखेच प्राण ! १७

तुला आतां सांगतों एक गोष्ट—
करीं उत्सव परि तो न मला इष्ट.
मनःस्थिति तूं जाणसी, तुला ठावें,
दिवाळी ही करणें न मला भावें. १८

वसे भीषण अंधार जरि मनांत,
दीप लावा कासया मग जनांत ?
देश बुडला दुःखांत आपुला गे !
कसा उत्सव मग गोड मना लागे. १९

जधीं जाइल दारिद्र्य बांधवांचें,
जधीं जातिल हे दूत यमाजीचे !
जधीं होइल जन्मभू पुण्यशाली,
तदा माझी गे समज ती दिवाळी ! २०

बडोदें, ऑक्टोबर १८९८
प्रकाशन, मनोरंजन, नोव्हेंबर १८९८

# ४५. जननी आर्यभूमि !

□

राग–बिभास, ताल–धुमाळी

अयि भुवनमनोमोहिनी, जननी,
निर्मल सूर्यकरोज्ज्वल धरिणी,
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.

नीलसिंधुजलधौतचरणतल,
अनिलविकंपित श्यामल अंचल,
अंबरचुंबितभाल हिमालय,
धवल मुकुट हा मस्तकिं निर्मल.
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.

प्रथम प्रभातउदय तव गगनीं,
प्रथम सामरव तव तपोवनीं,
प्रथम प्रचारित तव वनभवनीं
ज्ञान, धर्म, कविदैविक वाणी.
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.

करिसी अमुचें चिरकल्याण,
देशविदेशा वितरिसि अन्न,
पुण्यतटिनिपयस्तन्य पाजुन
करिसि नित्य निज बालकपोषण,
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.

बडोदें, ऑक्टोबर, १८९८
प्रकाशन, सुविचार समागम, १८९८

# ४६. शेवटचें मागणें

□

श्लोक

असंख्य जन भूतलीं सरस एकएकाहुन,
तयांत वद तूं कुठें अबल अज्ञ अज्ञाहुन,
पुरातन तसे नवे कवि कितीक, काव्यें किती,
तयांत वद तूं कुठें ? वद मना ! कुठें त्वत्कृती ! १

शिखा गगन भेदिती, दिपविती रविज्योतिंना,
अशी सतत दीप्त ती तळपते कविप्रेरणा;
तयांत ठिणगी कुठें वद मना ! तुझ्या स्फूर्तिंची;
विझेल निमिषांत ही; धरिसि काय आशा हिची। २

प्रचंड कविकल्पनाविहग दिव्य पक्षांवरी
महीतलिं, घनांवरी, उडत दिव्यलोकांवरीं;
विपक्ष तव कल्पनाविहग सांग कोठें मना,
जया सखल भूतलावरिहि चालतां येइना ? ३

निघे हृदयभूंतुनी, दशदिशाहि उल्लंघुनी
विचित्र ! वरतीं चढे नभल्लामगंगेहुनी,
रसाळ वचनौघ जो प्रभुपदीं पडे तों कुठें,
पडे सतत खालतीं वचनधार ती ही कुठें ! ४

समस्तखमणिप्रभा करुनि एक जागीं मनीं
पुराणकविकीर्तिचा विमल अंश तो पाहुनी,
दिसे मज न त्या पुढें फिकट कीट खद्योत मी !
विजें नयन दीपतां नच दिसे तमाला तमीं ! ५

अनर्थ न बरा, असो ‘ कवि ’ सुशब्द अन्वर्थसा,
कवित्व नलगे मला शिखितुरा जसा वायसा.
यथामति करीन मी तुजपुढें सदा जल्पना,
प्रभो ! मधुर मान तूं, तुजशि हीच अभ्यर्थना ! ६

सुवर्ण, शुचि शब्द तूं, मधुर वाक्य तूं, अर्थ तूं,
रसाल रसमूर्ति तूं, यमक तूं, अलंकार तूं,
अनंतगुण काव्य तूं, कवि अनादि वागीश तूं,
तुला रसिक तूं, दुजा तुजसि कोण ? तूं एक तूं. ७

अशा प्रभुवरा तुझे गुण किती, कुठें कोणते,
यथास्थित कथावया जगिं समर्थ या कोण तें ?
परात्पर जगद्गुरो ! कवि जगत्त्रयीं तूं खरा,
कवित्व नलगे, मिळो तव पदीं सदा आसरा. ८

बडोदें, पॅलेसरोड, डिसेंबर १८९८

# ४७. लक्ष्मीविलास राजमंदिर–मनोरा

□

चाल— वीरशिरोमणि सकलधनुर्धर

विद्योन्नत श्रीमंत सयाजीराय जसा तो असे,
मनोरा उंच तसा हा दिसे,
शुद्धाचरणें धवल कीर्तिचें राजवस्त्र त्या जसे,
वसन तव शुभ्रवर्ण हें तसें,
जरि राज्यभार तो प्रचंड वाहे शिरीं,
तरि असे भूपती शांत सदा अंतरीं;
शांतता तशी तव शिखरीं वसती करी.
गभीर महिमा ख्यात नृपाचा अरिही वानीतसे
तोच गुण तव ठायीं वसतसे. १

अधिकारीजनरूपनेत्रयुत भूप–राज्यतनु जशी,
गवाक्षीं तव तनु शोभे तशी;
राजकुलीं एकला नरपती उच्चपदाला वरी,
तसा तूं राजगृहाच्या वरी,
तो राजा पाहे प्रजाजनाला जसा,
नृप दिसे प्रजेला, घन जैसा सारसा,
तूं बघशी सकलां, दिसशी सकलां तसा.
वैभवशेखर भूप, त्यापुढें उच्चहि लघुता वरी,
दिसे तव शिखराहुनि त्यापरी. २



राठी ग्रंथ संग्रहालय ...

तव शिखराहुनि दिसती मजला रम्य रम्य उपवनें,
रेखिलीं चित्रें जणुं सृष्टिनें;
अथवा राजांगणीं काढुनी अपूर्व रंगावली,
गेल्या वनदेवी स्वस्थलीं !
हे शिरोभाग जनसदनांचे दीसती,
जणुं उंच सखल या जललहरी उसळती;
तरु–राजि सरोजल, क्षितिज तीर भोंवतीं;
प्रासाद न हा श्वेतकमल जणुं फुललें; तद्दर्शनें
आला कविभ्रमर कर्षणें. ३

राष्ट्रतनूचा आत्मा राजा, हृदयीं त्या ठेविसी,
जणूं तूं राष्ट्रत्वा पावसी !
लक्ष्मीचें तूं विलासमंदिर, नांदो लक्ष्मी सदा,
वसो श्रीसरस्वती सर्वदा.
या सदनांचा तूं राजा दिसशी मला,
नृपगुणीं म्हणुनि तूं क्षणभरि मज भासला,
कीं क्षितिपतिनें तुज यशस्तंभ रोंविला,
गृहराजा ! तव शोभाकारण जनराजा त्याजशी
जपावें ! आत्म्याला तनु जशी. ४

बडोदें, १८९९

# ४८. स्वप्न–भेट

□

श्लोक

अखंड स्नेहाचें वसत हृदयीं बीज अमल,
कथाया तें घेशी खुण म्हणुनि का स्नेहल तिल ?
कशाला गे वेडे तिल तरि हवे ? नित्य मजला
मदात्मा तें सांगे, अवगत नसे काय तुजला ? १

दिलें आयासानें तदुपरि किती साखरपुट,
मला लागावें ते मधुर म्हणुनी ही खटपट ?
तुझ्या एका शब्दें अमृतमय सर्वेंद्रियगण
सदा होई, हें का अवगत न तूंतेंहि अजुन ? २

करीं घेऊनी ते तिळ जवळ आलीस मुदिता
तदा झाली आहा ! पुलकित तुझी ती तनुलता !
बघोनी ते झाले रसिक तिळही फार मुदित,
तुझ्यासंगें तेही जिव नसुनि झाले पुलकित ! ३

स्वयें मधुर तूं तरी मधूर कां न ते होतील,
न कल्पलतिकेस तीं विषफलें कधीं येतील,
स्वयें रसिक तूं तुझे रसिक कां न व्हावे तिळ,
सदा विमल कारणा विमल कार्य हेंची फल ! ४

हळुच बघुनि, खालीं मान घालूनि बाला,
वळवुनि वदनाला, आवरी अंचलाला,
मधुनि मधुनि सोडी चोरुनी दृग्शराला,
न कळत मज दावी लज्जिता रम्य लीला ! ५

फिरुनि फिरुनि कांहीं बोलण्या यत्न केले,
फिरुनी हळुच लाजें तोंड बाजूस नेलें,
पदर फिरुनि आला आडवा तो बळानें,
विधू जणूं लपवीला राहुनें या खळानें, ६

करुनि सकल होतें धैर्य तें एक जागीं
हळुच हळूच आला हात तो अग्रभागीं,
हर हर फिरुनी कां चालला मागुतीं तो;
तिल तिल तिल तों तों धीर माझा हरीतो. ७

किसलय लतिकेचे मंदवातें हलावे
स्फुरत अधर तैसा–याहुनी काय व्हावें ?
मधुर कुशल ओष्ठा, मौन हें तूं धरीलें,
तरीहि मजसि तेणें सर्व तू ऐकविलें ? ८

चतुर चतुर मोठे कालिदासादि झाले,
तरि तव कृतिनें त्यां आज तूं लाजवीलें,
वदुनि मुळिं न कांहीं थोर पांडित्य केलें,
अघटित रचनेचें काव्य तूं ऐकवीलें ! ९

मधुर किति किति हें गोड तैसें अपूर्व,
त्यज तरि तव आतां गीष्पते ! सर्व गर्व.
परिसुनि हृदयाचा कर्ण संतुष्ट झाला.
वद पुनरपि ओष्ठा ऐकवी त्वत्कृतीला. १०

वचपटु नयनांनो ! कासया ही वकीली,
मधुरतर अशी कां मुग्धभाषा वरीली ?
मजसि मिटुनि डोळे दीसते सर्व कांहीं;
स्तिमित असुनि तंद्रा बोलते तूमची ही. ११

श्रवणविषय नाहीं मुग्धभाषा अशी ही
मिळविलि कुठुनीया स्तंभिता इंद्रियांहीं ?
जणुं मदनच हीच्या रोमरोमीं लपूनी
अगणित रसनांनीं बोलतो दिव्य वाणी. १२

शशिकिरणशलाका घेउनी त्या अनंगें
नवकमलदलीं कां इंद्रचापीय रंगें
रतिहुनि अति नामी कामिनी रेखिली ही
अचल सुबक ऐशी यांत संदेह नाहीं ! १३

" सखे, पाहीं मोठें नवल दिसतें आज मजला
नभा सोडोनी ही अवनिवरि आली बघ चला,
पयोदांतें झांकी, अचल बनली शीतल कशी
बघे आदर्शी कीं मम हृदयिं जी बिंबित तशी ! १४

कशी सृष्टी झाली उलट, विपरीता कशि धरा,
दिलें जिव्हेनें गे निजवचनकर्तव्य अधरा !
प्रिये ! तोही जात्या पुरुष असुनी बोलत नसे,
श्रवणोंचारें तो तरी सकल सांगे बघ कसें ! १५

तुला वाटे खोटें तरि मजसि दे सिद्ध करुनी."
असें ऐकोनी ती स्मित करुनि पाहे मुरडुनी,
म्हणे "नाथा"-छे छे पुढतीं मज कांहीं न कळलें,
अहा वेडे ! कां गे पुनरपि असें मौन धरिलें ? १६

पाचारुनी सकल धैर्य विलासिनी ती,
लाजूनि, थांबुनि, पुनः बहुता बळांतीं,
अस्पष्ट गोड वदली मित मंजु बोला
" हे तील-" मौन पुढतीं, मग " गोड बोला." १७

" आहा सखे ! विनयशालिनि मी रिझालों,
सर्वांग सांडुनि सुधामयकाय झालों.
त्यांतूनि येतिल कसे कटु शब्द आतां.
तो सूर्यकांतहि शमे नमे चंद्र येतां ! " १८

ऐसें वदोनि अधरामृतपानकामी
ये ये म्हणोनि पुढतीं सरसावलों मी,
भिंतीस तों धडक लागुनि होय जागा—
स्वप्नींच कां तुज मना ! दिसली शुभांगा ! १९

मरणभगिनि निद्रे ! हाय हें काय केलें,
स्मरणहरणशीले स्वप्न तेंही हरीलें !
चिर जरि असलें मी पाहतों स्वप्न नामी
तरि फिरुनि उठाया इच्छितों का कदा मी ? २०

बडोदें, पॅलेस रोड
१२ जाने. १८९९

# परिशिष्ट

## दत्तांच्या तीन असंकलित कविता

कविवर्य दत्त यांच्या कवितांचा संग्रह त्यांचे सुविद्य चिरंजीव श्री. विठ्ठलराव घाटे यांनी प्रथमतः संपादित करून प्रसिद्ध केला. यानंतर दत्तांच्या कवितासंग्रहाच्या ज्या आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या त्या बहुतेक याच संग्रहावरून छापलेल्या आहेत. संग्रहात न आलेल्या अशा दत्तांच्या काही कविता कोठे आढळतात काय म्हणून आम्ही शोध करावयास सुरवात केली, तेव्हा आधुनिक मराठी काव्याचे ख्यातनाम टीकाकार प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांनी नकलून ठेवलेल्या निरनिराळ्या कवींच्या कवितांच्या बाडात दत्तांच्या तीन कविता अशा सापडल्या की ज्या अद्याप त्यांच्या कवितासंग्रहात संगृहीत झालेल्या नाहीत. त्या त्या वेळी मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या या तीन कविता पुढे देत आहो. या कविता प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांच्या साक्षेपी रसिकतेमुळेच केवळ प्राप्त होऊ शकल्या, याबद्दल आमच्याप्रमाणेच दत्तकवितेचे वाचकही प्रा. पंडितांचे ऋणी राहतील.

● ●

१.

# सृष्टी काय म्हणते ?

□

[ चाल–घनश्याम सुंदरा श्रीधरा... ]

मंगलदिन उगवला, करा हो प्रभुगुणगायन करा,
प्रातःकाळीं सांगे सकळां द्विजगण मंजुळ गिरा. १

अपार बलनिधि गंभीर सागर सांगे रात्रंदिन,
निर्बल मी, मज्जनक खरा तो सर्वशक्तिमान. २

हिमाचलादिक तुंग पुरातन पर्वतही म्हणती,
विश्वनिर्मिता पुराणपुरुष स्मरा खरा चित्तीं. ३

गगन म्हणे साकार असें मी, निराकार मत्पिता,
तेजोनिधि तो तेजहीन मी, म्हणे चंडसविता. ४

हरितवर्ण–वनवसन–विभूषित वसुंधरा सांगते,
कृपादान हे सर्व तयाचे पाहीं मूढमते ! ५

सर्व शक्तीचा सकल गुणांचा मायबाप तो खरा;
दीनवत्सला उत्सवसमयीं ध्या हो परमेश्वरा. ६

— काव्यरत्नावली
नोव्हेंबर १८९८

२.

# काशी

□

[ भुजंगप्रयात ]

मनाची निवृत्ती सदा पूर्ण शांती
असे तीर्थमाता मणीकर्णिका ती
नदी ज्ञानरूपी खरी हीच गंगा;
मना नीर क्षाली कसे जेवि अंगा. १

जिथें सद्गुणाचा दिवा पाजळोनी
मनोमंदिरीं मानिती सर्व प्राणी,
गुरूबोधरूपी धुळी पुण्यशाली,
मनीं माझिया काशिका तीच झाली. २

तिथें संचरे सुंदरी गोड वाणी,
सवें घेउनी सत्यता तेजखाणी,
जिथें पूर्ण शांती करी नित्य केली,
मनीं माझिया काशिका तीच झाली. ३

तिथें पाहतीं धर्मराजा उठोनी
विवेकोदकें स्नानसंध्या करोनी
परेशस्तुती गंध लावी कपाळीं,
मनीं माझिया काशिका तीच झाली. ४

जिथें दानही गुप्तरूपें रिघोनी,
मुके, आंधळे, पांगळे, मेळवोनी
यथाशक्ति दुःखा निवारी सुकाळीं
मनीं माझिया काशिका तीच झाली. ५

दया प्रेमभावें वसे जेथ नित्य,
तिथें षड्रिपूंचे घडे पारिपत्य,
विवेकाग्निने शुष्क माया जळाली
मनीं माझिया काशिका तीच झाली. ६

— काव्यरत्नावली
मे १८९९

३.

## समाजशकट

□

[ श्लोक ]

सत्यप्रीति अखंड चक्रयुगला लावा हृदासावरी
न्याय-ज्ञान-हयास नित्यमिषवें बांधोनि जोडा धुरीं
सारासार--विचाररूप समता हस्तीं प्रतोदा धरा
राष्ट्रोत्कर्ष-पथीं समाजशकटा सोत्साह चालू करा ॥ १ ॥

— काव्यरत्नावली
मार्च १९०१

# टीपा

**१. नवे पान उघडले !**

कविवर्य दत्तांच्या कवितेमुळे आधुनिक मराठी काव्यग्रंथाचे जणू काही नवे पान उघडले आहे अशी कल्पना करून प्रस्तुत संग्रहाला ‘ नवे पान ’ असे नाव दिले आहे व हीच कविता प्रारंभी घेतली आहे. बाकीच्या सर्व कवितांचा अनुक्रम मात्र शक्य तो रचनाकाळाला अनुसरून घेतलेला आहे. श्री. वि. द. घाटे यांनी संपादन केलेल्या ‘ दत्तांची कविता ’ या संग्रहात ‘ जननि आर्य-भूमि ! ’ ( नवे पान, क्र. ४९ ) ही कविता प्रारंभी ठेवली आहे.

‘ नवे पान उघडले ! ’ ही कविता मिल्टनच्या On his being arrived to the age of twenty-three (जन्मापासुन पाहिली वरिवरी तेवीस पाने पुरी ) या कवितेवरून सुचली असावी. बायरन्‌चीही On this day I complete my thirty–sixth year ही कविता प्रसिद्धच आहे. कवीची जीवितयात्रा चोविसाव्याच वर्षी संपली हा दुर्दैवयोग.

**२. एका मद्यप्याची स्त्री**

‘ एक मद्यपी व त्याची स्त्री ’ असा संवाद कवीने लिहिला होता. पण कविता आटोपशीर आणि सुरस करण्याच्या दृष्टीने श्री. वि. द. घाटे यांनी केवळ स्त्रीचेच म्हणणे ठेवून बाकीचा भाग गाळला आहे.

**३. यत्र यत्र हरिणीदृशां क्रमः । तत्र तत्र मदनस्य विक्रमः**

जेथे जेथे सुंदर स्त्रीचे पदार्पण होते तेथे तेथे मदनाचा विजय ठेवलेला, या सुभाषितावरून रचलेली ही कविता लावणीच्या झोकावर आहे. दिलखुलास शृंगार आणि लोकनाट्यातील शब्दकळा ही शाहिरी शैलीची वैशिष्ट्ये.

**४. श्री शिवछत्रपती**

हिरण्यकश्यपूचे उदर नखाग्रांनी फाडणाऱ्या नृसिंहाप्रमाणे अफझुल-खानाचे उदर तीक्ष्ण वाघनखांनी विदारण करणारे शिवाजी महाराज हे दुसरे नरसिंह आहेत. ‘ नरसिंह ’ शब्दावरील कोटी लक्षात घेण्यासारखी आहे.

**५. सखे सुमनमाले !**

फुलांच्या माळेला उद्देशून केलेल्या विविध कल्पना अनेक अर्थालंकारांनी सजविलेल्या आहेत. ‘ शंपा ’ म्हणजे वीज. संस्कृतातील शृंगारिक कवितेसारखा

मुग्ध शृंगार. राग आणि अनुराग यांचा खेळ सुरेख रंगविला आहे.

**६. बाळा वत्सरा, ये तुझे स्वागत असो !**

वत्सराला म्हणजे वर्षाला छोटे मूल कल्पून नुकत्याच सुरू झालेल्या वर्षावर केलेली ही दुसरी कविता. 'नवे पान उलटले !' ही पहिली व '१८९७ या वर्षाला' ही तिसरी. ही प्रथा इंग्रजीतली आहे. वर्ष हे लहान बाळ म्हणून त्याला उद्देशून केलेल्या कवितेला मराठी 'पाळण्या'ची उचित चाल योजलेली आहे.

**७. मित्रा विहंगा !**

पक्ष्याला उद्देशून केलेल्या या कवितेत पक्षी हा केवळ निमित्त आहे, वर्णन स्वातंत्र्यप्रीतीचे आहे. अप्रस्तुतप्रशंसा अलंकार. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या अन्योक्तिकलापाच्या धर्तीवरील कविता.

**८. प्रिये कवितासुंदरी !**

कवीची कवितेवरील प्रीती या कवितेत व्यक्त झाली आहे.

**९. बाई लतिके !**

लतिकेला स्त्री समजून केलेल्या कल्पना शृंगारमधुर आणि साध्या विषयातून मोठा आशय सुचविणाऱ्या आहेत. अनेक चमत्कृतिपूर्ण अलंकार. सातव्या ओळीतील 'ल्ढलिस सुमनभूषणांनी' याचा अर्थ फुलांच्या अलंकारांनी मढविलेली — शोभिवंत दिसतेस, असा करावा.

**१०. सख्या वसंतवाता !**

वसंतऋतूमधील वाऱ्यावर संस्कृत काव्यवाङ्मयातील संकेत वापरून केलेले वर्णन. 'होतो तुझी वाट पाहुनी' येथील 'पाहुनी' हा शब्द 'पहात' अशा अर्थाने वापरला आहे. ५ ते १० या सर्व कवितांत निसर्गातील विविध विषयांचे निमित्त करून कवीने आपले काव्यकौशल्य एका विशिष्ट पद्धतीने प्रकट केलेले आढळते. या सर्व कवितांची आशयानुरूप चाल लक्षणीय आहे.

**११. मुग्ध कलिका**

संस्कृत काव्यांतील प्रसिद्ध कल्पनांचा मराठी अनुवाद. विविध अर्थालंकार संस्कृत पद्धतीचेच आहेत. "ही आभरणाचे हृदयंगम आभरण । की उपमानाचे अनुपम ही उपमान" या पंक्ती म्हणजे कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीया'मधील 'आभरणस्याभरणं प्रसाधनविधेः प्रसाधनविशेषः ।

उपमानस्यापि सखे प्रत्युपमानं वपुस्तस्य ' या गीतीचे पडसादच नव्हेत काय ? ' दुहिताजन हे धन परक्याचे ' हा तर 'अर्थो हि कन्या परकीय एव ' या ' शाकुंतला 'तील प्रसिद्ध ओळीचा अनुवादच होय.

**१२. सायंकाल**

सायंकाळी सूर्यबाळाला त्याची आई अंगाई गीत गाऊन झोपवीत आहे ही कल्पना हृद्य आहे. ' पहाट होता जाई माघारा ' असा मार्मिक शेवट केल्यामुळे मूळ कल्पना अधिक खुलून दिसते. 'जो जो रे जो जो' ही पाळण्याची चाल वात्सल्यभावाची माधुरी वाढविते.

**१३. कुसुमलालन**

सृष्टी आणि कविता यांची एकरूपता वर्णिली आहे.

**१४. वर्षप्रतिपदा**

स्वदेशाविषयीचे प्रेम व देश स्वतंत्र नाही याविषयीचे दुःख.

**१५. कोकिलकूजित**

सृष्टिवर्णन, काव्यप्रयोजन आणि जीवनानंद यांचा त्रिवेणी संगम.

**१६. राजा रविवर्मा यांच्या चित्रातील मेनका शकुंतलेस काय म्हणते ?**

एका सुप्रसिद्ध चित्राचे वर्णन करण्याच्या निमित्ताने शाकुंतलातील एक सुप्रसिद्ध प्रसंग करुणरम्य शब्दांनी साकार केला आहे.

**१७. फुलांनो ! चला**

वसंतऋतूमध्ये फुले उमलतात पण वसंताचा बहर संपताच वर्षा ऋतू-मध्ये फुले झडून जातात. वसंतश्री लोप पावते. या सृष्टीतील घटनेवर वसंत-राया फुलांना उद्देशून आपल्या घरी जाण्याविषयी सांगत आहे अशी कल्पना. मधुमाधवश्री म्हणजे चैत्र आणि वैशाख महिन्यांमधील वसंतशोभा.

**१८. जा दृष्टीबाहेर !**

प्रेमभंगाचे चटकदार वर्णन. ' देवा ! नको पुनरपी असले प्रसंग ! याहुनि फोडुनि करी हृदया दुभंग ! ' या ओळींशी ' बी ' कवींच्या ' माझी कन्या ' या कवितेतील शब्दांशी साम्य पाहावे. फारशा प्रतिमांचा वापर न करता प्रणयभावनेचा अत्यंत उत्कट आविष्कार केलेला आहे.

**१९. प्रतिभा-विहंगा –**

प्रतिभेला विहंग कल्पून सृष्टी ही कवीची जननी आहे या कल्पनेचा विस्तार.

**२०. मित्रा नारायणा !**

दत्तकवींचे मित्र श्री. नारायणराव पैठणकर यांना उद्देशून लिहिलेली कविता. कवीच्या स्नेहशील स्वभावाचा आविष्कार.

**२१. लाडके –**

ही कविता प्रारंभी ' सुविचार–समागम ' (जानेवारी १८९९) मध्ये वल्लभविलाप या मथळ्याखाली प्रसिद्ध झाली. विरहव्यथेचे करुणोत्कट वर्णन.

**२२. भगवा झेंडा**

ऐतिहासिक प्रसंगवर्णनाच्या आधारे स्वजनांना जागृत करण्याचा प्रयत्न. मी क्षत्रिय असूनही माझे असु ( प्राण ) त्या झेंड्यापुढे का वेचले नाहीत याची तीव्र खंत व्यक्त केली आहे. दत्तांच्या राष्ट्रप्रेमाचा नमुना.

**२३. बघसी अंत किती राजसे ?**

शेलेच्या Love's Philosophy या कवितेच्या आधारे रचलेले भावगीत. नवकाव्य–माळ घालीन, नवकाव्य रचीन येथील ' नवकाव्य ' ही शब्दयोजना १८९७ साली दत्तकवींनी आपल्या स्वतःच्या काव्याला उद्देशून केली हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**२४. निज नीज माझ्या बाळा !**

मराठीतील सर्वश्रेष्ठ करुणरम्य गीतांपैकी एक. पाळण्याच्या चालीवर लिहिलेले अंगाईगीत. पहिल्या कडव्यातील चार उपमा एकाहून एक वरचढ असून दुसऱ्यात चेतनगुणोक्तीच्या साहाय्याने दारिद्र्याचे मनोहर वर्णन केले आहे. तिसऱ्या कडव्यात कोणताच ठळक अलंकार नसूनही कारुण्य ओथंबून आलेले आहे. चौथ्यात विरोधाभासाची मौज दाखविली असून शेवटी ' तू सत्याला सोडू नकोस, कारण तेच आपले कायमचे धन आहे. तू देवाची भक्ती कर म्हणजे तो करुणेचा सागर तुझे रक्षण करील ' असा बाळबोध आणि भाबडा उपदेश केला आहे. इतरत्र काव्याच्या शेवटी असा उपदेश हा रसहानिकारक झाला असता. पण या गीतात तो दरिद्री आईच्या तोंडी घातला असल्यामुळे शोभून दिसतो. या संपूर्ण कवितेत एका धनहीन आईच्या मुखाने जी करुण भावना साकार केली आहे तिला मराठी

काव्यवाङ्मयात तोड नाही. कुडाच्या भिंती असलेले, कळकीचे जुनाट व करकर आवाज करणारे दार असलेले मोडके झोपडे, त्यात धान्याचे कण शोधण्याचा विफल प्रयत्न करणारे उंदीर मात्र खडबड आवाज करतात, हा सर्व इंद्रियगोचर तपशील त्या वातावरणाशी समरसता निर्माण करतो. या गीतात शब्द आणि अर्थ, तसेच भाव आणि नाट्य यांचे सर्व सौंदर्य एकरूप झाले आहे. ' सुतार निर्गुणीचे ' या सुप्रसिद्ध पाळण्याची चाल या गीतातील वात्सल्य आणि कारुण्य द्विगुणित करते.

## २५. विश्वामित्रीच्या काठी

ही कविता म्हणजे दत्तकवींच्या काव्यरत्नमंजूषेत असलेल्या उपमा, रूपक, ससंदेह, भ्रांतिमान या सर्व बहुमोल अलंकारांचे एक नयनमनोहर प्रदर्शनच होय. श्री. वि. द. घाटे लिहितात, " ही कविता प्रथम इंदुरास लिहिली. बडोद्यास ' झुलत्या पुलावर ' चार कडवी नवीन झाली." या काव्यात एक अवर्णनीय प्रसन्नता भरली आहे व शब्द इतके मृदू, मधुर व आर्द्र आहेत की ते आपले रूप टाकून रसमय झाले की काय असे वाटते. नादमाधुर्याचा मासला.

## २६. तरुवरा !

वृक्षवर्णनाच्या निमित्ताने कृतज्ञतेची भावना साकार केली आहे. ही कविता दत्तांनी जणू काही तरुलता दत्त या सुप्रसिद्ध बंगाली कवयित्रीला उद्देशून केली असावी असा भास होतो. दत्तकवींवरील बंगाली वातावरणाचा प्रभाव लक्षात घेता त्यांनी हे पद्यसुमन एखाद्या उपकारकर्त्या व्यक्तीला अर्पण केले असावे अशी शंका येते.

## २७. एका आसन्नमरण दुष्काळपीडितास--

प्रा. भ. श्री. पंडितांच्या मते या कवितेस शेक्सपीयरच्या ' सिंबेलाईन'च्या चौथ्या अंकातील दुसऱ्या प्रवेशाचा आधार आहे. कवीच्या संवेदनशील वर्णनशैलीचा हा एक सुंदर नमुना आहे. या कवितेत दारिद्र्याला समाज जबाबदार आहे हा विचार सूचित झाला आहे. जगातील बंधुता, मानवता या व्यर्थ आहेत असे औपरोधिक वर्णन आणि " चाललो तरी सखया मी; भेटेन तुला निजधामी, लवकरी !" यातील केवळ दीड वर्षाच्या आत खरे झालेले भविष्य हे लक्षात घेण्यासारखे आहे.

२८. **विनवणी**

लावणीच्या धर्तीवर लिहिलेले नाट्यपूर्ण गीत.

२९. **बोलत का नाही ?**

बालसुलभ असा अभिनय आणि विनोदाची छटा.

३०. **प्रभात**

काव्य म्हणजे बोलके चित्र याचे प्रत्यंतर. संपूर्ण कवितेत रामप्रहरातील ' प्रेमळ भावे सरळ मनाने वंदि जगत्पाला ' या पवित्र कल्पनेचे आवरण.

३१. **आगगाडीस**

आगगाडीचे निमित्ताने घरातील मंडळीस भेटण्याच्या उत्कंठेचे वर्णन.

३२. **१८९७ या वर्षाला—**

रूपकात्मक कविता. अनावृष्टीमुळे दुष्काळ पडला त्याचे या कवितेत ' कालतरुच्या फुला ' असे रूपकात्मक वर्णन केले आहे. १८९७ साली दत्त-कवींनी आपल्या सुमारे ५० पैकी ३० कविता लिहिल्या यावरून त्यांना या वर्षाचे महत्त्व का वाटते हे लक्षात येईल. ' तो दिन येईल चिरसुख देईल केंव्हा न कळे मला ' या ओळीत सव्वा वर्षानेच कवीला आलेल्या अपमृत्यूची चाहूल जाणवते. ' सुललेशीं ' हा मुद्रणदोष, ' सुकलेशीं ' हवे.

३३. **आकाशातील घारीस—**

घारीचे निमित्त करून समाजातील खोटे प्रेम चंचलता यावर उपरोधपूर्ण टीका. आकाशरूपी समुद्रावर चालणारी घार म्हणजे नौका हे रूपक हृद्य आहे.

३४. **आंदोलन**

झोपाळ्यावर बसलेल्या एका मुलीला उद्देशून लिहिलेले शिशुगीत. देवदया, भक्तिप्रीती, मोक्षप्राप्ती यांवर केलेले झाड, दोर, झोका यांचे रूपक वैशिष्ट्यपूर्ण आहे.

३५. **असंतुष्ट पति**

एका विषम जोडप्याच्या दुःखी जीवनाचे चित्र रंगविणारी कविता. ' संसारी मज गोवुनी मज नको ऐसी दिली अंगना ' या भावनेची अनुभूती येथे साकार झाली आहे.

३६. **दीपका !**

स्नेहहीन जीवनाला उद्देशून केलेली अन्योक्ती.

**३७. शाहणी बाहुली**

दत्तांच्या सुप्रसिद्ध शिशुगीतांपैकी एक. यातील नाट्य रोचक आहे.

**३८. स्वतंत्रतेस—**

सुनीताच्या धर्तीची म्हणजे अंती कल्पक कलाटणी दिलेली कविता. शेवटच्या दोन ओळीत इंग्लंडमध्ये स्वतंत्रतेचे पोवाडे गाणाऱ्या परंतु हिंदुस्थानात तिला दडपून टाकणाऱ्या दुष्ट ब्रिटिश राजनीतीचा धिक्कार केला आहे. दुसऱ्या श्लोकात पुढील सुप्रसिद्ध सुभाषिताचा अनुवाद केला आहे— घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चन्दनं चारुगंधि । तप्तं तप्तं पुनरपि पुनः कान्तवर्णं सुवर्णम् ।

**३९. अ आ ई!**

हे शिशुगीत रवींद्रनाथ टागोरांच्या 'क्रेसंट मून' या संग्रहातील 'टीचर' या कवितेवरून रचलेले असावे.

**४०. बाललेखन**

यातील चिरंजीव म्हणजे लहानपणचे श्री. विठ्ठलराव घाटे. बालपणी आपण ईश्वराच्या जवळ असतो, या वर्डस्वर्थच्या कल्पनेचा उपयोग केलेला आहे. 'काय केले तू स्वये आपणाशी!' ही कल्पना वर्डस्वर्थच्या What man has made of man वरून स्फुरलेली असावी.

**४१. देवाजीची सर्व मुले**

फुले आणि मुले या विषयावरील रे. टिळकांची आठवण करून देणारी कविता. सरलता हे तिचे वैशिष्ट्य.

**४२. एक फुलें विकणारी पोर**

ही कविता लिटनच्या Last Days of Pompii या कादंबरीतील आंधळया मुलीच्या गाण्याच्या आधाराने लिहिली आहे (वि. द. घाटे).

**४३. मावळ्यांस आमंत्रण**

स्कॉटच्या Pilroch of Danial Dhu चे मराठीकरण आहे. जुन्या इतिहासाच्या पडद्याआड सद्यःस्थितीचा आदेश.

**४४. दिवाळी**

देशातील दुःख, दारिद्र्य आणि दास्य नष्ट होऊन देश स्वतंत्र होईल तीच खरी दिवाळी. कविता ही बहीण व 'मनोरंजन' हा भाऊ यांची भाऊबीज असे रूपक केले आहे.

**४५ जननी आर्यभूमि !**

ही कविता 'दत्तांची कविता' या संग्रहात प्रारंभी छापली होती. 'सुविचार समागम' (डिसेंबर १८९८) मध्ये या गीताखाली टीप आहे ती अशी—'हे पद कवीने सुप्रसिद्ध बंगाली कवि रवींद्रनाथ ठाकूर यांच्या एका पदावरून केले आहे. मुळातले विचार व शब्दही कित्येक ठिकाणी जसेच्या तसे ठेवण्याचा यात प्रयत्न केला आहे.' बंकिमचंद्रांच्या प्रख्यात 'वंदेमातरम्'च्या आधारे 'माता ही सुजला स्वभूमि सुफला' ही ओळ घातली आहे. त्या काळातील देशभक्तीचे आणि स्वातंत्र्यप्रीतीचे वातावरण येथे स्पष्ट दिसते.

**४६. शेवटचे मागणे**

या कवितेतून चंद्रशेखरांच्या प्रौढ, भारदस्त, क्लिष्ट परंतु प्रसन्न शैलीचे पडसाद ऐकू येतात. 'कवित्व नलगे, मिळो तव पदी सदा आसरा' या शब्दांतून दत्तांच्या काव्यध्येयावरही प्रकाश पडतो.

**४७. लक्ष्मीविलास राजमंदिर–मनोरा**

REFBK-C016302

बडोद्याच्या महाराजांची प्रशस्ती.

REFBK-0016302

**४८. स्वप्न–भेट**

चमत्कृतिपूर्ण कलाटणी दिलेली एक कल्पनाप्रचुर प्रेमकविता.

**परिशिष्ट**

१. 'प्रभात' या कवितेप्रमाणे 'सृष्टी काय म्हणते ?' या कवितेतही परमेश्वरभक्तीचा गौरव केलेला आहे.

२. खरी 'काशी' कोणती व ती कुठे आहे याचे सुंदर वर्णन.

३. राष्ट्रोद्धारासाठी 'समाजशकट' कसा चालवावा याचे रूपकाच्या साह्याने केलेले वर्णन या कवितेत आढळून येते.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...
१४२... वे पान
दा. क्र. ७६३०२